
ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४४ | अंक २ | पाने ५६ | सप्टेंबर २०१६ | मूल्य २२ रु.



## ‘महिला सबलीकरण’

**महिला सक्षमीकरण: सरकारचा दृष्टिकोन**
लीना नायर

**भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण**
कमला भसीन

**महिला सबलीकरण, विकास आणि उद्योकता**
शशी मिश्रा


(फोकस)
**स्त्रियांच्या अनेकविध भूमिका**
देवकी जैन

(विशेष लेख)
**स्भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांची भूमिका**
डॉ. ज्योती अटवाल

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक २ ❖ ❖ सप्टेंबर २०१६ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक अॅड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अॅड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ■ महिला सक्षमीकरण: सरकारचा दृष्टिकोन | लीना नायर | ५ |
| ■ विषम लिंग-गुणोत्तर: मानसिकता आणि शासकीय धोरण | मेरी ई. जॉन | ९ |
| ■ सेवा: महिलांचे आर्थिक सबलीकरण | इला रमेश भट्ट | १२ |
| ■ भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण | कमला भसीन | १७ |
| ■ भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांची भूमिका (विशेष लेख) | डॉ. ज्योती अटवाल | २७ |
| ■ स्त्रियांच्या अनेकविध भूमिका (फोकस) | देवकी जैन | ३२ |
| ■ महिला सबलीकरण, विकास आणि उद्योकता | शशी मिश्रा | ३५ |
| ■ महिलांचे हक्क आणि सबलीकरणांच्या योजना-उपाय | सुरेखा तवांदकर | ३८ |
| ■ महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाचा मागोवा | डॉ.दीपक भुसारे | ४३ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# नारीशक्तीचे महत्व

विकास साध्य करण्यासाठी महिलांच्या सबलीकरणाइतके दुसरे प्रभावी साधन नाही.... महिलांमध्ये असलेल्या क्षमतांचे वर्णन करण्यासाठी हे वाक्य पुरेसे आहे. आज अशी परिस्थिती आहे की पारंपरिक भूमिका असो की आधुनिक, महिलांसाठी कोणतीही गोष्ट आता असाध्य राहिलेली नाही. माता, भगिनी आणि सहचारिणी अशा वेगवेगळ्या भूमिका निभावताना महिला नेहमीच पुरुषांना भक्कम साथ देत असतात. आधुनिक जगात तर महिला शिक्षिका आहेत, व्यवस्थापक आहेत आणि राजकारणीही आहेत. रूढार्थाने फक्त पुरुषांचीच मक्तेदारी असलेल्या गिर्यारोहण, वैमानिक आणि लष्कर अशा क्षेत्रातही महिला आता कतृत्व गाजवू लागल्या आहेत.

अर्थात, पूर्वी अशी स्थिती नव्हती. प्राचीन काळी पुरुषांच्या तुलनेत महिलांना नेहमीच दुय्यम वागणूक दिली जाई. तिचे अस्तित्व केवळ मुलगी, पत्नी किंवा आई इथपर्यंतच मर्यादित असे. तिला नेतृत्वाची संधी कधीच मिळत नसे. तिला नेहमीच आयुष्यात असलेल्या पुरुषाच्या मग तो पिता असेल, पुत्र असेल किंवा पती यांच्या मर्जीनुसारच आयुष्य जगावे लागे. शतकापर्यंत ही स्थिती पाश्चात्य देशांमध्येही होती. भारतात जवळपास शंभर वर्षाच्या संघर्षानंतर महिलांना मालमत्तेचा, मतदानाचा हक्क मिळाला, विवाह आणि रोजगाराच्या बाबतीत नागरी हक्काच्या रूपाने समानतेचा हक्क मिळाला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर घटनाकार आणि आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी महिलांच्या पुरुषांच्या बरोबरीने असलेल्या सामाजिक स्थानास मान्यता दिली. सत्तेत असलेल्या तत्कालीन सरकारांनी महिलांना आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात समान दर्जा, वागणूक सुनिश्चित करण्यासाठी वेळोवेळी अनेक उपाययोजना केल्या. आपले कौशल्य, क्षमता सिद्ध करण्यासाठी आणि राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावण्यासाठी महिलांना नवनवीन क्षेत्र खुली करून देण्यात आली. यासंदर्भात संसद आणि राज्याच्या विधानसभांमध्ये अनेक कायदे मागील काही दशकांमध्ये संमत करण्यात आले.

शिक्षणामुळे मोठ्या प्रमाणात महिलांचे सबलीकरण झाले असून शिक्षित महिला असलेल्या ठिकाणी सबलीकरणाची प्रक्रिया जास्त वेगात झाल्याचे दिसून येते. शिक्षणामुळे महिलांना विवाह, मातृत्व आणि नोकरी-व्यवसाय याबाबत निर्णय घेण्याचे सामर्थ्य आणि शक्ती प्राप्त होऊ शकली. शिक्षणामुळेच महिलांचे पुरुषांवरील अवलंबित्व कमी होऊ शकले.

आरोग्य हे आणखी एक क्षेत्र आहे जिथे महिलांची परवड होते. बहुतांश महिलांना आजही ना तितका वेळ आहे ना त्यांची मानसिकता किंवा त्यांना तशा सुविधा आहेत, जेणेकरून त्या आरोग्य केंद्रात जाऊन सेवेचा लाभ घेऊ शकतील. विशेषत: ग्रामीण भागातील महिलांना स्वच्छता गृहांसारख्या मूलभूत सुविधाही आपल्या घरात उपलब्ध नाहीत. त्यामुळेच 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम' यासारख्या योजनांद्वारे सरकारने महिलांच्या आरोग्यास प्राधान्यक्रम दिला आहे.

विधवा, घटस्फोटित आणि अविवाहित महिलांबाबत समाजात असलेली वेगळी भावना ही बाबही भारतात महिलांना सामाजिक दृष्टया कमी दर्जा मिळण्यास कारणीभूत आहे. परंतु हळू-हळू का होईना आता परिस्थिती बदलू लागली आहे. सर्वात प्रभावशाली व्यक्तींमध्ये आता बऱ्याच महिलांचा समावेश आहे. अरुंधती भट्टाचार्य,इंदिरा नुयी,किरण मुझुमदार शॉ आणि चंदा कोचर या त्यापैकीच आहेत. भावना कांत, अवनी चतुर्वेदी आणि मोहना सिंग यांचा अलीकडेच हवाईदलात समावेश करण्यात आला आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच २०१५ साली प्रजासत्ताकदिनी लष्कर, हवाईदल आणि नौदल या तीनही संरक्षण दलातील फक्त महिलांचा समावेश असलेल्या विशेष पथकाने राजपथावर दिमाखदार संचलन केले. 'महिलांचा विकास' याच्या पुढे जाऊन 'महिलांच्या नेतृत्वाखाली विकास' या पंतप्रधानांच्या धोरणाचे हे प्रतीक आहे.

स्वामी विवेकानंदानी म्हटले होते- 'महिलांची स्थिती सुधारल्याशिवाय जगाचे कल्याण घडणार नाही, केवळ एका पंखाच्या आधारे भरारी घेणे कोणत्याही पक्षाला शक्य नाही' कुटुंब, देश आणि विश्वाच्या बाबतीत नारीशक्तीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी हे विधान पुरेसे आहे.

■■■

# महिला सक्षमीकरण: सरकारचा दृष्टिकोन

लीना नायर



**आपली राज्यघटना महिलांना समानताच देत नाही तर सरकारला महिलांच्या कल्याणासाठी निर्णय घेण्याचे अधिकारही देते. त्यात समानतेबरोबरच सर्वसमावेशक विकासाचे तत्वही येते. महिला व मुले यांचे देशाच्या लोकसंख्येतील प्रमाण ७० टक्के आहे. त्यांच्या कल्याणासाठी अनेक कायदे करण्यात आले , दुरूस्त्या करण्यात आल्या. योजना, धोरणे व कार्यक्रम आखले गेले. महिलांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम त्यामुळे दिसू लागला. महिला सक्षमीकरण हा गुंतागुंतीचा मुद्दा आहे व त्यात अनेक घटकांचा समावेश आहे.**

लिंगभाव समानतेचे तत्व भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत आहे. मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यात त्याचा उल्लेख आहे. आपली राज्यघटना महिलांना समानताच देत नाही तर सरकारला महिलांच्या कल्याणासाठी निर्णय घेण्याचे अधिकारही देते. त्यात समानतेबरोबरच सर्वसमावेशक विकासाचे तत्वही येते. महिला व मुले यांचे देशाच्या लोकसंख्येतील प्रमाण ७० टक्के आहे. त्यांच्या कल्याणासाठी अनेक कायदे करण्यात आले , दुरूस्त्या करण्यात आल्या. योजना, धोरणे व कार्यक्रम आखले गेले. महिलांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम त्यामुळे दिसू लागला. महिला सक्षमीकरण हा गुंतागुंतीचा मुद्दा आहे व त्यात अनेक घटकांचा समावेश आहे. सरकारचा धोरणात्मक हस्तक्षेप त्यात महत्वाचा आहे. महिलांची आर्थिक व सामाजिक प्रगती तसेच सक्षमीकरण यात प्रगती झाली तरच त्यांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षा , आर्थिक सुरक्षा ही उद्दिष्टे साधली जातात.

**आरोग्य**

भारतातील महिलांना चांगली व परवडण्याजोगी आरोग्यसेवा देणे महत्वाचे आहे त्यामुळे भारत सरकारपुढे गरीब व वंचित महिलांना ही सेवा पुरवणे हे नेहमीच मोठे आव्हान राहिले आहे. २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रम म्हणजे एनआरएचएम आताचा राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबवला जात आहे. त्यात ग्रामीण भागात आरोग्य सुविधा , औषधे व साधने तसेच मनुष्यबळ पुरवण्याचा हेतू आहे. आरोग्य हा देशाच्या प्रगतीतील महत्वाचा घटक मानला जातो. गर्भवती महिलांना पोषक आहार पुरवणे हे आव्हान आहे. यातील एक तृतीयांश महिलांचा बॉडी मास इंडेक्स म्हणजे बीएमआय कमी असतो. कुपोषण बहुसंख्य महिलांना घातक ठरत असते.भारतातील दर तिसरी महिला ही कुपोषित तर दुसरी महिला ही ॲनिमया ग्रस्त असते, त्यांच्यात शारीरिक सक्षमता निर्माण करण्यासाठी माता व बाल कुपोषणाचा प्रश्न हाताळण्यासाठी एकात्मिक बाल विकास योजनेचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले. आयसीडीएस हा जगातील एक महत्वाचा

व पुरेसा प्रसार झालेला कार्यक्रम असून त्यात बालकांची व मातांची काळजी घेण्यासाठी सर्व जिल्हे व गटांच्या ठिकाणी १४ लाख अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यात आली. सहा वर्षाखालील ८.४ कोटी मुले व १.९ कोटी गभर्वती माता यांच्या बाबत सरकारची वचनबद्धता या कार्यक्रमात दिसून येते. ग्रामीण पोषण व आरोग्य दिन ग्रामीण भागात राबवले जातात. त्यातून माता व बालकांची काळजी घेतली जाते. गभर्वती मातांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठई सरकारने नेहमीच धोरणात्मक उपाय केले आहेत. त्यात जननी सुरक्षा योजना हा कार्यक्रम असून त्यात प्रसूतीसाठीचा खर्च येत नाही. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमात गर्भवती माता व त्यांच्या बाळांची काळजी घेतली जाते. सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या माध्यमातून ही सुविधा दिली जाते. माता व बालक सुरक्षा पत्रिका योजनेत माता व बालके यांना सेवा दिल्या जातात. माता व बाल देखरेख यंत्रणेत प्रसूती पूर्व व नंतरच्या योजना राबवताना दोघांच्याही आरोग्यावर भर दिला आहे. माता मृत्यूचा आढावाही वेळोवेळी घेतला जातो. त्यामुळे २००७-०९ मध्ये दर लाखात असलेले माता मूत्यूचे २१२ हे प्रमाण २०१०-१२ मध्ये १७८ पर्यंत खाली आले असे रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटले आहे. एनएफएचएसच्या २०१५-१६ मधील आकडेवारीनुसार १३ राज्यात महिलांना गर्भधारणा काळात सुविधा दिल्या आहेत, त्यामुळे माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. जास्तीत जास्त महिला आता आरोग्य केंद्रात मुलांना जन्म देतात. काही राज्यात हे प्रमाण गेल्या दशकापेक्षा दुप्पट आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१५ अनुसार महिलांच्या आरोग्य गरजांबरोबरच त्यांचे गभर्वती असतानाचे आरोग्य व बाल आरोग्य यावर भर दिला जात आहे. पुरूष नसबंदीचे प्रमाण व कुटुंबनियोजनाची साधने वापरण्याचे प्रमाण वाढत आहे.

शिक्षण- महिलांचे शिक्षण हा महत्वाचा घटक असून शिक्षणाच्या प्रसाराचे फायदे अजून महिलांना पुरेसे मिळाले नाहीत. त्यांना दर्जेदार शिक्षण व कौशल्ये प्राप्त करून दिली जात आहेत त्यात माध्यमिक , उच्च व तंत्रशिक्षण

***२००७-०९ मध्ये दर लाखात असलेले माता मूत्यूचे २१२ हे प्रमाण २०१०-१२ मध्ये १७८ पर्यंत खाली आले असे रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटले आहे. एनएफएचएसच्या २०१५-१६ मधील आकडेवारीनुसार १३ राज्यात महिलांना गर्भधारणा काळात सुविधा दिल्या आहेत, त्यामुळे माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे.***

सुविधात महिलांना पुरेसे फायदे मिळालेले नाहीत. त्यामुळे सरकारने प्राथमिक , माध्यमिक व तंत्र शिक्षणात काही योजना राबवल्या असून त्यात शिक्षण हक्क म्हणजे राइट टू एज्युकेशन कायदा २००९ च्या अंमलबजावणीचा समावेश आहे. २०१० मध्ये हा कायदा अंमलात आला असून त्यात सर्व मुलांना सर्व शिक्षा अभियानात शिक्षणाचा हक्क दिला आहे. प्राथमिक पातळीवर शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. मुलींची शाळेतील उपस्थिती व नोंदणी वाढण्यावर भर दिला जात असून ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात हे प्रयत्न होत आहेत. मुलींची पटसंख्या त्यामुळे वाढली असून गळतीही रोखली गेली आहे. डीआयएसइच्या २०१२-१३ च्या अहवालानुसार लिंगभाव समानता निर्देशांक हा प्राथमिक पातळीवर १.० तर त्यावरील पातळीवर ०.९५ आहे. सर्व शिक्षा अभियानाचा प्रसार करण्यात आला असून त्यात आता 'पढे भारत बढे भारत' या कायर्क्रमाचा समावेश केला आहे. पहिली व दुसरीच्या मुलांची वाचन, लेखन , भाषा व गणित क्षमता जागतिक पातळीच्या बरोबरीने आणण्याचा उद्देश यात आहे. यात प्रत्येक शाळेत कामाचे २०० तास हे अध्यापन व अध्ययन यासाठी दिले असून इतर ८०० तास अध्ययन सूचनांसाठी वापरले आहेत. विद्यांजली कार्यक्रमात समाज व खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात येत आहे. त्यात प्राथमिक पातळीवरील शिक्षणात बदल घडवण्याचे उद्दिष्ट आहे. माध्यमिक शिक्षणालाही देशात महत्व दिले जात असून १४ ते १८ वयोगटातील सर्व मुलांना शिक्षण देण्याचा हेतू यात आहे. त्याचा दर्जा वाढवण्यासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान २००९ पासून राबवले जात आहे. मुलींची साक्षरता २००१ पासून २०११ पर्यंत ६५.३८ टक्क्यांवरून ७४.०४ टक्के झाली आहे. सीबीएसइने उडान योजनेत मुलींच्या शिक्षणात लक्ष दिले आहे. त्यासाठी मुलींची पटसंख्या

वाढवण्याकरिता अभियांत्रिकी व इतर विद्याशाखात शिष्यवृत्त्या दिल्या जात आहेत. ऑनलाईन शिक्षण साधने मोफत उपलब्ध केली आहेत. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सर्वंकष उच्च शिक्षणासाठी केली जात असून वेबवर आधारित विद्या लक्ष्मी योजना (www.vidyalakshmi.co.in)प्रधान मंत्री विद्यालक्ष्मी योजनेअंतर्गत राबवली जात आहे. शिक्षण कर्जे व सरकारी शिष्यवृत्ती यासाठी एक खिडकी योजना राबवण्यात येत आहे. भारतात अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर व महत्वाच्या पदांवर असताना लिंगभेद अजूनही आहेत. मुले व मुली यांना त्याबाबत संवेदनशील केले जात आहे. सकारात्मक सामाजिक घटक त्यात लागू केले जात आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याबाबत कुलगुरूंनी मार्गदर्शक तत्वे लागू करण्यासाठी अधिसूचना काढली आहे, मुलींचे हक्क व अधिकार यांचे पालन करण्यास सांगण्यात आले आहे.

### मुलींची सुरक्षितता

सर्व समावेशक समाज व विकासासाठी महिलांविरोधातील हिंसाचार व भेदाभेद कमी करण्याचे सरकारचे प्रयत्न असून त्याबाबत कायदे करण्यात येत आहेत. मुलींच्या सुरक्षिततेसाठी पोलिस खात्यास नवी साधने उपलब्ध केली आहेत. बलात्कार व इतर लैंगिक गुन्हे यात लवकर न्याय मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. महिलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी गुन्हेगारी कायदा दुरूस्ती कायदा २०१३ अंमलात आणला जात असून त्यात बलात्कार व इतर लैंगिक गुन्ह्यांसाठी शिक्षा कडक केल्या आहेत. ॲसिड हल्ले, लैंगिक छळवणूक व महिलांचा पाठलाग करणे यांचा गुन्ह्यात समावेश करण्यात आला आहे. कामाच्या ठिकाणी महिलांची छळवणूक प्रतिबंध व निराकरण कायदा २०१३ मध्ये महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत. घरगुती हिंसाचार कायदा २००५ मध्ये महिलांच्या सुरक्षेवर भर देण्यात आला असून बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ अनुसार बाल विवाहांना बंदी आहे. बाल लैंगिक गुन्हे प्रतिबंध कायदा

---

***मातृत्व रजा १२ आठवडे होती ती २६ आठवडे केली आहे त्यामुळे महिलांचे नोकरी करण्याचे प्रमाण वाढू शकते. महिलांच्या सुरेक्षासाठी निर्भया निधी स्थापन करण्यात आला असून त्यासाठी २००० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यात एकूण १५ प्रस्ताव आहेत.***

---

२०१२ अनुसार मुलांविरोधातील लैंगिक गुन्हे कमी होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गर्भधारणपूर्व तपासणी तंत्र कायदा पीसी अँड पीएनडीटी १९९४ अनुसार लिंगनिवडीला म्हणजे स्त्री भ्रूण हत्येला प्रतिबंध केला असून बालगुन्हेगार न्याय कायदा २०१५ अनुसार त्यांच्या विकास गरजा व इतर बाबींवर भर दिला आहे. मातृत्व लाभ सुधारणा विधेयक २०१६ अनुसार मातृत्व रजा १२ आठवडे होती ती २६ आठवडे केली आहे त्यामुळे महिलांचे नोकरी करण्याचे प्रमाण वाढू शकते. महिलांच्या सुरेक्षासाठी निर्भया निधी स्थापन करण्यात आला असून त्यासाठी २००० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यात एकूण १५ प्रस्ताव आहेत. एका ठिकाणी असलेली केंद्रे, त्यात पोलिस मदत, कायदेशीर समुपदेशन व न्यायालयीन खटल्यांचे व्यवस्थापन. सामाजिक -मानसिक समुपदेशन , वैद्यकीय मदत. पीडित महिलांना तात्पुरता निवारा यांचा समावेश आहे. महिलांना २४ तास आपत्कालीन हेल्पलाइन दिली असून जिल्ह्यांमध्ये प्रतिसाद व चौकशी विभागही स्थापन केले आहेत. नॅशनल इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टीम निर्माण करण्यात आली असून त्यात पीडित अर्थसहाय्य निधी उपलब्ध केला आहे, महिला विरोधी सायबर गुन्हे रोखण्यासाठी एक विभाग सुरू केला आहे. बेटी बचाव बेटी पढाव योजनेत बहुउद्देशी पुढाकार घेतला असून त्यात मुलींचे भवितव्य व त्यांची संख्या मुलांच्या तुलनेत योग्य ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. स्थानिक पातळीवर या योजनेत पुढाकार घेतले असून सुरूवातीच्या १०० जिल्ह्यांमध्ये आता आणखी ६१ जिल्ह्यांचा समावेश या योजनेत केला आहे. पीडित मदत निधी, स्वाधार, निवारा केंद्रे, बलात्कारित महिलांचे पुनर्वसन यांचाही विचार केला आहे. पोलिस दलात महिलांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न चालू असू राज्यांमध्ये त्यांना ३३ टक्के आरक्षण पोलिस दलात दिले आहे. महिला पोलिस स्टेशन्स सुरू केली असून तेथे महिलांविरोधी गुन्ह्यांची दखल घेतली जाते. पोलिस दलाकडून लिंगसमानतेचा प्रसार व्हावा हा हेतू यात

आहे. महिला पोलिस स्वयंसेवकांची सेवा सुरू करण्यात आली असून त्यात राज्ये व केंद्र शासित प्रदेशात महिलांची भरती केली जात आहे. महिला विरोधी हिंसाचार , बालविवाह , हुंडा छळ प्रकरणे यात हाताळली जातात.

**महिलांची आर्थिक सुरक्षितता**

महिलांच्या आर्थिक सुरक्षेसाठी महात्मा गांधी शहरी ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) अनेक तरतुदी आहेत. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका कार्यक्रम म्हणजे एनआरएलएम मध्ये ग्रामीण महिलांना आर्थिक सुरक्षा व सक्षमी करणाची संधी दिली आहे.राष्ट्रीय महिला कोश योजनेत गरीब महिलांना नियमित निधी दिला जातो. त्यांना उद्योग व स्वमदत गटांसाठी प्रोत्साहन दिले जाते. महिला ई-हाट योजनाही सुरू केली असून त्यात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले आहे. इंटरनेट उद्योग व्यवस्था डिजिटल इंडियात उपलब्ध केली असून त्यातही महिलांना उद्योजकतेत प्राधान्य व आर्थिक विकासात त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेत लाखो महिलांचे पहिले बँक खाते सुरू करण्यात आले. त्यातून गरिबी व दारिद्याचे दुष्टचक्र संपण्याची आशा आहे. गेटस फाउंडेशनच्या पाहणीनुसार ४७ टक्के महिलांची आता बँक खाती आहेत. महिलांमध्ये कौशल्ये विकसित करणे व त्यांना रोजगारक्षम बनवणे हा यातील हेतू आहे. प्रधानमंत्री कौशल विकास योजनेत दारिद्यातून बाहेर पडण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिले जातात. त्यात महिलांनाही मोठी संधी आहे. सुकन्या समृद्धी योजना 'बेटी बचाव बेटी पढावो' अंतर्गत राबवली असून त्यात जून २०१६ मध्ये ८६ लाख खाती सुरू करण्यात आली.

**निष्कर्ष**

विविधांगी पण एकजिनसी लोकशाहीसाठी अनेक उपाययोजना केल्या जात असून त्यात पुरूषी वर्चस्वाची मानसिकता बदलली जात आहे. महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी देण्याचा प्रयत्न असून त्यांच्या विरोधातील हिंसाचार रोखण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी नवीन राष्ट्रीय महिला धोरण तयार केले जात असून त्यात आरोग्य, शिक्षण, अर्थव्यवस्था, प्रशासन, निर्णय क्षमता, हिंसाचारास प्रतिबंध, गृह निर्माण व पायाभूत सुविधा, पेयजल योजना, क्रीडा, सामाजिक सुरक्षा, मदत सुविधा यावर भर दिला जात आहे. महिलांसाठी सायबर क्षेत्र सुरिक्षत केले जात असून कामाच्या ठिकाणी वेतनात भेदभाव दूर केला जात आहे. घटनात्मक तरतुदीनुसार कायदे महिलांसाठी अनुरूप केले जात असून त्यात त्यांना न्याय दिला जात आहे. एकल मातांच्या गरजा ओळखून त्यांना सुविधा दिल्या जात असून त्यांच्या उद्योग क्षमतेला संधी दिली जात आहे. २०१५ नंतर देशाचा विकास कार्यक्रम हा लिंगभाव समानतेवर आधारित असून त्यात संबंधित व्यक्ती , संस्था, नागरी समुदाय व खासगी क्षेत्र यांचा सहभाग आवश्यक आहे.

■■■

*लेखिका भारतीय प्रशासन सेवेतील (आ. ए. एस.) अधिकारी असून भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागात सचिव पदी कार्यरत आहेत.*
email: secy.wcd@nic.in

# विषम लिंग-गुणोत्तर: मानसिकता आणि शासकीय धोरण

मेरी ई. जॉन



**१९ व्या शतकात ब्रिटीश अधिकाऱ्यांनी राजपूत आणि जाट समुदायातील लोक आपल्या मुलीला का मारतात हा शोधण्याचा प्रयत्न केला, स्वातंत्र्यानंतरही या अवस्थेत फार काही बदल झाला नाही. या मुद्याकडे गांभीर्याने पाहण्यासाठी विविध मतभेद आणि त्रुटी नेहमीच दिसून आल्या. १९८० नंतर मात्र, महानगरांतही धक्कादायक प्रकार समोर येण्यास सुरुवात झाली.**

भारतात अगदी ब्रिटीश काळापासून विषम बाल लिंग-गुणोत्तर प्रमाण हा आपल्या इतिहासातील प्रमुख मुद्दा राहिला आहे. १९७० च्या दशकात मुख्य समस्या म्हणून याकडे लक्ष दिले. १९ व्या शतकात ब्रिटीश अधिकाऱ्यांनी राजपूत आणि जाट समुदायातील लोक आपल्या मुलीला का मारतात हा शोधण्याचा प्रयत्न केला, स्वातंत्र्यानंतरही या अवस्थेत फार काही बदल झाला नाही. या मुद्याकडे गांभीर्याने पाहण्यासाठी विविध मतभेद आणि त्रुटी नेहमीच दिसून आल्या. १९८० नंतर मात्र, महानगरांतही धक्कादायक प्रकार समोर येण्यास सुरुवात झाली. दिल्ली, अमृतसर, मुंबई या शहरांमध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्भात मुलगा आहे की मुलगी हे पाहून, मुलगी असल्यास गर्भपात करण्याचे प्रमाण वाढले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्यात येत असल्यामुळे, भारतात गर्भधारण पूर्व आणि प्रसूती पूर्व निदान तंत्रज्ञान (पीसी-पीएनडीटी) कायदा अस्तित्वात आला. मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारच्या कामात अडकलेल्या डॉक्टर आणि रेडिओलॉजिस्टीस यांना अटक करण्यासाठी व्यापक मोहीम उघडण्यात आली. मात्र, मोठमोठ्या रुग्णालयांमध्ये विविध पळवाटा काढण्यात आल्या. त्यासाठी प्रशासनाकडून धाडसी पावले उचलण्याची गरज होती (फरीदाबाद आणि हैदराबादमध्ये काही प्रमाणात कारवाई झाली), तर काही ठिकाणी गैर-शासकीय संस्था (एनजीओ) आणि प्रसारमाध्यमांनी हे काम केले (राजस्थान आणि महाराष्ट्रातील बीड जिल्हा). मात्र, अशाप्रकारची कारवाई ही गर्भपात करण्यांविरुद्ध सरसकट उचित नसल्याचा एक मतप्रवाह होता. गर्भपात (भारतीय समाजव्यवस्थेत हा स्त्रीचा अधिकार नाही, केवळ कुटुंबनियोजनाच्या नावाखाली हा प्रकार सुरू आहे). मात्र, खरंच ज्या स्त्रीला गर्भपाताची आवश्यकता तिच्यासाठी हे सर्व कठीण होऊन बसले.

## बदलती विचारसरणी

केवळ 'मानसिकता' हेच एकमेव कारण आहे ज्यामुळे लोक गर्भलिंग निदान चाचणी करतात. खूपवेळा आपण ऐकतो की, लोकांची मानसिकता हेच समस्येचे मूळ आहे आणि ही मानसिकता बदलण्याची आता आवश्यकता आहे. मात्र, 'मानसिकता' म्हणजे नक्की काय ? शब्दकोशानूसार जर 'मानसिकता'

शब्द पाहिला तर, त्याचा अर्थ 'एका व्यक्तीने आखून दिलेला विचार' आणि त्याचे उदाहरण म्हणून 'हा प्रांत अजूनही मध्ययुगीन मानसिकतेत आहे'. मला वाटते ही व्याख्या आणि उदाहरण दोन्ही लिंग निवडीचे यथार्थ वर्णन करते. आपल्याला माहित आहे की, अशाप्रकारचे वर्तन करणाऱ्या कुटुंबाचे मुलगा आणि मुलगी याविषयीची मते ठराविक असतात. त्यांची ही मते पारंपरिक पद्धतीने पिढ्यान पिढ्या चालत आलेली आहेत. आपण जेंव्हा म्हणतो की 'मानसिकता' बदलण्याची आवश्यकता आहे, तेंव्हा त्याचा अर्थ असा होतो की, अशाप्रकारच्या व्यक्तींनी पारंपरिक पद्धती बाजूला ठेवून आधुनिक विचारसरणी अंगीकारली पाहिजे.

विषम लिंग-गुणोत्तराविषयी आम्ही केलेल्या संशोधनानुसार, असा विचार ही समस्या समजून घेण्यासाठीची अतिशय अपूर्ण समज होय. आपण जेंव्हा विचार करतो की, अशा लोकांची वर्तणूक की कालसंगत नाही. पण आपल्याला आजच्या काळात कुटुंबांना मुलगा आणि मुलगी याविषयी काय वाटते ते पाहण्याची गरज आहे. सध्या कुटुंबनियोजन हे केवळ पारंपरिक पद्धती आणि रुढींवर आधारीत नाही, तर त्यांना भविष्यात कशाप्रकारची संसाधने उपलब्ध होतील याचाही विचार केला जातो. म्हणून आपणास लोकांचा दृष्टीकोन आणि मते याकडे पाहावे लागेल. ही मते आजच्या काळानूसार सामाजिक आणि आर्थिक परिप्रेक्षानूसार बदलती आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, सद्यस्थितीत कुटुंबे बाळ हवे की नको आणि त्याला कशाप्रकारे मदत करता येईल, या दोन विचारात आहे. आधुनिक समाजामुळे हा विचार रुजला आहे. (तपशील, जॉन ईटी ए एल २००८ यूएन वुमन २०१५)

याचा अर्थ असाही होतो की आपल्याला हेही प्रश्न उपस्थित करावे लागतील: १९८० पासून उपलब्ध असलेले आधुनिक तंत्रज्ञान, गेल्या काही दशकातील अशा घडामोडी ज्यामुळे निर्णय प्रक्रिया प्रभावित झाली आहे? कुटुंबं ही कितपत भावनाप्रधान, संवेदनशील आहेत?

सर्वप्रथम, लक्षात घेतले पाहिजे की, बालक लिंग गुणोत्तराचे घटते प्रमाण हे भारताच्या १९९० च्या आर्थिक सुधारणांशी निगडीत आहे, हा योगायोग आहे. या दशकात प्रचंड आर्थिक वाढ झाली. आर्थिक विकास मोठ्या प्रमाणावर झाला असला तरी, या विकासाची फळे ही समन्यायी नव्हती. मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली नाही. याचा सर्वात मोठा फटका समाजातील महिलांना बसला. जी कुटुंबं दारिद्र्यात नाहीत, पण आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याकडे लक्ष देतात, त्यांनी लिंग निवडीची प्रक्रिया अवलंबण्यावर जोर दिला. मुलांमध्ये 'गुंतवणूक' करणे सोपे आहे हे लक्षात आल्यानंतर त्यांनी लिंग निवड चाचणीकडे मोर्चा वळवला. जी कुटुंबं म्हणत असत की, एक मूल हवे आहे, त्याचा गर्भितार्थ असा आहे की, त्यांना मुलगा आहे, फार तर नंतर मुलगी झाल्यास हरकत नाही. अशाप्रकारची कुटुंबं ही 'आधुनिक' या सदरात मोडणारी होती. कारण त्यांना मुलांची योग्य काळजी आणि पोषण, चांगले शिक्षण, योग्य वयात स्थिरस्थावर, त्याच्यासाठी चांगली नोकरी आणि मुलीसाठी योग्य वर निवडणे अशी ती प्रक्रिया होती. पण, या केवळ बोलण्याच्या गोष्टी ठरल्या. जेंव्हा मुलीचा सांभाळ करण्याचा मुद्दा येत असे, त्यामुळे अशाप्रकारच्या आर्थिक आणि सांस्कृतिक अनिश्चितेमुळे बरीच कुटुंबं आपली 'मानसिकता' दाखवून देत. बऱ्याच वेळा त्यांचा मुलगी नको हाच विचार असे.

---

***सध्या कुटुंबनियोजन हे केवळ पारंपरिक पद्धती आणि रुढींवर आधारीत नाही, तर त्यांना भविष्यात कशाप्रकारची संसाधने उपलब्ध होतील याचाही विचार केला जातो. म्हणून आपणास लोकांचा दृष्टीकोन आणि मते याकडे पाहावे लागेल. ही मते आजच्या काळानूसार सामाजिक आणि आर्थिक परिप्रेक्षानूसार बदलती आहेत.***

---

**शासकीय योजनांची निर्णायक भूमिका**

अशाप्रकारच्या परिस्थितीत, शासनाने आपली सर्व साधने वापरली पाहिजेत, जेणेकरुन अशाप्रकारच्या कुटुंबांना योग्य तो संदेश जाईल. आपण पाहिले की, अशाप्रकारची कुटुंबं ही गरीब नाहीत, तर एक परिपूर्ण कुटुंबे कशा पद्धतीने होईल, त्यासाठी एक मुलगा, एक मुलगी असा विचार करणारी आहेत. म्हणून अशी लोकं लिंगनिदान चाचणीकडे वळतात. २००१ च्या जनगणनेत दिसून आले की, बऱ्याच राज्यांमध्ये ०-६ वयोगटामध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण विषम आहे. त्यानंतर राज्य पातळीवर बऱ्याच योजना सुरू करण्यात आल्या. 'अपनी बेटी अपना धन' ही योजना मुलीचे लग्न कमी वयात करु नका असा संदेश देणारी होती. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांनी आपल्या मुलीचा विवाह १८ वर्षाची

झाल्यानंतरच करावा, हा त्याचा उद्देश होता. बऱ्याच राज्यांमध्ये अशाप्रकारच्या योजनांतर्गत काही अटींवर रोख रक्कमही देण्यात आली. हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, दिल्ली आणि मध्यप्रदेश ही ती राज्ये होत. लाडली, धनलक्ष्मी अशा योजनांच्या माध्यमातून कुटुंबांना मुलीच्या नावे बँक खाते उघडण्यासाठी विविध सवलती देण्यात आल्या.

अशा योजनांचा उद्देश हाच होता की, कुटुंबांना मुलगी म्हणजे ओझे वाटता कामा नये, तिच्यासाठीची आर्थिक तरतूद करणे सुलभ व्हावे. अशा योजनांवर बराच अभ्यास झाला आहे (आयसीआरडब्ल्यू २०१४, शेखर २०१२)- यापैकी काहींनी नोंद केली आहे की, कुटुंबांना सरकारकडून आर्थिक मदत मिळाल्यामुळे मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण काही अंशी वाढले आहे. तर काहींचे असे निरीक्षण आहे की, अशा योजनांचा लाभ घेण्यासाठी बऱ्याच जाचक अटी हा एक मुख्य अडथळा ठरला. दारिद्र्य रेषेखालील कुटुंब हा अशा योजनांचा प्रमुख लाभार्थी असावयास हवा, हा प्रयत्न असतो. तर, काहींच्या मते अशा योजनांमुळे मुलगी म्हणजे आर्थिक बोजा हेच समीकरण काही कुटुंबांच्या मनावर ठासते.

दोन वर्षांपूर्वी केंद्र सरकारकडून एका नव्या योजनेची सुरुवात करण्यात आली, ती म्हणजे 'बेटी बचाओ बेटी पढाओ'. त्यासाठी १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली. हरियाणासारख्या राज्यात या योजनेविषयी माहिती देणारी मोठ मोठी होर्डिंग्ज बस, रस्ते आणि इतर रहदारीच्या ठिकाणी लावण्यात आली. मात्र, या योजनेअंतर्गत आर्थिक लाभ नाही. जो निधी आहे तो सर्व संवाद आणि प्रचारासाठी आहे. समस्या अगदी प्राथमिक आहे. गर्भलिंग निदान चाचणी करणाऱ्या कुटुंबांची मानसिकता बदलणे हाच प्रमुख उद्देश असला पाहिजे. पण, लोक अजूनही रुढी आणि परंपरा यामध्येच अडकले आहेत. मात्र, अशा योजनांचे दुर्दैव म्हणजे काही प्रमुख योजना जसे एकात्मिक बाल विकास योजना (आयसीडीएस), सर्व शिक्षण मोहीम आणि शिक्षणाचा हक्क (राईट टू एज्युकेशन) या सर्व योजनांसाठी आर्थिक तरतूद फारच कमी आहे. बालकांना अगदी प्राथमिक अवस्थेत योग्य पोषण आणि शिक्षण देण्याविषयीच्या या योजना आहेत.

---

***गर्भलिंग निदान चाचणी करणाऱ्या कुटुंबांची मानसिकता बदलणे हाच प्रमुख उद्देश असला पाहिजे. पण, लोक अजूनही रुढी आणि परंपरा यामध्येच अडकले आहेत. मात्र, अशा योजनांचे दुर्दैव म्हणजे काही प्रमुख योजना जसे एकात्मिक बाल विकास योजना (आयसीडीएस), सर्व शिक्षण मोहीम आणि शिक्षणाचा हक्क (राईट टू एज्युकेशन) या सर्व योजनांसाठी आर्थिक तरतूद फारच कमी आहे.***

---

अगदी महत्त्वाचे म्हणजे, लिंग निदानावर खरेच उपाययोजना करावयाची असेल तर शासनाने आपली धोरणे कृतीत दाखवून दिली पाहिजेत. लोकांची मानसिकता बदलण्यासाठी सर्वप्रथम जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अगदी प्राथमिक पातळीवर परिवर्तनासाठी पालकांना मुलगा आणि मुलगी हा भेद दूर करावयास सांगणे. मुलींच्या लैंगिक सुरक्षिततेविषयी तिच्याशी पालकांनी चर्चा करणे. आजच्या युवकाला खात्री आहे की, कुटुंबाच्या मदतीशिवाय तो आपले भविष्य साकारु शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

■■■

*लेखिका सेंटर फॉर वूमन डेवलपमेंट येथे वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. त्या पूर्वी सेंटर फॉर वूमन्स स्टडी येथे संचालिका पदावर कार्यरत होत्या. तसेच जवाहरलाल नेहरु विद्यीपाठात सहायक प्राध्यापक आणि वूमन स्टडी प्रोग्रामच्या संचालिका होत्या.*

gmail: maryejohn1@gmail.com

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# ‘सेवा’: महिलांचे आर्थिक सबलीकरण

इला रमेश भट्ट



**गांधीजींकडून आम्ही जनतेच्या दृष्टीकोनातून अर्थव्यवस्थेचा अर्थ समजून घेण्यास शिकलो. गांधीजींचे विचार व त्यांच्या व्यापक जीवनशिकवणूकींतूनच सेवा-** Self Employed Women's Association **ही निरंतर चळवळरूपी संस्थात्मक रचना सुरू करण्याची कल्पना सुचली. सेवा चळवळी अंतर्गत अवघडपणाला फाटा देऊन आम्ही साधेपणाचे तत्व स्वीकारले आहे.**

आमच्या लहानपणीची वर्षे म्हणजे भारताच्या पारतंत्र्याचा काळ होता. त्यावेळी आपल्या देशातील जनता ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी झगडत होती. देशभक्तीच्या विचारांनी प्रेरित होऊन आम्ही नवयुवकांनीही मनोमन आपल्या देशाची नव्याने जडणघडण करण्यासाठी जीवन सर्मपित करण्याची प्रतिज्ञा केली होती. आमच्या या विचारांमागचे खरे प्रेरणास्त्रोत होते महात्मा गांधी. गांधीजींच्या लेखी वैयक्तिक स्वच्छता व देशाची राजकिय स्वायत्तता या दोन्ही बाबींना एकसमान महत्त्व होते. याशिवाय गांधीजींना सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व गावागावांतील तलाव, तळी व लहान मोठ्या जलसाठ्यांची शुध्दता ही व्यक्तीगत आध्यात्मिक पावित्र्याएवढी आवश्यक होती. गांधीजींकडून आम्ही जनतेच्या दृष्टीकोनातून अर्थव्यवस्थेचा अर्थ समजून घेण्यास शिकलो. गांधीजींचे विचार व त्यांच्या व्यापक जीवनशिकवणूकींतूनच सेवा- Self Employed Women's Association ही निरंतर चळवळरूपी संस्थात्मक रचना सुरू करण्याची कल्पना सुचली.

सेवा चळवळी अंतर्गत अवघडपणाला फाटा देऊन आम्ही साधेपणाचे तत्व स्वीकारले आहे. भारतातील सर्वसामान्य जनतेला स्वावलंबनातून स्वयंविकासाची शिकवण देतांना सरलतेला गांधीजींनी नेहमीच केंद्रस्थानी मानले होते. गांधीजींचे असे प्रामाणिक मत होते की गुंतागुंत किंवा अवघडपणातून कधीही प्रगती साधता येत नाही. गांधीजींचे दुसरे महत्वाचे जीवनतत्व म्हणजे अहिंसा. गांधीजी मानत की, हिंसा ही मूलत: कधीही स्वातंत्र्याशी साधर्म्य साधू शकत नाही. थोडक्यात, हिंसा असेल तिथे सर्वांना स्वातंत्र्याची अनुभूती लाभत नसते. तिसरे तत्व म्हणजे कर्म, कामगारांना योग्य मान, समान व न्याय्य वागणूक देणे. याचे विश्लेषण देताना गांधीजींनी सांगितले आहे की, कर्म करणे किंवा कष्ट करणे हा निसर्गाचा नियम आहे. कष्टकरी म्हणजेच निर्मितीच्या प्रक्रियेतील कोणत्याही स्तरातील कामगारांची होत असलेली पिळवणूकच देशातील सध्या असणाऱ्या आर्थिक असमतोलास कारणीभूत ठरली आहे. कारण कामगारांचे शोषण करणे म्हणजे कर्माच्या मूलसिध्दांताचे म्हणजेच, सर्वासाठी त्यांना योग्य असे काम व उपजीविकेची संधी, या नियमाचे उल्लंघन करण्यासारखे आहे. चौथे तत्व म्हणजे माणूसकी, सदाचार किंवा नीतीमत्तेला धरून वागणे. अशाप्रकारे, साधेपणा, अहिंसा, कष्टकऱ्यांना समान

व न्याय्य वागणूक माणूसकी व नीतीमत्ता या चार अधिष्ठानांवर आपल्या देशाची स्वतंत्र व्यवस्था घडवण्याचा संस्कारच गांधीजींनी घालून दिला होता.

सेवा या चळवळी अंतर्गत सर्वसमावेशक, समग्र आणि एकात्मिक विकासाची कल्पना समोर ठेवण्यात आली आहे. तसेच विकासप्रक्रियेत सर्वसामान्य व्यक्ती विशेषत: तळागाळातील श्रमिक, कष्टकरी जनतेला केंद्रस्थानी मानण्यात आले आहे. विकास साधणे म्हणजे सर्वार्थाने विधायक कार्य करणे. एकमेकांच्या वाट्याला आलेल्या कामांचा सहसंबंध लक्षात घेऊन त्या-त्या कामांतून योग्य परिणाम साधणे, ज्याचा लाभ त्या त्या व्यक्तींना, त्यांच्या कुटुंबांना, सभोवतालच्या लहान-सहान समूदायांना, समाजाला, देशाला व पर्यायाने जगालाही मिळवून देणे, असा सर्वव्यापक विचार सेवा चळवळीचा गाभा आहे. कार्यातून स्वयंविकास साधण्याबरोबर जबाबदार नागरिक घडविण्याची एक निरंतर चळवळच सेवा च्या माध्यमातून साकारते आहे.

सेवा चळवळीचे स्वरूप निश्चित करतांना कार्याला सर्वात जास्त महत्वस्थानी मानण्यात आले होते. याचे कारणही आपल्या मूल्यशिक्षणातील तसेच गांधीजींनी घालून दिलेल्या विचारांत आहे. क्रियेविना, कर्माविना मनुष्याच्या जीविताला काहीही अर्थ नसतो. कर्म हेच माणसाचे जीवन सर्वस्व असते. या सिध्दांताला धरूनच सेवा चळवळीत आम्ही उत्पादक कार्याला महत्व दिले आहे. विकास व वाढीला चालना देईल अशा स्वरूपाच्या निर्मिती कार्याचा सेवा उपक्रमात समावेश करण्यावर भर देण्यात आला आहे. गरिब महिलांना सेवा चळवळीत काम करतांना पाहिल्यावर असे लक्षात आले की या महिलांसाठी कष्ट उपसणे हेच त्यांचे जीवन होते. सेवा चळवळीत आल्यावरही त्यांनी आपल्या कष्टाच्या कामातच जीवनाचा प्रमुख आधार नव्याने शोधला. आपल्या कामांतूनच त्यांनी त्यांची नवी ओळख व उपजीविकेचे सबळ साधन नव्याने प्राप्त केले.

जीवनावश्यक वस्तू व सेवांची निर्मिती व उत्पादन प्रक्रियेतून समाजाची व देशाची जडणघडण होत असते. परंतु दारिद्र्य किंवा गरिबी देशाच्या समाज व अर्थव्यवस्थेचा समतोल ढासळेल, अशी परिस्थिती उत्पन्न करते. जिथे गरिबी असते, तेथे व्यक्तिगत, सामूदायिक, पर्यावरणीय व नैसर्गिक अशा प्रत्येक टप्प्यावर शोषण होत असते. गरिबी

***जीवनावश्यक वस्तू व सेवांची निर्मिती व उत्पादन प्रक्रियेतून समाजाची व देशाची जडणघडण होत असते. परंतु दारिद्र्य किंवा गरिबी देशाच्या समाज व अर्थव्यवस्थेचा समतोल ढासळेल, अशी परिस्थिती उत्पन्न करते. जिथे गरिबी असते, तेथे व्यक्तिगत, सामूदायिक, पर्यावरणीय व नैसर्गिक अशा प्रत्येक टप्प्यावर शोषण होत असते. गरिबी म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ग, जमिनीची वा संपत्तीची मालकी, लिंग, अशा सर्वच बाबींवरून होणारा अन्याय व भेदभाव व त्यानुषंगाने सोसावा लागणारा दुबळेपणा.***

म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ग, जमिनीची वा संपत्तीची मालकी, लिंग, अशा सर्वच बाबींवरून होणारा अन्याय व भेदभाव व त्यानुषंगाने सोसावा लागणारा दुबळेपणा. हा दुबळेपणाही आर्थिक, सामाजिक, मानसिक, आध्यात्मिक अशा सर्व प्रकारचा असतो. गरिबी माणसाला अशा बिकट व दुबळ्या अवस्थेला नेऊन पोहचवते की जिथे लोक स्वत:वरचा, स्वत:च्या क्षमतांवरचा विश्वास गमावून बसतात व गैरसमजूतींना, भूलथापांना, कोत्या विचारांना खरे मानायला लागतात. गरिबी ही एक अशा प्रकारची सतत होणारी हिंसा आहे ज्यास समाजमान्यता लाभली आहे. दारिद्र्य येणे व स्वातंत्र्य गमावणे या दोन जवळजवळ एकसारख्याच अवस्था आहेत. असेही म्हणता येईल की, देशातील एखादा सर्वात गरिब माणूस त्याला लाभलेले मूलभूत अधिकार सहज वापरू शकत असेल तरच तो देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहे, असे म्हणता येईल. सेवा चळवळीतील श्रमिक महिलांच्या सोबत काही वर्षे काम केल्यावर आपल्या देशासमोरील गरिबी, दिनदुबळी जनता विशेषत: अन्याय्य वागणूक व पिळवणूक सहन करणाऱ्या महिला त्यांचे जीवन इ. मूलभूत समस्यांचे स्वरूप जवळून पाहायला मिळाले. त्यावर उपाय शोधतांना अनेकदा संबंधित महिला फारच असहाय्य असुरक्षित आहेत अशी जाणीव तीव्र होईल, असे प्रसंग आले. पण याच महिलांनी समूदायाची शक्ती, सांघिकतेचे बळ काय किमया करू शकते, हे ही प्रत्यक्ष दाखवून दिले आहे.

सेवा चळवळीत कामाच्या अनुषंगाने सर्व श्रमिक महिला एकत्र येतात व एक जोड यंत्रणा स्थापन करतात. तसेच विविध जोडउद्योगांशी संबंधित कामांचे स्वरूप व गरजा लक्षात घेऊन त्या-त्या उद्योग समूहांत महिलांच्या सेवा व्यापारी संघटनाही स्थापन केल्या आहेत. या संघटनांच्या मदतीने मोठ्या उद्योजकांकडून किंवा व्यापारी, कंत्राटदार, सरकारी यंत्रणेतील संबंधित व्यक्तींकडून तसेच एकूण व्यवस्थेकडून होणारे महिलांचे आर्थिक शोषण रोखण्यास मदत होते.

सेवा उपक्रमात सहकारी तत्वावर सेवा बँकेचीही स्थापना करण्यात आली आहे. या बँकेमार्फत महिलांच्या आर्थिक गरजा पूर्ण करणारी सक्षम यंत्रणाच कार्यान्वित करण्यात आली आहे. श्रमिक महिलांना त्यांच्या व्यवसायविषयक गरजांसाठी, मालमत्ता वा जमिन खरेदी इ. साठी रक्कम कर्जाऊ देणे, मासिक बचत करणे, स्त्रीधन सुरक्षित ठेवणे इ. सुविधा सेवा बँकेमार्फत दिल्या जातात. तसेच देशाच्या एकूण उत्पादन प्रक्रियेचा एक भाग बनण्यासाठी सहकार तत्वावर आधारित निर्मिती व्यवसायातही सेवा उपक्रमाने बाजी मारली आहे. याबरोबरच सेवा चळवळीतील महिलांसाठी सामाजिक सुरक्षेचे जाळेच विकसित करण्यात आले आहे. याद्वारे सर्व सहभागी कष्टकरी महिलांच्या आरोग्य, कुटुंब वीमा व प्रसूती विषयक गरजा पूर्ण होतील, याची सोय केली जाते. सेवा अंतर्गत पहिल्यापासूनच स्थानिक ते जागतिक स्तरावरील बाजारपेठांत महिला शेतकरी व महिला हस्तव्यावसायिकांचे मिळून एक मोठे व व्यापार सुलभतेचे जाळे तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच महिलांना व्यापार, उद्योग व त्यांच्या व्यवसायाशी संबंधित कौशल्य व गुणविकासासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र तसेच नियमित अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शाळाही सेवा अंतर्गत चालवल्या जातात. श्रमिक व कष्टकरी महिलांना त्यांच्या क्षमतांचा विकास करणे, त्यांच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे हाताळण्याचे व व्यापक अर्थाने जगात प्रभाव पाडता येईल अशी मानसिकता जागृत करण्याचे काम सेवाच्या शाळांमार्फत केले जाते.

त्यामुळे सेवा हा काही एक प्रकल्प नव्हे. ती कोणती तरी एक संस्था पण नाही. तसेच सेवा म्हणजे कोणत्याही प्रकारची आर्थिक व्यवस्था किंवा पतपेढी ही नव्हे. सेवा म्हणजे उपलब्ध असणाऱ्या बाबींतून प्रत्यक्षात आवश्यक असणाऱ्या संधींची व परिस्थितीची निर्मिती करून शाश्वत संतुलित विकास घडवून आणणारी निरंतर चळवळ आहे. सेवा म्हणजे वैयक्तिक व सामूदायिक स्तरावर आर्थिक निर्णय घेण्याचे स्वावलंबित्व. श्रमिक कष्टकरी महिलांना खऱ्या अर्थाने सबलीकरणाकडे नेणारा मार्ग म्हणजे सेवा.

वैश्विक स्तरावर नव्या सहस्त्रकासाठी जी विकास उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत, ती माझ्या मते तळागाळातील गरिब व दुर्लक्षित लोकसमूदायांचा विचार न करता ठरवली गेली आहेत. विकासाची भाषा म्हणजेच विकास घडविण्याच्या प्रयत्नांतून साधला जाणारा संवाद हा लोकांसाठी असायला हवा. या संवादात सर्व स्तरांतील लोकांचा समावेश व्हायला हवा. प्रत्यक्षात मात्र या संवाद प्रक्रियेत दिनदुबळ्या शक्तिहिन लोकांना सहभागी करून घेतले जात नाही. मुळात, गरिबी ही अवस्था एकप्रकारची शक्तिहिनता दाखवते. दारिद्र्य हे एक असे लक्षण ठरते ज्यामुळे लोकांना स्वयंनिर्णय घेण्याचे, उपलब्ध साधनसंपत्ती वापरण्याचे अधिकारच काढून घेतले जातात. दारिद्र्याबरोबर येणारी शक्तिहिनता व्यक्तीचे अधिकार मर्यादित करते व त्यांच्या जीवनाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही हिरावून घेते. यासाठी दारिद्र्य म्हणजे दुर्बलता हा समज दूर करण्याचे उपाय योजले पाहिजेत. सेवा चळवळीत आम्ही गरिबीवर मात करण्याच्या कामाची सुरूवात श्रमिक महिलांमधील दुर्बलतेची, अगतिकतेची मानसिकता बदलण्याने करतो. याकरिता या श्रमिक समूदायांना, विशेषत: कष्टकरी महिलांना त्यांनी करावयाची कामे, त्यांची उपजीविका चालवण्याचे तंत्र, त्यांचे आरोग्य, याबरोबरच शिक्षण, शहरीकरण, व निर्वासितता, शांतता, व येणारे भविष्य इ. संदर्भात निर्णय घेण्याचे, या बाबतीत स्वतंत्र विचार करून आपापले उद्दिष्ट निश्चित करावयाची सवय लावली आहे. व्यापक अर्थाने राष्ट्राशी संबंधीत असणारे हे सर्व मुद्दे असले तरीही याबाबींशी नेमका संबंध येणाऱ्या समूदायांना या बाबतीत धोरण तयार करतांना विचारात घेतलेले नव्हते. खरे पाहता, अर्थव्यवस्था व आर्थिक धोरण हे प्रत्यक्षात आर्थिक व्यवस्थेचा पाया असणाऱ्या श्रमिक लोकांकडून त्यांचा विचार करून ठरवले गेले पाहिजे. नाहीतर विकास व उपजीविकेचे स्त्रोत एकसंध न राहता समांतर व परस्परविरोधी गोष्टी बनतील.

***विकासाची भाषा म्हणजेच विकास घडविण्याच्या प्रयत्नांतून साधला जाणारा संवाद हा लोकांसाठी असायला हवा. या संवादात सर्व स्तरांतील लोकांचा समावेश व्हायला हवा. प्रत्यक्षात मात्र या संवाद प्रक्रियेत दिनदुबळ्या शक्तिहिन लोकांना सहभागी करून घेतले जात नाही. मुळात, गरिबी ही अवस्था एकप्रकारची शक्तिहिनता दाखवते.***

आर्थिक सुधारणा व महिलांचे सबलीकरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू. सेवा चळवळीच्या प्रवासात प्रकर्षाने पटलेल्या काही याचिका येथे मांडल्या आहेत. यात पहिली याचिका अशी की, आर्थिक सुधारणेच्या विशेषकरून अतिमहत्वाच्या रोजगार क्षेत्रांतील व अन्न, वस्त्र, जल, निवारा, प्राथमिक आरोग्यसेवा, शिक्षण, व प्राथमिक स्तरावरील बँकींग सेवा इ. बाबतच्या

सुधारणा गरिब व कष्टकरी महिलांना केंद्रस्थानी मानून व्हायला पाहिजेत. दुसरी याचिका अशी की, गरिबीच्या समस्येवर उपाय म्हणून करण्यात येणाऱ्या या सुधारणांमध्ये प्रत्येकाला उत्पादक कार्य करण्याची व त्यायोगे उपजीविकेचे साधन मिळण्याची व्यवस्था तयार करण्याचे धोरण प्रामुख्याने राबवले जावे. तिसरा विचार असा की, गरिबांसाठी सुरू करण्यात आलेल्या अनेक विकास योजनांपैकी व्यवहार्य प्रमाणात वाढ व विकासाची संधी निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या योजनांमध्ये पुरेशा प्रमाणात गुंतवणूक करणे तसेच श्रमिक गरिबांसाठी सर्वार्थाने व्यापक असे सामाजिक सुरक्षा कवच विकसित करावे. याबाबतीत एक गोष्ट समजून घ्यायला हवी ती म्हणजे प्रत्येक टप्प्यावर देशाची आर्थिक रचना ही त्या देशातल्या सामाजिक सुरक्षेशी थेट संबंधित आहे. पाचवी याचिका अशी की, स्थानिक व जागतिक बाजारपेठांत आपले उत्पादन पोहचविता येईल, या दृष्टीने तळागाळातील श्रमिक महिलांच्या क्षमतांचा विकास करण्याचे विविध उपाय विकसित करणे. या याचिकांतील मुद्दे एका सौम्य पण त्याचवेळी विकासाला पोषक असा वातावरणाची निर्मिती करणाऱ्या अर्थव्यवस्थेची बांधणी करण्यावर भर देणारे आहेत. एकाप्रकारे स्वत्वाला, समूदायाला व विश्वाला पोषक ठरेल अशी व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न व्हायला हवे .

आजवरच्या अनुभवातून हे कार्य जर कोणी योग्य प्रकारे करू शकत असेल तर त्याचे उत्तर म्हणजे महिला. कारण स्त्रिया या समूदायांची नव्याने पुनर्बांधणी करणाऱ्या महत्वाच्या दुवा आहेत. स्त्रियांच्या सर्वांगिण विकासाचा पाठपुरवठा केल्यास स्थिर समाज तयार करण्यास भरीव योगदान देण्यासाठी अनेक महिला सरसावून पुढे येतील.प्रसंगी महिला कार्यकर्ता, प्रदाता, काळजीवाहक, शिक्षक, सेवांचे विस्तार करणाऱ्या दुवा अशा अनेक भूमिका समर्थपणे पेलू शकतात. कौटुंबिक पातळीपासून ते थेट वैश्विक स्तरापर्यंत नातेबंधांना विकसित करून चालना देण्याऱ्या खऱ्या प्रेरणास्त्रोत या महिलाच आहेत. त्याच निर्मात्या व जतनकर्त्या आहेत. महिलांचा सहभाग व महिलांचे प्रतिनिधीत्व असणे हा शांतता प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. कारण महिलाच खऱ्या अर्थाने या संपूर्ण प्रक्रियेला भक्कमपणा, कल्पक उभारणी व शाश्वत पर्याय प्रदान करू शकतात. शिवाय, स्त्रिया जर व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असतील तर त्यांच्याकडून होणारे उत्पादक कार्य संपूर्ण समाजाला

***समाज विकासाच्या या प्रक्रियेत प्रत्येक स्तरातील जनतेला योग्य काम मिळवून देण्यावर सर्वाधिक भर देण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. श्रमिक समूदायांसाठी काम मिळवून देणे म्हणजे त्यांना कारखान्यात राबायला लावणे किंवा कमी वेतनावर मजदूरीचे काम देणे, किंवा व्यवस्थापकाच्या हाताखाली सांगकाम्या गड्यासारखे कष्ट करण्याचे काम देणे नव्हे; कारण अशा प्रकारचे काम म्हणजे त्यांचे एक प्रकारचे शोषणच ठरते.***

एकत्र बांधून ठेवेल. कारण हाती काम असले की स्थिर समाज उभारणीला प्रोत्साहन मिळते. भविष्याचा केवळ विचार नाही तर भविष्याचे नियोजन करण्याची सवय लागते. स्थावर मालमत्ता मिळवण्याबरोबर आर्थिक दुर्बलतेवर मात करण्याची क्षमता विकसित होते. पुढील पिढीसाठी गुंतवणूक करण्याची कल्पकता व दूरदृष्टी सतत कृतीशील राहण्यास प्रोत्साहित करते. यामुळे जीवन केवळ जगण्यापुरते सीमित राहत नाही तर चांगल्या भवितव्यासाठी सोय करण्याची सवय जडते. कार्यातून स्थैर्य व शांतता प्रस्थापित होण्यास हातभार लागतो. व्यवस्थेची पाळेमुळे घट्ट होऊन समूदायांचा विकास होण्यास मदत होते व सर्वार्थाने जीवनाला परिपूर्णता येते.

समाज विकासाच्या या प्रक्रियेत प्रत्येक स्तरातील जनतेला योग्य काम मिळवून देण्यावर सर्वाधिक भर देण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. श्रमिक समूदायांसाठी काम मिळवून देणे म्हणजे त्यांना कारखान्यात राबायला लावणे किंवा कमी वेतनावर मजदूरीचे काम देणे, किंवा व्यवस्थापकाच्या हाताखाली सांगकाम्या गड्यासारखे कष्ट करण्याचे काम देणे नव्हे; कारण अशा प्रकारचे काम म्हणजे त्यांचे एक प्रकारचे शोषणच ठरते. कामाचा अर्थ शेतीतील कामे, अन्नधान्य निर्मिती प्रक्रियेतील सर्व कामे व पाण्याची उपलब्धतसंबंधी करायला लागणारी व्यवस्था, पशुपालन, मासेमारी, घरबांधणी, कापडद्योग इ. पारंपारिक व्यवसायकौशल्य लागणारे लघुउद्योग व शेतीसंबंधीत व्यवसाय. ही कामे त्यांच्यातील उपजत कौशल्यांचा, त्यांच्या ताकदीचा, सहनशक्तीचा, त्यांनी परंपरेने जतन केलेल्या पध्दतींचा चांगल्या प्रकारे वापर करण्याची संधी व उपजिवीकेचे सबळ साधन मिळवून देईल. श्रमिक समूदायाला शेतीपूरक कामातून त्यांच्या स्वत्वाची, त्यांनी काही चांगलं काम केल्याचे समाधान मिळवून देईल. त्यांच्या कामातून त्यांचे स्वत:शी, त्यांच्या सहकाऱ्यांशी, सभोवतालच्या लोकांशी, पर्यावरणाशी व एकूणच जगाशी नव्याने नाते प्रस्थापित होईल.

आज आपल्यासमोर अपारंपारिक साधनसंपत्तीतून व्यवसाय संधी विकसित करण्याचे आव्हान आहे. या आव्हानावर उपाय योजतांना तारतम्य व कल्पकता बाळगून नवीन विचार रूजवायला हवेत. जसे आज आपल्याकडे अशी गरज आहे की जास्तीत जास्त झाडे लावली व वाढवली पाहिजेत. तेव्हा आपण जंगलतोडीवर उपाय म्हणून वृक्षलागवड व संवर्धनाचे कार्य अधिकाधिक फायदेशीर कसे होईल याचे मार्ग शोधले पाहिजेत. याचप्रकारे दरवेळी नवीन वस्तू किंवा उत्पादन निर्मिती करण्यापेक्षा पुनर्वापराची प्रक्रिया अधिक किफायतशीर व सुलभ करण्याचे तंत्र विकसित केले पाहिजे. तसेच वैयक्तिक मालमत्ता बनवण्याबरोबरच मोठ्या प्रमाणावर सामूदायिक स्थावर मालमत्ता निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. सहकार तत्त्वाचा अवलंब करून अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करता येईल तसेच निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देऊन बाजारपेठांची व्यावसायिकता वाढवता येईल. या बाबतीत सेवा बँकेने खूप पुढचा पल्ला गाठला आहे. अनेक गावांतील महिला बचत गटांसाठी जिल्हास्तरावरील भरवशाची बँक म्हणून सेवा बँकेचे कार्य विस्तारत आहे.

सेवा चळवळीच्या माध्यमातून मी स्वत: महिलांना बदल घडवताना पाहिले आहे. समाजाने आखून दिलेल्या संकुचित चौकटीला भेदून नव्या वाटा चोखाळण्याचे, त्यात यशस्वी होण्याचे प्रचंड सामर्थ्य स्त्रियांमध्ये आहे. सर्वसमावेशक समाजनिर्मितीसाठी व शाश्वत पर्यावरण विकासासाठी महिलांच्या नेतृत्व गुणांवर विश्वास दाखवून त्यांना पुढे येण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

आज पर्यंत महिलांना सहज उपलब्ध असणारे साधन या संकुचित दृष्टीकोनातूनच पाहण्यात आले आहे. पण आज संपूर्ण जगाला ही जाणीव होते आहे की स्त्रिया या जगाला लाभलेली अनमोल देणगी आहेत. महिला या कायम विवंचनांचे चटके सोसायला नसून त्या पुरूषांच्या बरोबरीने विकासकार्यात सक्रिय भागीदार आहेत.

महिलांच्या मार्गात जशी उद्दिष्टे आहेत तशीच मूल्ये पण आहेत. महिलांसाठी ही एक प्रक्रिया आहे. एका मोठ्या व्यवस्थेची जडणघडणीची प्रक्रिया ज्याद्वारे त्या जगणं नव्याने शिकत आहेत व सबला म्हणून स्वत:ची नवी ओळख शोधत आहेत.

सेवा चळवळीला भारतीय समाजात मान्यता मिळवायला, रूजायला, देशातल्या तळागाळातील असंख्य लोकांपर्यंत ही चळवळ पोहचायला तीस वर्षांचा प्रदिर्घ कालावधी लागला. श्रमिक महिलांनी या चळवळीला योग्य स्वरूप मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. केवळ स्वत:पुरता विचार न करता या महिलांनी त्यांच्या लगतच्या गटांचा, त्यांच्या समूदायांचा एकूण सर्वांचा व्यापक विचार समोर ठेऊन सेवा चळवळीतील उपक्रम राबवले. इप्सित परिणाम साधायला अनेकदा उशीर लागला तरी देखील जे पिछाडीवर आहेत, त्यांना सोबत नेण्याचा आग्रह सेवा चळवळीतल्या सहयोगी भगिनींनी सोडला नाही. यातून अजून एक बाब लक्षात आली ती ही की, महिला नेतृत्वाला भारंभार पुढे जायची घाई नसते. सर्वव्यापक सर्वच घटकांचा साकल्याने विचार करून सर्वांना त्यांच्या नैसर्गिक गतीने काळाच्या प्रवाहासोबत पुढे घेऊन जाण्याची प्रगल्भता महिला नेतृत्वाच्या ठायी असते.

***आजपर्यंत महिलांना सहज उपलब्ध असणारे साधन या संकुचित दृष्टीकोनातूनच पाहण्यात आले आहे. पण आज संपूर्ण जगाला ही जाणीव होते आहे की स्त्रिया या जगाला लाभलेली अनमोल देणगी आहेत. महिला या कायम विवंचनांचे चटके सोसायला नसून त्या पुरूषांच्या बरोबरीने विकासकार्यात सक्रिय भागीदार आहेत.***

आज संपूर्ण जगालाच जास्तीत जास्त महिला नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे. कारण सध्या संपूर्ण जग एका विशिष्ट आव्हानात्मक अशा स्थित्यंतरातून जात आहे. महिलांचे नेतृत्व म्हणजे मोठ्या संख्येने महिला पुढारी तयार होणे, असा अर्थ अभिप्रेत नाही. तर व्यापक अर्थाने सर्वांगिक विकासाचा समतोल राखण्याचे आव्हान लीलया पेलू शकेल अशा, महिला सापेक्ष नेतृत्वाची आज खऱ्या अर्थाने सर्व जगालाच गरज आहे.

■ ■ ■

*लेखिका एक गांधीवादी, सामाजिक कार्यकर्त्या व 'सेल्फ एम्प्लॉइड वीमेन्स एसोसिएशन ऑफ इंडिया' (सेवा) या अहमदाबाद, स्थित संस्थात्मक उपक्रमाच्या संस्थापक आहेत.*

email: bhattela@seva.org

# भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण

कमला भसीन



**केवळ भारतातच नव्हे तर जगातल्या बऱ्याच देशांमध्ये स्त्री पुरुषांमध्ये भेदभाव केला जातो. सर्व पातळ्यांवरील निर्णय प्रक्रियेपासून महिलांना दूर ठेवले जाते.अधिकारांपासून वंचित ठेवले जाते.याला कारण म्हणजे सर्वत्र प्रचलित असलेली पितृसत्ताक पद्धती. अशा समाजव्यवस्थेमध्ये महिलांपेक्षा पुरुष श्रेष्ठ मानले जातात. साधनसंपत्ती,निर्णय प्रक्रिया,आणि विचारसरणी यांच्यावर पुरुषांचे जास्त नियंत्रण असते. महिलांवरील हिंसाचार हा या पितृसत्ताक व्यवस्थेचा भागच मानला जातो.**

कुटुंबाच्या, समुदायाच्या,राष्ट्राच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी लिंगभाव समानता अर्थात स्त्री-पुरुष समानता आणि महिलांचे सक्षमीकरण अत्यंत आवश्यक आहे,हे बहुसंख्य देशांनी आज मान्य केले आहे. ज्या कुटुंबात,समाजात,देशात निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रिया आणि मुलींना सन्मानाने वागवले जात नाही,त्या मुक्त नाहीत,आनंदी नाहीत,त्या कुटुंबाची,समाजाची,राष्ट्राची भरभराट होऊ शकत नाही.तिथे आनंद नांदू शकत नाही.

केवळ भारतातच नव्हे तर जगातल्या बऱ्याच देशांमध्ये स्त्री पुरुषांमध्ये भेदभाव केला जातो. सर्व पातळ्यांवरील निर्णय प्रक्रियेपासून महिलांना दूर ठेवले जाते.अधिकारांपासून वंचित ठेवले जाते.याला कारण म्हणजे सर्वत्र प्रचलित असलेली पितृसत्ताक पद्धती. अशा समाजव्यवस्थेमध्ये महिलांपेक्षा पुरुष श्रेष्ठ मानले जातात. साधनसंपत्ती,निर्णय प्रक्रिया,आणि विचारसरणी यांच्यावर पुरुषांचे जास्त नियंत्रण असते. महिलांवरील हिंसाचार हा या पितृसत्ताक व्यवस्थेचा भागच मानला जातो.हिंसा किंवा हिंसाचाराचा धाक दाखवून महिलांना ताब्यात ठेवले जाते.संयुक्त राष्ट्राच्या म्हणण्यानुसार,प्रत्येक तीन स्त्रियांपैकी एका स्त्रीला अत्याचाराचा अनुभव येतो.याचाच अर्थ,सुमारे एक अब्ज स्त्रियांना हिंसाचाराला सामोरे जावे लागते.जगात सध्या हेच महायुद्ध चालू आहे आणि सर्वात दु:खदायक बाब अशी की ते कुटुंबातच खेळले जात आहे.

**भारतातील महिला अधिकाराच्या उतरंडीवर सर्वात खालच्या स्थानावर**

भारतातील महिलांबद्दल सर्वसाधारणपणे काही भूमिका मांडणे अवघड आहे.कारण ठिकठिकाणच्या महिलांच्या परिस्थितीमध्ये खूप फरक आढळून येतो.त्या वेगवेगळ्या वर्ग,जाती,धर्म,समुदायातील आहेत.पण त्यांच्यात एक समान धागा आहे आणि तो म्हणजे त्या बहुसंख्य जणींना पितृसत्ताक समाजरचनेचा आणि विचारसरणीचा जाच सहन करावा लागतो.पुरुषांच्या तुलनेत सर्व बाबतीतील असमानता आणि गौणत्व त्यांना अनुभवायला येते.सामाजिक आणि मानवी विकासाच्या सर्व निदर्शकांमध्ये महिलांची पिछेहाट झालेली आपल्याला दिसून येते.भारतातील स्त्रियांचे पुरुषांशी असलेले प्रमाण जगामध्ये सर्वात कमी आहे.त्यांची आयुर्मर्यादाही पुरुषांपेक्षा कमी आहे.आरोग्य,पोषण आणि शिक्षण या पातळ्यांवरदेखील त्या पुरुषांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी स्थानावर आहेत. बहुतांश महिला या कमी कौशल्याच्या आणि कमी पैसे देणाऱ्या कामांवर राबत असतात.पुरुषांपेक्षा त्यांना कमी वेतन मिळते. साहजिकच त्यांचे उत्पन्नही पुरुषांच्या तुलनेत कमी असते.

मालमत्तेवर महिलांचा अधिकार किंवा उत्पादनाच्या साधनांवर त्यांचे नियंत्रण हे अगदी क्वचितच आढळून येते.महिला कुटुंबप्रमुख असणाऱ्या घरांची संख्या आपल्या देशात आता वाढू लागली आहे.पण खेदाची गोष्ट अशी की ही सगळी अत्यंत गरीब कुटुंबे आहेत. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अगदी नगण्य आहे.संसदेमध्ये महिलांचा सहभाग कधीही १० टक्क्यांपेक्षा जास्त नाही. कायदेविषयक अधिकारांपासूनतर त्यांना दूरच ठेवण्यात आले आहे.त्यांचे आयुष्य ज्या नियमांनी चालवले जाते ते सामाजिक, आर्थिक,कायदेविषयक,राजकीय नियम बनवण्यात त्यांच्या म्हणण्याला फारच कमी किंमत असते.त्यामुळे त्या या सगळ्या व्यवस्थेच्या अंकित राहतात.

देशातील सगळ्या नव्हे पण बऱ्याचशा भागांमध्ये मुलींना प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागतो. त्यांच्यावर अनेक ओझी असतात आणि सततची भीती त्यांच्या मनामध्ये दडलेली असते.ओझे असते, उपेक्षेचे,भेदभावाचे,घरकामाचे,लहान भावंडांना सांभाळण्याचे,घराबाहेर पडून काम करण्याचे.मुली कायम भीती बाळगूनच जगत असतात.सुरुवात होते जन्माच्या आधीपासून एखाद्या स्त्रीला मुलगी होणार आहे हे कळले तर तिला गर्भपात करायला सांगतात,त्याची भीती असते, मुलींना भीती असते विषप्रयोग होण्याची. भीती असते उपेक्षित जीवन जगायला लागण्याची,आणि भीती असते ती मेली तरी कोणाला त्याचे काही न वाटण्याची.भीती असते पुरेसे प्रेम,ममता न मिळण्याची,भीती असते,कोणी काळजी न घेण्याची,पोषक आहार न मिळण्याची,वैद्यकीय मदत,शिक्षण न मिळण्याची.याशिवाय आपल्या मुलींना भीती असते लैंगिक गैरवर्तनाची. आणि हे वर्तन त्यांच्याशी लैंगिक चाळे करण्यापासून ते बलात्कारापर्यंत काहीही असू शकते. सुधारित आणि अतिशय कडक कायदे होऊनही निर्घृण सामूहिक बलात्कारांचे प्रमाण वाढतच आहे. लग्नानंतरही त्यांना एकटेपणाची,सासरच्या परिस्थितीशी जमवून घेता येईल की नाही याची,मानसिक आणि शारीरिक छळाची भीती वाटत राहते.

महिला आंदोलने,नागरी समाज संघटना यांच्यामुळे निर्माण झालेला दबाव,सरकारने केलेली कृती याचा खरोखरच सकारात्मक परिणाम महिलांची स्थिती बदलण्याबाबत दिसून आला. उदाहरणार्थ - स्त्री-पुरुष समानतेबाबत लोकांच्यात जागृती होत आहे.समाजात सध्या स्त्रीला गौण स्थान दिले जात आहे हे मान्य होऊन ते बदलण्याची गरज आहे,हे लोकांना आता पटू लागले आहे.समाजात स्त्रियांबाबत हिंसाचार घडत आहे हे आता जाणवते आहे आणि त्याचा निषेधही केला जात आहे.निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये महिलांचा सहभाग महत्त्वाचा मानला जाऊ लागला आहे.कायदेविषयक काही तरतुदींमध्ये सुधारणा घडून येत आहेत. महिलांसाठी शिक्षण आणि व्यवसायाच्या संधीही उपलब्ध होत आहेत.धोरणात्मक निवेदनांमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांबाबत विशेष जागरूकता दाखवली जात आहे.शासकीय, अशासकीय विकास संस्था,पंचायती राज्य संस्था आणि कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे.लिंगभाव समानतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आपल्या सरकारने महिला कार्यालये,आयोग,विभाग आणि मंत्रालयांची स्थापना केली आहे.

***महिला आंदोलने,नागरी समाज संघटना यांच्यामुळे निर्माण झालेला दबाव,सरकारने केलेली कृती याचा खरोखरच सकारात्मक परिणाम महिलांची स्थिती बदलण्याबाबत दिसून आला.उदाहरणार्थ - स्त्री-पुरुष समानतेबाबत लोकांच्यात जागृती होत आहे.समाजात सध्या स्त्रीला गौण स्थान दिले जात आहे हे मान्य होऊन ते बदलण्याची गरज आहे,हे लोकांना आता पटू लागले आहे.***

**सक्षमीकरण ही गतिशील राजकीय प्रक्रिया**

आपल्याला जर लिंगभाव समानता आणायची असेल तर महिला आणि मुली यांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. एखाद्या व्यक्तीच्या सक्षमीकरणाविषयी जेव्हा आपण बोलतो तेव्हा प्रथम अधिकार म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक ठरते.अधिकार म्हणजे मुक्तपणे आणि स्वतंत्रपणे एखादी कृती करण्याची क्षमता.इतरांवर नियंत्रण किंवा प्रभाव पाडण्याची क्षमता.अधिकार म्हणजे स्वायत्तता,स्वातंत्र्य,स्वत:च्या मताप्रमाणे निवड करणे.स्वत:चा आवाज असणे.

मानवी समाजात साधनसंपत्ती आणि विचारसरणी यांच्यावर नियंत्रण मिळवून अधिकार प्राप्त करून घेण्यात आले. लोकांचे विचार,त्यांच्या श्रद्धा,विश्वास आदिंवर तसेच साधन संपत्तीवर जे लोक नियंत्रण मिळवतात ते निर्णय घेणारे बनतात आणि कुटुंब,समुदाय आणि देश यांच्यावर नियंत्रण ठेवू लागतात.

महिला सक्षमीकरणासाठी आपल्या समाजात सध्या अस्तिवात असलेल्या पितृसत्ताक विचारसरणीत बदल करणे आवश्यक आहे.त्यासाठी नैसर्गिक,मानवी,बौद्धिक,आर्थिक,अंतर्गत साधन संपत्तीवरील नियंत्रण महिलांकडे येणे आवश्यक आहे.त्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सामावून घेतले पाहिजे.

अधिकाराविषयी सध्या प्रचलित असलेले मत बदलले तरच महिला सक्षमीकरण होऊन महिलांच्या जीवनमानात सुधारणा घडून येईल,असे मला वाटते.

सक्षमीकरण याचा अर्थ इतरांवर अधिकार,सत्ता गाजवणे नव्हे, किंवा आपल्या हिश्शापेक्षा जास्त वाट्यावर आपला हक्क सांगणे नव्हे तर सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीचे लोभ,हाव,हिंसेची वृत्ती यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.इतरांनाही वाढू देण्याचा,त्यांना दिलासा देण्याचा,त्यांची काळजी घेण्याचा अधिकार. न्याय,निती तत्त्वे,सदाचरणासाठी लढा देण्याचा अधिकार.मनाचा आंतरिक विकास करून स्वत:मध्ये शहाणपण,इतरांविषयी अनुकंपा निर्माण करण्याचा अधिकार.

महिला सक्षमीकरण ही सातत्याने चालणारी गतिशील प्रक्रिया आहे. महिलांना दुय्यमत्व देणारी रचना, विचारसरणी बदलवण्यासाठी त्यांची ताकद वाढवणारी आहे.सक्षमीकरणामुळे त्यांना साधन संपत्तीवर आणि निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण मिळवण्याची संधी उपलब्ध होईल.स्वत:चे आयुष्य कसे जगायचे हे ठरवायचा अधिकार मिळेल. त्यांना अधिक स्वायत्तता मिळेल.या प्रक्रियेमुळे महिलांना आत्मसन्मान आणि स्व-प्रतिष्टा जोपासण्यासाठी शक्ती मिळणार आहे.त्यामुळे त्यांची स्व-प्रतिमा आणि सामाजिक प्रतिमा सुधारण्यासाठी मदत होणार आहे.

सक्षमीकरण प्रक्रिया ही महिला आणि पुरुष यांच्यात सध्या अस्तित्वात असलेले अधिकारांचे नातेसंबंध बदलविण्याचे उद्दिष्ट बाळगणारी राजकीय प्रक्रिया आहे.

स्त्री-पुरुष विषमतेबाबत जी उतरंड आहे, केवळ तिच्यामध्ये बदल करणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट महिला सक्षमीकरणाचे नाही,तसे ते असायलाही नको.तर उतरंडीवर आधारित समाजात अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या संबंधांमध्ये उदाहरणार्थ-वर्ग,जात,वंश तसेच उत्तर-दक्षिण संबंध आदिंमध्ये बदल घडवून आणणे,हे आहे.कारण स्त्री-पुरुष विषमता एवढीच बाब समाजात अस्तित्वात आहे असे होत नाही,तर त्यावर इतरही घटक परिणाम करत असतात.त्याचा समाजातील आर्थिक,सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेशी संबंध असतो.या इतर व्यवस्था आणि उतरंडींमध्ये जोपर्यंत बदल होत नाही,तोपर्यंत केवळ लिंगभाव उतरंडीमध्ये आपण बदल करू शकत नाही.

महिला सक्षमीकरण ही निसर्गाच्या सक्षमीकरणापासून स्वतंत्र अशी बाब नाही आणि तशी ती असूही शकत नाही.सर्व दुर्लक्षित लोक आणि देश यांच्या सक्षमीकरणापासूनही ती वेगळी असू शकत नाही.म्हणूनच महिलांचे लढे आणि चळवळी या समाजातील शांतता,पर्यावरण,कामगार आणि शेतकरी,मानवी अधिकार, लोकशाही आणि विकेंद्रीकरण यांसारख्या विविध चळवळींशी जोडल्या जाण्याची गरज आहे. या वेगवेगळ्या चळवळी म्हणजे एकाच लढ्यासाठीच्या विविध बाजू आहेत.एकाच स्वप्नाची विविध रूपे आहेत.म्हणूनच या सगळ्या चळवळींचे एकमेकांशी दृढ संबंध असावेत,त्यांच्यामध्ये युती असावी.

***महिला सक्षमीकरण ही निसर्गाच्या सक्षमीकरणापासून स्वतंत्र अशी बाब नाही आणि तशी ती असूही शकत नाही.सर्व दुर्लक्षित लोक आणि देश यांच्या सक्षमीकरणापासूनही ती वेगळी असू शकत नाही.म्हणूनच महिलांचे लढे आणि चळवळी या समाजातील शांतता,पर्यावरण,कामगार आणि शेतकरी,मानवी अधिकार, लोकशाही आणि विकेंद्रीकरण यांसारख्या विविध चळवळींशी जोडल्या जाण्याची गरज आहे.***

महिला सक्षमीकरणाबाबत बोलत असताना आपण स्त्रीवादी विचारसरणीच्या सक्षमीकरणाविषयीही बोलणे आवश्यक आहे.त्याचबरोबर समानता,न्याय,लोकशाही आणि शाश्वतता या तत्त्वांचेही सक्षमीकरण व्हायला हवे.याचा अर्थ आमचा सर्वच महिलांना त्या कोणत्या मतांचा पुरस्कार करतात याचा सारासार विचार न करता पाठिंबा आहे असे नव्हे.ज्या महिला हुकूमशहा आहेत,ज्या पुरुषसत्ताक पद्धतीचा आणि जातीयतेचा पुरस्कार करतात अशा महिला केवळ महिला आहेत म्हणून त्यांचे सक्षमीकरण व्हायला हवे असे आमचे मत नाही.काही महिला या पुरुषसत्ताक पद्धत मानणाऱ्या आणि वर्चस्व गाजवणाऱ्या असू शकतात.तर काही पुरुष हे पितृसत्ताक पद्धत आणि उतरंडीवर आधारित व्यवस्थेविरुद्धच्या आमच्या लढ्यात आमचे सहकारी असतात,याची आम्हाला जाणीव आहे.म्हणूनच आमचा लढा हा काही तत्त्वांसाठी आहे.महिला आणि पुरुष जिथे समान आहेत ,जिथे दोघांनाही जगण्याची,वाढण्याची आणि सहभागी होण्याची समान संधी आहे,अशा समाजासाठी आहे.

केवळ महिलांचे नव्हे तर महिलांबाबतच्या दृष्टीकोनाचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे.कारण महिला म्हणजे केवळ एक स्वतंत्र विभाग नाही.त्याही या समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहेत.म्हणूनच लष्करीकरण असो वा मानवाधिकार किंवा शाश्वत विकास असो प्रत्येक समस्येबाबत महिलांची मते,दृष्टीकोन आणि विचार जाणून घेणे आवश्यक आहे.समाजातील प्रत्येक प्रश्न हा महिलांसाठीही तेवढाच महत्त्वाचा आहे.

महिला सक्षमीकरण कार्यक्रम सामर्थ्यवान,व्यापक आणि महत्त्वाचा होण्यासाठी तो समाजातील सर्व पातळ्यांवर आणि सर्व विभागांमध्ये राबवला जाणे आवश्यक आहे.त्यासाठी

तळागाळातील महिलांसाठी काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्या,मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या कार्यकर्त्या, सरकारमध्ये, प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्या महिला,राजकारणातील, शिक्षण क्षेत्रातील, कलाकार,उद्योजक अशा सर्व स्तरांतील महिलांचे एकमेकांशी संपर्क जाळे विणले गेले पाहिजे.सूक्ष्म स्तरापासून व्यापक स्तरापर्यंत काम करण्यासाठी अशी संपर्क साधणारी यंत्रणा असायला हवी.या कामाबद्दल सहानुभूती असणाऱ्या पुरुषांच्या पाठिंब्याचीही या सर्व पातळ्यांवर आम्हाला गरज आहे.

काही महिला कार्यकर्त्या जाऊन इतरांना सक्षम करून आल्या,अशी ही एकेरी प्रक्रिया नाही.तर ही देवाण-घेवाणीची दुहेरी प्रक्रिया आहे.यामध्ये आम्ही इतरांना सक्षम करतो आणि आम्हीही सक्षम होतो.आम्ही कोणीतरी शिकवायला आलो आहोत अशी भावना यामध्ये राहात नाही तर आमच्याकडून शिकण्यासारखे काही आहे आणि आम्हालाही तुमच्याकडून काही शिकायचे आहे,ही भावना महत्त्वाची! सक्षमीकरण हा आपल्या सर्वांचाच सातत्याने चालू राहणारा प्रवास आहे.

संपूर्णतया व्यक्ती सक्षम झाली,आणि आता ती इतरांना सक्षम बनवण्यासाठीची तज्ज्ञ झाली,असे होत नाही.

महिलांचे सक्षमीकरण ही बहुआयामी आणि एकात्मिक प्रक्रिया आहे.या प्रक्रियेमध्ये पुढील काही मुद्द्यांचा किंवा सर्व मुद्द्यांचा समावेश असावा :

• समाजाप्रति महिलांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे लोकांपुढे येणे गरजेचे आहे.त्या केवळ मुलांना जन्म देत नाहीत तर त्यांचे संगोपन करतात. कुटुंबाची जबाबदारीही त्यांच्यावरच असते.या व्यतिरिक्त त्या शेतकरी,मजूर,कारागीर,व्यावसायिक अशा कितीतरी रुपात काम करत असतात. उत्पादन प्रक्रियेत त्यांचा समावेश असून देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात महत्त्वाचा वाटा असतो.त्या जीवनाची निर्मिती करणाऱ्या,नैसर्गिक साधन संपत्तीच्या व्यवस्थापक असतात,असे अनेक मुद्दे समाजापुढे यायला हवेत.

• कृषी,आरोग्य,हस्तकला यांसारख्या कितीतरी क्षेत्रांत महिलांनी आपल्या ज्ञानाचा, क्षमतांचा, कौशल्यांचा वापर पूर्वीही केला होता आणि आताही त्या करीत आहेत,याची जाणीव महिलांना आणि समाजाला करून द्यायला हवी.

• महिलांना आत्मसन्मान आणि आत्मविश्वास देऊ शकेल अशा सामाजिक पर्यावरणाची निर्मिती करणे.

• मुली आणि महिलांना त्यांच्यातील सुप्त क्षमतांची जाणीव होण्यासाठी संधी निर्माण करणे.यामध्ये त्यांना विविध पर्याय समोर ठेवून निवडीचे स्वातंत्र्य द्यावे.पारंपरिक भूमिकाच पार पाडायला लागतील अशा स्वरूपाच्या नोकऱ्या,व्यवसाय नसावेत.त्यांना केवळ घरगुती कामात अडकवून न ठेवता शिक्षण देऊन सक्षम करावे.

***काही महिला कार्यकर्त्या जाऊन इतरांना सक्षम करून आल्या,अशी ही एकेरी प्रक्रिया नाही.तर ही देवाण-घेवाणीची दुहेरी प्रक्रिया आहे.यामध्ये आम्ही इतरांना सक्षम करतो आणि आम्हीही सक्षम होतो. आम्ही कोणीतरी शिकवायला आलो आहोत अशी भावना यामध्ये राहात नाही तर आमच्याकडून शिकण्यासारखे काही आहे आणि आम्हालाही तुमच्याकडून काही शिकायचे आहे,ही भावना महत्त्वाची!***

• स्वत:च्या आयुष्याबाबतचे निर्णय स्वत: घेण्यासाठी महिलांना समर्थ बनविणे.लग्न करायचे की नाही ? केव्हा करायचे ? कोणाशी करायचे ? मुले होऊ द्यायची की नाही ? केव्हा होऊ द्यायची ? शिकायचे की नाही ?काय शिकायचे ? याबाबतचे निर्णय त्यांना घेता यावेत. तसेच कुटुंबातील, समुदायातील आणि राष्ट्रीय घडामोडींबाबतचे निर्णय त्यांना घेता यायला हवेत, या दृष्टीने सक्षम बनवणे. महिलांचा सर्व स्तरांवरील राजकीय सहभाग वाढवणे.

• स्त्रिया आणि पुरुषांमध्ये, मुली आणि स्त्रियांच्या खऱ्याखुऱ्या गरजांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. कुटुंबातील आणि समाजातील त्यांचे स्थान,त्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्या याविषयीही जाणीव निर्माण करणे गरजेचे आहे.

• अन्न,वस्त्र,निवारा या स्त्रियांच्या मुलभूत गरजा,तसेच आरोग्य आणि सुरक्षेबाबतच्या त्यांच्या काही विशेष गरजा भागवणे.त्यासाठीच्या सुविधा आणि साधने पुरवणे.

• महिलांना उत्पादनाची साधने उपलब्ध करून देणे.मालमत्तेबाबतचे आणि इतर साधन संपत्तीचे अधिकार मिळवून देणे, स्वत:चे उत्पन्न आणि ते कसे खर्च करायचे याबाबतचा निर्णय घेणे, या सगळ्यासाठी मदत करणे.

**विशेष लक्ष देण्याची आणि प्रयत्न करण्याची गरज असलेले महिलांचे प्रश्न**

महिला सक्षमीकरणाची अशी अनेक महत्त्वाची क्षेत्रे आहेत ज्यांच्याकडे यापूर्वी पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही त्यांच्यावर आता भर देणे आवश्यक आहे.या क्षेत्रांकडे अतिशय काळजीपूर्वक लक्ष देऊन त्यांच्याबाबत प्रभावी धोरण आखण्याची गरज आहे.

समाजात महिलांचे स्थान कमी असण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मालमत्ता आणि इतर उत्पादक साधनांबाबत त्यांना अधिकार नाहीत.

त्यामुळेच महिलांना कायम असुरक्षित वाटते.बीना आगरवाल यांनी आपल्या 'अ फिल्ड ऑफ वन्स ओन:जेन्डर अँड लँड राईटस् इन साउथ एशिया' पुस्तकात अतिशय ठामपणे पद्धतीने हा मुद्दा मांडला आहे.मालमत्तेवरची मालकी आणि अधिकार याबाबत स्त्री-पुरुषांमध्ये असलेले अंतर हा महिलांची आर्थिक स्थिती,समाजातील स्थान आणि सक्षमीकरण यांच्यावर परिणाम करणारा एकमेव महत्त्वाचा घटक आहे,असे त्यांचे म्हणणे आहे.या प्रश्नाकडे सर्व स्तरांवर तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

अर्थपूर्ण रोजगाराच्या उपलब्धतेचा अभाव हा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न.घरात पैसा कोण आणते यावर विशेष भर दिला जातो.महिलांना जर शिक्षणाच्या,त्यांच्या कौशल्य विकासाच्या संधी नाकारल्या गेल्या तर त्या पैसा आणणार कोठून ?आणि त्यांना अर्थपूर्ण रोजगार तरी कसा मिळणार ?महिला जे

***प्राध्यापक अमर्त्य सेन आणि प्राध्यापक जिन ड्रीझ यांनी केलेल्या संशोधनातून ते या निर्णयाप्रत पोहोचले की,ज्या महिला घराबाहेर पडून काम करतात आणि ज्यांना रोजगारातून पैसा मिळतो,त्यांच्याबाबत कुटुंबामधील अंतर्गत वितरणामध्ये महिलाविरोधी दृष्टीकोन कमी प्रमाणात आढळतो.***

घरकाम करतात त्याला मोल नाही.त्या पैसा मिळवून आणत नसल्यामुळे त्यांच्या कामाचे अवमूल्यन केले जाते.त्या ओझे किंवा लोढणे आहेत असे मानले जाते. प्राध्यापक अमर्त्य सेन आणि प्राध्यापक जिन ड्रीझ यांनी केलेल्या संशोधनातून ते या निर्णयाप्रत पोहोचले की,ज्या महिला घराबाहेर पडून काम करतात आणि ज्यांना रोजगारातून पैसा मिळतो,त्यांच्याबाबत कुटुंबामधील अंतर्गत वितरणामध्ये महिलाविरोधी दृष्टीकोन कमी प्रमाणात आढळतो.जगामध्ये अनेक भागात महिला या विशेष वंचित असतात.त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांना आर्थिक कार्यक्रमांत सहभागी करून घेणे हा भौतिक घटक लाभदायक ठरू शकतो,असे ते सुचवतात. भारतात आपण महिलांसाठी उत्पन्न निर्मितीच्या कार्यक्रमांविषयी बरीच चर्चा केली आणि ते सुरु केले.मात्र त्यातील बहुतेक कार्यक्रम महिलांना मदत करण्यास अपयशी ठरले.उलट त्यामुळे महिलांवरील कामाचे ओझे वाढले पण त्यांच्या उत्पन्नात मात्र तितकीशी वाढ झाली नाही.या मुद्याचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

घरकाम आणि बाल संगोपन या क्षेत्रांकडेही विशेष लक्ष देणे आवश्यक आहे कारण महिलांचे सर्वात जास्त गौण स्थान याठिकाणी आहे.या दोन्ही कामात महिलांचा खूप वेळ जातो.या कामांमधून


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______ date ______

Name (in block letters) : ______

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______

Phone No. / email : ______

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

ना त्यांना कधी फुरसत मिळते,ना कधी विश्रांती.ना कधी अभ्यासाची संधी,ना कधी विकासाची संधी मिळते.महिला समानता आणि सक्षमीकरण यांच्या मार्गावरील हा सर्वात मोठा अडथळा आहे.कुटुंबातील इतरांनी त्यांच्या कामात मदत केली तर महिलांचे हे कष्ट कमी होण्यास मदत होईल.मुलांनी आणि पुरुषांनीसुद्धा लहान मुलांचा सांभाळ आणि घरकामात मदत केल्यास महिलांना थोडी तरी विश्रांती मिळेल,स्वत:साठी थोडा वेळ काढता येईल.स्वत:च्या आवडीच्या गोष्टी विकसित करता येतील.

महिलांच्या लैंगिकतेवर नियंत्रण या विषयाचा देखील नीट समजून घेऊन अभ्यास केला पाहिजे.लहान वयात लग्न,पडदा पद्धत,महिलांच्या वागण्यावर बंधने या सर्वातून महिलांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवले जाते.त्यामुळे मुली आणि महिलांच्या स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेवर त्याचा गंभीर परिणाम होतो.

विचारसरणी हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे.कारण त्यातूनच

***जीवनाच्या वेगाने बदलणाऱ्या वास्तवाचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये मिळवण्यासाठी मदत करणारे शिक्षण महिलांना मिळणे गरजेचे आहे.अपमानकारक आणि अमानुष परिस्थितीपुढे शरणागती पत्करण्यास नकार देण्याची ताकद आणि आत्मविश्वास या शिक्षणामुळे त्यांच्यात आला पाहिजे.***

पुरुषप्रधान रचनेचे,व्यवहारांचे,आणि वर्तणुकीचे समर्थन केले जाते. प्रसारमाध्यमांचा या विचारसरणीच्या निर्मिती आणि प्रसारात किती मोठा वाटा आहे,हे आपण जाणतोच.प्रसारमाध्यमे ही पूर्वीपासूनच लिंगभेद मानणारी,पुरुषांचे श्रेष्ठत्व आणि महिलांचे कनिष्ठत्व मानणारी,महिलाविरोधी होती आणि आहेत,हे ही आपल्याला माहित आहे. माध्यमांमधील स्त्री प्रतिमा बदलण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले गेले पण दुर्दैवाने त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडत गेली.

धर्म हा देखील पुरुषप्रधान विचारसरणीचा निर्माता आहे.धर्मग्रंथ आणि पुराणातून,धार्मिक आणि सांस्कृतिक रूढींमधून,चालीरीतींमधून पुरुषी श्रेष्ठत्वाचे उपदेश केले गेले,समर्थन केले गेले.या सर्वाला पूर्वीपेक्षा जास्त प्रखरपणे आपण आव्हान द्यायला हवे. मात्र हे क्षेत्र असे आहे की इथे आपण सावधपणे,जागरूकतेने वाटचाल करायला हवी.पण वाटचाल तर करायला हवीच.हे असे क्षेत्र आहे की ज्यामध्ये एका रात्रीत बदल होणार नाही.मात्र आपण जर गप्प बसलो तर त्यामध्ये कधीच बदल होणार नाही.जाती,वर्ग,लिंगव्यवस्थेच्या उतरंडीचे समर्थन धर्माकडून केले जाते तेव्हा सध्याच्या काळात त्यांची चिकित्सा न करता आपण स्वीकार केला असे होऊ शकत नाही.जे धार्मिक कायदेकानू,प्रथा आपल्या राज्यघटनेच्या विरोधात जातात.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

जे महिलांना त्यांचे मुलभूत अधिकार नाकारतात त्यांना आव्हान देणे गरजेचे आहे.याबाबत काय करायचे आणि कसे करायचे हे एक संवेदनशील काम आहे.म्हणून ते करण्याआधी त्याविषयी काळजीपूर्वक चर्चा घडून येणे आणि त्याचे नियोजन होणे अत्यंत आवश्यक आहे.यामध्ये कोणाच्याही भावना दुखावता कामा नये किंवा त्याचा प्रतिकूल परिणाम होता कामा नये.

**महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण आवश्यक**

महिलांचे शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे.महिला सक्षमीकरणासाठी ते आवश्यक आहे.त्यासाठी हस्तक्षेपाची जरुरी असून या शिक्षणाचा आशय आणि कार्यपद्धती ठरवताना ती महिलांच्या बाजूची असणे गरजेचे आहे.

**आपल्याला कशा प्रकारचे शिक्षण हवे**

महिलांना शिकवण्याचे,सुसंस्कृत करण्याचे सध्या सुरु असलेले प्रयत्न आपण अधिक बळकट करण्याची गरज आहे,त्याची व्याप्ती वाढवण्याची गरज आहे.या शिक्षणामुळे जी माहिती आणि ज्ञान त्यांना मिळेल ते त्यांना पितृसत्ताक ज्ञान,नियम,मूल्ये, वर्तनपद्धती यांना आव्हान देण्यासाठी मदत करतील.एखादा शब्द वाचायचा त्याचा अर्थ समजून घ्यायचा याचे शिक्षण मिळण्यासाठी तर आपण महिलांना मदत करणार आहोतच. पण एवढ्यापुरते हे शिक्षण मर्यादित नाही.तर यामुळे त्यांना आजूबाजूच्या भवतालाचे,जगाचे ज्ञान आणि भान त्यांना यायला हवे.त्याबाबतचे अधिकार त्यांना मिळायला हवेत.यामुळे त्यांना स्वत: मिळवलेल्या पैशावर हक्क तर सांगता येणार आहेच, पण त्याचबरोबर स्वत:च्या आयुष्याबाबतचा अधिकार त्यांना मिळणार आहे.स्वामित्व मिळणार आहे.स्वत:ची नियती त्या स्वत:च ठरवणार आहेत. जीवनाच्या वेगाने बदलणाऱ्या वास्तवाचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये मिळवण्यासाठी मदत करणारे शिक्षण महिलांना मिळणे गरजेचे आहे.अपमानकारक आणि अमानुष परिस्थितीपुढे शरणागती पत्करण्यास नकार देण्याची ताकद आणि आत्मविश्वास या शिक्षणामुळे त्यांच्यात आला पाहिजे. महिलांसाठी सुरु करण्यात येणारे साक्षरता वर्ग हे त्यांच्यात स्वत:विषयी जाणीव जागृती करणारे असावेत. आपले सशक्त असे गट बनवण्याची ताकद त्यांना शिक्षणामुळे मिळायला हवी जेणेकरून आपल्या आयुष्याविषयीचा अधिकाधिक अधिकार त्यांना प्राप्त होईल.आपले मौन सोडण्याची संधी त्यांना मिळेल.स्वत:च्या आयुष्याविषयीची स्पष्टता येईल.या साक्षरता वर्गांमुळे मोकळेपणाचे वातावरण निर्माण व्हावे,त्यामुळे त्यांना स्वातंत्र्याचा अनुभव येईल.स्वत:मधील सुप्त मानवी क्षमतांची ओळख करून घेण्याची संधी उपलब्ध होईल. महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण ही सातत्याने चालणारी,सामूहिक आणि सखोल मनन करायला लावणारी प्रक्रिया असावी.महिलांची बौद्धिक क्षमता आणि कौशल्ये लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना शिक्षण देण्यात यावे.शिक्षणाच्या माध्यमातून महिलांशी संवाद साधत त्या प्रत्येकीमधील लपलेले गुण व्यक्त होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

महिलांना शिक्षण देणारी पद्धत ही सर्वांना सहभागी करून घेणारी आणि विना-उतरंडीची असावी.त्यांना काय शिकायचे आहे,त्यांना कशाला प्राधान्य द्यायचे आहे,त्यांची शिक्षणाची गती कशी आहे या सगळ्याबाबत त्यांच्याशी चर्चा करणे गरजेचे आहे.शिक्षणाच्या या प्रक्रियेमुळे त्यांच्या मनात स्वत:विषयी छान भावना निर्माण व्हायला हवी,त्यांच्यात आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण व्हायला हवा. त्यांच्यातील सर्जनशीलता मुक्तपणे फुलू द्या.त्यांना उत्साही,आनंदी बनवा.एका शब्दात सांगायचे तर त्यांना सक्षम बनवा.

शिक्षण हे नवीन कौशल्ये आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी आणि ते संपादन करण्यासाठी मदत करणारे तर असावेच पण त्याचबरोबर ते शिकणाऱ्यांमध्ये आणि समाजातील दबलेल्या गटांमध्ये न्याय, समता, प्रामाणिकपणा, सत्यता आणि एकता अशा प्रकारची मूल्ये रुजवणारे असावे.शिक्षण हे महिलांना विविध पातळ्यांवर द्याव्या लागणाऱ्या लढयांसाठी त्यांच्यात विश्वास आणि धैर्य आणि ऊर्जा निर्माण करणारे असावे.

शिक्षण हे महिलांमध्ये तीव्र स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा निर्माण करणारे नसावे.तर ते त्यांच्यात विश्वास आणि ऐक्य निर्माण करणारे असावे.विविध पातळ्यांवरील संस्था,संघटनांशी जोडून घेण्यासाठी मदत करणारे असावे.

शिक्षणाने आजूबाजूचे वास्तव समजून घेण्यासाठी महिलांमध्ये विश्लेषण करण्याची आणि प्रश्न विचारण्याची क्षमता तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करायला हवा.सूक्ष्म आणि व्यापक वास्तवातील संबंध तसेच सूक्ष्म वास्तव आणि व्यापक धोरणे यांच्यातील संबंध,स्थानिक आणि जागतिक यांच्यातील संबंध जाणून घेण्यासाठी शिक्षणाने महिलांना मदत करावी.

थोडक्यात महिला सक्षमीकरण म्हणजे मानवी मूल्यांचे सक्षमीकरण,याचा पुनरुच्चार करायला हवा.

महिला सक्षमीकरण हे पुरुषांच्या दृष्टीनेही चांगले आहे हे जेव्हा पुरुषांनाही कळेल तेव्हाच या कार्यक्रमाला गती मिळेल आणि ते कुटुंबांच्या आणि राष्ट्रांच्या दृष्टीनेही चांगले होईल.

आपण लक्षात ठेवायला हवे
गुणवत्ता ज्या पुरुषांच्या ठायी
स्त्री-पुरुष समानतेची भीती त्यांना नाही

■ ■ ■

*लेखिका महिला विकास, शिक्षण आणि माध्यम आदी क्षेत्रात कार्यरत असून अनेक बिगरसरकारी संस्थामध्ये कार्यरत आहेत*

email: kamia@sangatsouthasia.org

# अरुणा असफ अली

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यातील काहींची माहिती बहुतांश भारतीयांना आहे. परंतु , त्यांच्या व्यतिरिक्तही अनेक महिलांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी धाडसीपणे रणरागिनींची भूमिका निभावली. पुरुष सहकाऱ्यांच्या बरोबरीने त्यांनी अनेक आंदोलनामध्ये सहभाग घेतला. अशा काही ज्ञात-अज्ञात शूर महिलांची माहिती या लेखात देण्यात आली आहे.**



यांचा जन्म एका बंगाली कुटुंबात १९०९ मध्ये झाला.१९३० मध्ये झालेल्या मिठाच्या सत्याग्रहाद्वारे त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत पहिले पाऊल टाकले. गांधी-आयर्विन करारानंतर काही महिन्यानी मुख्य आयुक्तांकडून त्यांना अटकही झाली. पुन्हा १९४१ मध्ये त्यांना वैयक्तिक सत्याग्रहाबद्दल त्यांना अटक करण्यात आली. ८ ऑगस्टला सर्व प्रमुख नेत्याना अटक झाल्यावर ९ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवणाऱ्या त्या पहिल्या व्यक्ती होत्या. २६ सप्टेंबर १९४२ रोजी त्यांची सर्व मालमत्ता व चीजवस्तू जप्त करण्यात येऊन ती परत मिळवण्यासाठी शरण येण्यास त्यांना सांगण्यात आले. जेव्हा त्यानी नकार दिला तेव्हा त्या सर्व वस्तूंची विक्री करण्यात आली. डॉ. राममनोहर लोहिया यांच्यासमवेत त्यानी इन्किलाब पत्र प्रसिद्ध केले ज्याद्वारे मोठ्या प्रमाणावर जनजागृती होऊन अनेक सरकारी नोकर व विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेण्यासाठी व नेतृत्व करण्यासाठी महाविद्यालये सोडली. त्यांना १९४२ च्या राणी झाशी असे म्हटले जात असे. दिल्लीच्या महापालिकेच्या पहिल्या महापौरही त्याच बनल्या. लिंक आणि पॅट्रियट अशी दोन नियतकालिकेही त्यानी सुरु केली ज्यामुळे त्यांच्या कामाची मोठ्या प्रमाणावर दखल घेण्यात आली.त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके देण्यात आली.

## सुचेता कृपलानी



अंबाला येथे १९०८ मध्ये त्यांचा जन्म झाला. लाहोरमध्ये

प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांनी दिल्ली विद्यापीठातून एम.ए.ची पदवी मिळवली.बालपणापासूनच स्वतंत्र भारतात जगण्याचे स्वप्न त्या पाहत होत्या. १९३२ मध्ये त्यांनी सार्वजनिक सेवेत प्रवेश केला आणि १९३९ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. देशाची सेवा करण्यासाठी जनतेप्रती त्यांनी केलेल्या कामामुळे प्रभावित होऊन गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहासाठी त्यांची निवड केली आणि त्यासाठी त्यांना अटकसुद्धा झाली.१९४२-४३ मध्ये भूमिगत होऊन त्यांनी कार्य सुरु ठेवले अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या त्या संस्थापकही बनल्या ज्याचा उपयोग त्यांना महिलांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घ्यावा म्हणून प्रेरक संदेश देण्यासाठी व्यासपीठ म्हणून झाला.या महत्वाच्या कामासाठी त्यांनी १९४२ मध्ये भूमिगत स्वयंसेवक दलही स्थापन केले ज्यात महिलांना कवायत, शस्त्रे चालवणे, प्रथमोपचार व स्वसंरक्षणाचे तंत्र शिकवले जात असे. दोन वर्षांनी १९४४ मध्ये त्यांना अटक करण्यात आली. १९४५ मध्ये तुरुंगातून बाहेर आल्यावर आपला बहुतेक सर्व वेळ त्यांनी सामाजिक सेवेलाच समर्पित केला. १९४६ मध्ये झालेल्या पूर्व बंगालमध्ये व १९४७ मध्ये पंजाबात झालेल्या जातीय दंगलीत अपहरण करण्यात आलेल्या महिलांना त्यांनी आसरा दिला. मार्च १९६३ ते मार्च १९६७ या काळात त्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री होत्या आणि स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला मुख्यमंत्रीही त्याच ठरल्या.

**कल्पना दत्ता**



बंगालमधील उच्च शिक्षण घेणाऱ्या त्या महिला असून इंग्रज व त्यांच्या भाषेचा तिरस्कार करत. शाळेत ईश्वर व राजाप्रती निष्ठा शिकवणारी प्रतिज्ञा बदलण्याचीही त्यांची इच्छा होती आणि ईश्वर व देशासाठी निष्ठा अशी ती करावी, असे त्यांना वाटे.शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी कोलकता विद्यापीठात प्रवेश घेतला व लाठ्या, तलवारी चालवण्यास शिकल्या. १९२९ मध्ये त्यांचा संपर्क क्रांतिकारकांशी आला परंतु १९३२ मध्ये त्यांनी त्यांच्या पथकाचा भाग होऊन प्रत्यक्ष सहभागाद्वारे स्वातंत्र्यासाठी लढण्याचे ठरवले. त्या बहुतेक वेळा पुरुषी पोषाखात वावरत असत. सरकारी इमारतींवर त्यांनी गुप्त छापेही घातले होते. त्या क्रांतीकारक गटाच्या सदस्य असल्याच्या संशयाने पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवण्यास सुरुवात केली परंतु त्यांच्याविरोधात पुरावा गोळा करण्यात अपयश आले. पहारतळी क्लबवर धाड टाकण्यात आली तेव्हा पोलिसांना त्या क्रांतिकारक गटाच्या सदस्य असल्याची खात्री पटली.कलम १०९ अन्वये त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला परंतु पुराव्याअभावी त्यांना जामीन मंजूर करण्यात आला व त्यानंतर त्या फरार झाल्या. परंतु तीन महिन्यांनंतर त्यांना पकडण्यात आले व चित्तगाव धाड प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. १९४२ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला व कम्युनिस्ट नेते पी. सी. जोशी यांच्याशी त्या १९४३ मध्ये विवाहबद्ध झाल्या.

**राणी गैदिनलिऊ**



नागालँडच्या लक्ष्मीबाई अशी त्यांची ओळख आहे. १३ वर्षांच्या कोवळ्या वयातच त्यांनी ब्रिटिश राजवटीविरोधात लढा देण्याचा

निर्धार केला होता. त्यांच्या चुलतभावास ब्रिटिशांनी फासावर लटकवल्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. त्यावेळी त्या फक्त १६ वर्षांच्या होत्या व ब्रिटिशांविरोधात फक्त चार सशस्त्र नागा सैनिकांनिशी लढल्या. गुरिल्ला वॉर आणि शस्त्र चालवण्याचे तंत्र त्यांना उत्तम अवगत होते. ब्रिटिशांविरोधात लढणाऱ्या त्या अत्यंत आक्रमक नागा नेत्या होत्या आणि १९३२ मध्ये त्यांना अटक करण्यात आली.त्यानंतर त्याना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. भारतीय स्वातंत्र्यानंतर त्या तुरुंगातून बाहेर आल्या तेव्हा त्यांचे वय ३० वर्षे होते. त्यांच्या शौर्याबद्दल पंडित नेहरू यांनी राणी असे संबोधले होते. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या भूमिकेबद्दल त्यांना पद्मभूषण प्रदान करण्यात आले.

**प्रीतीलता वड्डेदार**



चित्तगाव येथे १९११ मध्ये त्यांचा जन्म झाला. त्या अत्यंत हुशार होत्या आणि शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी कोलकता विद्यापीठातून विशेष प्रावीण्यासह बी.ए. पदवी मिळवली. त्यानंतर लीला नाग यांचा दीपाली संघ व कल्याण दास यांच्या विद्यार्थी संघात प्रशिक्षण देण्यात आले व त्यांनी नेते सूर्यसेन यांच्या क्रांतिकारक गटात प्रवेश केला. चित्तगाव धाड टाकणाऱ्या गटात त्या सहभागी होत्या व पोलिसांबरोबर चकमक झाल्यावर त्या साथी सदस्यांसह पसार झाल्या. आपल्या गटाच्या सदस्यांचा पोलिस गोळीबारात मृत्यू झाल्याचा सूड घेण्यासाठी ब्रिटिश व युरोपियनांचे नेहमी जाणे-येणे असलेल्या नाईट क्लबवर हल्ला चढवण्याचा कट त्यांनी व नेते सूर्यसेन यांनी रचला. २४ सप्टेंबर १९३२ रोजी प्रीतीलता वेदार यांनी आपल्या साथीदारांसमवेत क्लबवर हल्ला चढवला व पिस्तुले व बॉम्बच्या बेछुट वर्षावात ठार झाल्या. जेव्हा ब्रिटिशांनी प्रतिहल्ला चढवण्याचा प्रयत्न केला तेव्हा एक गोळी त्यांना लागली व त्या जखमी झाल्या. आपण या जखमेमुळे मरण पावणार हे माहीत असल्याने त्यांनी गोळीने ठार होण्यापेक्षा आधीच ठरवलेल्या योजनेनुसार पोटॅशियम सायनाईड गोळी घेऊन मरण पत्करले.

■■■



# भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांची भूमिका



डॉ. ज्योती अटवाल



**सन १८८० पासूनच भारतीय स्त्री-पुरुष सामाजिक सुधारणांसाठीच्या चळवळींचे नेतृत्व करत होते. संपूर्ण भारतात विविध ठिकाणी प्रसिद्ध झालेले लिखाण आणि अनेक स्त्रियांच्या आत्मचरित्रांमधून, विशेषत: महाराष्ट्र आणि बंगालमधे झालेल्या लिखांणामधून 'पर्सनल इज पोलिटीकल' म्हणजेच 'व्यक्तिगत तेच राजकीय' ही घोषणा उदयाला आली. सामाजिक सुधारणांसारख्या पुरुषप्रधान क्षेत्रात स्त्रियांचा प्रवेश हे सत्य स्विकारणे म्हणजे जवळजवळ भूतकाळापासून फारकत घेण्यासारखेच होते.**

भारतीय स्वातंत्र्यचळवळीची वाटचाल विविध गुंतागुंतीच्या पायऱ्यांवरुन झाली असून, तिला अनेक वेगवेगळे पैलू आहेत. १९व्या शतकाच्या अखेरपासून १९४७ पर्यंतच्या कालावधीत जनसामान्यांच्या राष्ट्रीय पातळीवरच्या वादविवाद, चर्चांमध्ये सामाजिक सुधारणांचा प्रश्न सतत येत राहिला होता. त्यासोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांबाबतची त्याकाळच्या स्त्रियांची जागरुकता वाढीस लागली होती. भारताच्या राष्ट्रीय चळवळीच्या सुरुवातीच्या टप्प्यांमधे कायदेविषयक सुधारणा आणि ब्रिटीश साम्राज्याच्या विधीमंडळाच्या कामकाजात भारतीयांचा समावेश या मागण्या जोर धरु लागल्या होत्या. सन १८८० पासूनच भारतीय स्त्री-पुरुष सामाजिक सुधारणांसाठीच्या चळवळींचे नेतृत्व करत होते. संपूर्ण भारतात विविध ठिकाणी प्रसिद्ध झालेले लिखाण आणि अनेक स्त्रियांच्या आत्मचरित्रांमधून, विशेषत महाराष्ट्र आणि बंगालमधे झालेल्या लिखांणामधून 'पर्सनल इज पोलिटिकल' म्हणजेच 'व्यक्तिगत तेच राजकीय' ही घोषणा उदयाला आली. सामाजिक सुधारणांसारख्या पुरुषप्रधान क्षेत्रात स्त्रियांचा प्रवेश हे सत्य स्विकारणे म्हणजे जवळजवळ भूतकाळापासून फारकत घेण्यासारखेच होते. (कोसम्बी २००७)

भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या गांधीवादी चळवळीत सन १९२०च्या सुमाराला मोठ्या प्रमाणावर महिलांचा अंतर्भाव दिसून आला. गांधींजींनी त्यांच्या भाषणांमधे स्त्रियांच्या घरात आणि घराबाहेरच्या परिस्थितीचे वर्णन मोठ्या कौशल्याने विशद केले होते. स्वातंत्र्य चळवळीला १९२० सालच्या शेवटापर्यंत सामाजिक अधिष्ठान मिळाले होते. गांधीजी आणि इतर स्थानिक समाज सुधारक एकाचवेळी बालविवाह आणि विधवा पुनर्विवाहासारख्या प्रश्नांवर काम करत होते. जणु काही भविष्यातल्या भारताची नवी प्रतिमा राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांच्या कल्पनेत आकार घेऊ लागली होती. १९व्या शतकाच्या अखेरीला झालेल्या शैक्षणिक सुधारणा आणि सामाजिक बदलांनी नव्या तऱ्हेच्या वाचन आणि लिखाणाच्या प्रसिद्धीला उत्तेजन दिले. मात्र त्यात स्त्रियांचे प्रमाण नगण्यच होते. वर्तमानपत्रांतून होणाऱ्या शैक्षणिक आणि राजकीय जनजागृतीचा परिणाम शिक्षित लोकांवर होऊ लागला होता. भारतभरात, १९व्या शतकात, स्त्रियांच्या स्वत:च्या संस्था सर्वत्र स्थापन होऊ लागल्या. बंगालची शिक्षणतज्ञ आणि कथाकार रुकया शेखात हुसेन यांनी १९०८ मधे 'सुलतानाचे स्वप्न' नावाची कथा लिहीली. या लघुकथेमधे

स्त्रियांच्या स्वत:च्या शासन यंत्रणेची कल्पना वाचकांसमोर मांडली होती. रविंद्रनाथ टागोर यांची भाची सरला देवी चौधुरानी यांनी १९१० साली भारत स्त्री महामंडळाची स्थापना केली. त्यांनी हिंदुत्वाचे पुनरुज्जीवन आणि राजकीय विरोधाची सांगड घालायचा प्रयत्न केला. भूतकाळातल्या विजयी शूरवीरांच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी त्यांनी 'अष्टमी' या हिंदू सणाला 'वीराष्टमी'चे सुधारीत रुप दिले. नव्या शतकाच्या सुरुवातीला मुंबई हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सर्व राजकीय हालचालींचे महत्त्वाचे केंद्र बनले. बंगालमधे त्या दरम्यान बहुतांश संस्था आणि त्यांच्या कारवाया गुप्त स्वरुपाच्या होत्या. स्वदेशी चळवळीत भाग घेण्यासाठी स्त्रियांना त्यांच्या घरातून पाठिंबा मिळाला. या चळवळीत परदेशी कापडावर बहिष्कार आणि दारुच्या दुकानांवर छापे मारुन ती बंद पाडणे यासारख्या कारवायांचा समावेश असे. भारतमातेबद्दल राष्ट्रीय पूज्यतेची भावना बंगालमधे उदयाला येऊ लागली. मातृभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या भारतीय क्रांतीकारकांची गाथा वर्णन करणारी 'आनंदमठ' ही कादंबरी १८८२ मधे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहीली. त्यांनी लिहिलेली 'वंदे मातरम्' ही रचना वसाहतवादाला विरोध असणाऱ्या सर्व भारतीयांसाठी प्रेरणादायी गान ठरली आणि येणाऱ्या काळात 'वंदे मातरम्'चे भारतीय नागरिकांशी असलेले नाते अतूट राहीले.

स्त्रियांच्या स्वातंत्र्यचळवळीतल्या सहभागाच्या दुसऱ्या टप्प्यात होमरुलची कल्पना आणि घटनेचे महत्त्व यांचा प्रभाव वाढत राहिला. काही पाश्चिमात्य स्त्रियांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. जन्माने अर्ध्या आयरिश आणि अर्ध्या इंग्रज असलेल्या ॲनी बेझंट (१८४७-१९३३) या १९७७ ला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या. ब्रम्हविद्येच्या अभ्यासक आणि समाजवादी विचारसरणीच्या बेझंट यांनी विविध मोहिमा राबवण्यासाठीचे प्रशिक्षण घेतलेले होते. आयरिश नमुन्यावर आधारीत होम रुल चळवळ तिने भारतात सुरु केली. तिची आयरीश सहकारी आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी कार्य करणारी मार्गारेट कुझिन्स (१८७८-१९५४) हिने भारतीय स्त्रियांना मताधिकार देणाऱ्या विधेयकाचा मसुदा तयार केला तसेच स्त्रियांच्या 'इंडियन असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. सरोजिनी नायडू (१८७९-१९४९) प्रखर राष्ट्रवादी म्हणून १९१७च्या सुमाराला राजकीय व्यासपीठावर आल्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या महिला

***मातृभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या भारतीय क्रांतीकारकांची गाथा वर्णन करणारी 'आनंदमठ' ही कादंबरी १८८२ मधे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहीली. त्यांनी लिहिलेली 'वंदे मातरम्' ही रचना वसाहतवादाला विरोध असणाऱ्या सर्व भारतीयांसाठी प्रेरणादायी गान ठरली आणि येणाऱ्या काळात 'वंदे मातरम्'चे भारतीय नागरिकांशी असलेले नाते अतूट राहीले.***

अध्यक्ष होण्याचा मान १९२५ मध्ये त्यांना मिळाला. बंगालच्या फाळणीच्या विरोधात १९०५ मधे झालेल्या आंदोलनादरम्यान नायडू यांनी भारताच्या राष्ट्रीय पातळीवरच्या चळवळीत स्वत:ला वाहून घेतले. त्यांनी १९१५ ते १९१८ या कालावधीत भारताच्या विविध भागांना भेटी दिल्या आणि तिथे स्त्रियांचे सबलीकरण आणि राष्ट्रप्रेम या विषयांवर भाषणे दिली. 'इंडियन असोसिएशन' या स्त्रियांच्या संघटनेशी त्यांचा जवळून संबंध होता आणि स्त्रियांना मताधिकार देण्याबाबत चर्चा करण्यासाठी लंडनला गेलेल्या प्रतिनिधीमंडळात त्यांचा समावेश होता.

तिसऱ्या टप्प्यात, पहिल्या महायुद्धाची समाप्ती आणि १९१९ मधे झालेले जालियनवाला बाग हत्याकांड यांमुळे देशातली हवा एकदम पालटली आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी देशभरातले लोक एकत्र होऊ लागले. सन १९१९च्या सुरुवातीला ब्रिटीशांनी रौलेट ॲक्ट नावाचा कायदा आणला, ज्यामुळे नागरिकांच्या सार्वजनिक स्वातंत्र्यावर गदा आली. सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमणे किंवा मोर्चा, निदर्शने यावर या कायद्यामुळे बंदी घातली गेली. जेव्हा गांधीजींनी १३ एप्रिलला शांततापूर्ण विरोध म्हणजेच सत्याग्रह आणि असहकारासाठी देशवासियांना आवाहन केले, त्यावेळी पंजाबातल्या अमृतसर शहरातले नागरीक शांततापूर्ण निदर्शने करण्यासाठी एकत्र जमले होते. सुमारे हजारभर शांतिप्रिय निदर्शकांवर गोळ्या झाडून त्यांचे हत्याकांड करण्यात आले. ह्या वसाहतवादी हिंसेच्या घटनेने १९२०-२२ मधल्या असहकार चळवळीच्या पुढच्या टप्प्यासाठी अनुकूल परिस्थिती तयार केली. स्वदेशीच्या पुरस्काराच्या मुद्याच्या पुढे जाऊन ह्या टप्प्यात कायदेविषयक निर्णय देणारी न्यायालये आणि शाळांवर बहिष्कार टाकण्याच्या मुद्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. 'राष्ट्रीय स्त्री संघा'सारख्या स्त्रियांच्या स्वतंत्र संस्था जिल्हा काँग्रेस समित्यांमधे विसर्जित करण्यात आल्या. असहकार चळवळ बंगालच्या बाहेरच्या प्रदेशांमधे पसरु लागली आणि त्यात संपूर्ण भारतभरातल्या स्त्रिया सहभागी होऊ लागल्या. ह्या चळवळीकडे हिंदू-मुस्लिम

एकतेचे प्रतिक म्हणून बघितले जाऊ लागले. अहमदाबाद इथे अली बंधूंची आई बी अम्मा हिने ६हजार स्त्रियांसमोर भाषण करुन त्यांना धरपकडीच्या कामात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी व्हायला प्रोत्साहन दिले. गांधीजींनी समाजापासून अलग रहाणाऱ्या तसेच दुर्लक्षित घटकांमधल्या स्त्रियांना देखिल स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यासाठी आवाहन केले. आंध्रप्रदेशात गांधीजींचे भाषण ऐकण्यासाठी साहसी दुर्गाबाईने एक हजार पेक्षा जास्त देवदासींना एकत्र आणले. याप्रसंगी जमलेल्या समुदायाने दागिन्यांच्या स्वरुपात दानधर्म करुन २० हजार रुपये गोळा केले. हिंदू विधवांचे समाजातले लक्षणीय प्रमाण गांधीजींना भावले होते. सत्याग्रहासाठी कोणत्याही प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज नसलेल्या या विधवा गांधीजींसाठी आदर्श स्वातंत्र्य सैनिकांचे प्रतिनिधित्व करत होत्या. त्या सर्वजणी या चळवळीसाठी सगळ्यात योग्य सहभागी होत्या. विधवांचे सर्वसंगपरित्याग करुन संन्यस्त व्यक्तिगत जीवन जगण्याचे तत्वज्ञान राजकीय आदर्श व्यक्तिरेखेमधे अगदी सहज रुपांतरीत करता आले. जरी गांधींजीना मोठ्या प्रमाणावर विधवांना स्वातंत्र्यचळवळीत सामील करुन घेता आले नाही, तरी त्यांनी विधवांचे महत्त्व उचलून धरले, मान्य केले. हिंदू विधवांच्या त्यागमय जीवनशैलीला आदर्श मानून आणि त्याची राजकीय चळवळींमधली आवश्यकता पटवून देऊन गांधीजींनी समाज जागृतीसाठी त्यांचा योग्य उपयोग केला. शांतताप्रिय पण सातत्यशील मार्गाने या चळवळीचा पुरस्कार केला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जीवनाशी झगडणारी विधवा माता ही वसाहतवादाला कडाडून विरोध करणारा देशाचा भूतकाळ आणि त्याच्या उज्वल भविष्याचे प्रतिक ठरली. (अटवाल २०१६)

ब्रम्हचर्याची शपथ घेतल्यानंतरच्या काही वर्षात गांधीजींनी त्यांची स्वत:ची लैंगिक जाणीव अध्यात्मिक शक्तींमधे विसर्जित केल्यामुळे त्यांनी विधवांच्या सर्वसंगपरित्यागाच्या विचारांचा गौरव केला.

स्वातंत्र्यासाठीच्या राष्ट्रीय चळवळीच्या पुढच्या टप्प्यात, महिलांच्या सहभागाची अत्यंत वेगळी परिमाणे आणि अवकाश यांना एक वेगळीच उंची गाठली. सन १९२० नंतरच्या अस्थिर राजकीय वातावरणाची माहिती 'मदर इंडिया' या कॅथरिन मेयो हिने प्रकाशित केलेल्या पुस्तकात मिळते. मेयो या अमेरिकी महिलेने दोन वर्ष भारतात वास्तव्य केले होते. या काळात इथल्या हिंदु कुटुंबातल्या पुरुषांचे अतिकडक, टीकात्मक, वेठीला धरणारे वागणे आणि स्त्रियांची गुलामांसारखी परिस्थिती तिने जवळून पाहिली आणि शब्दबद्ध केली. भविष्यातली 'विश्व सामाजिक घटना' म्हणून जिच्याकडे पाहिले गेले ती परिस्थिती या पुस्तकाने निर्माण केली. (मृणालिनी सिन्हा २००६).

---

***हिंदू विधवांच्या त्यागमय जीवनशैलीला आदर्श मानून आणि त्याची राजकीय चळवळींमधली आवश्यकता पटवून देऊन गांधीजींनी समाज जागृतीसाठी त्यांचा योग्य उपयोग केला. शांतताप्रिय पण सातत्यशील मार्गाने या चळवळीचा पुरस्कार केला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जीवनाशी झगडणारी विधवा माता ही वसाहतवादाला कडाडून विरोध करणारा देशाचा भूतकाळ आणि त्याच्या उज्वल भविष्याचे प्रतिक ठरली.***

---

या घटनेबाबत सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की १९व्या शतकापासून हिंदू कुटुंबाची कडेकोट कुलुपबंद व्यवस्था हळूहळू सार्वजनिक चर्चेसाठी मोकळी होऊ लागली. राष्ट्रवादी आणि समाजसुधारकांनी राबविलेल्या मोहिमांमधे कुटुंबव्यवस्थेवर लक्ष केंद्रीत करावे, अशी सक्ती होऊ लागली. त्यातही घरातले वातावरण अहिंसक करण्याच्या दिशेने कार्य झाले पाहिजे अशा सूचना या मोहिमांमधल्या कार्यकर्त्यांना दिल्या गेल्या. मेयो यांनी लिहिलेल्या पुस्तकावर नाराज वाचकांच्या तीव्र असंमतीच्या प्रतिक्रिया आल्या. भारतीय स्त्री पुरुषांना राष्ट्रीय सन्मानाच्या मुद्यावर एकत्र आणले. सविनय कायदेभंगाची चळवळ ही १९३०मधली स्वातंत्रलढ्यातली मोठी घटना स्थानिक पातळीवर तयार केलेल्या मीठावर लावलेल्या कराच्या विरोधात ही चळवळ सुरु झाली. साबरमती नदीच्या किनाऱ्यापासून सुरु झालेली यात्रा २४ दिवस चालली. स्त्री स्वयंसेवकांना आता मोर्चा, बहिष्कार, प्रभातफेऱ्या यांचे नेतृत्व करण्यासाठी शारिरीक शिक्षण मिळू लागले.

स्त्रियांनी त्यांच्या संघटनांमधे विविध देशसेवी गट तयार केले. त्यांना 'देश सेविका संघ' असे म्हटले जाऊ लागले. स्त्रियांनी स्वत:ला अटक करवून घेतली, शांततापूर्ण आणि सहिष्णू मार्गांनी मोर्चे काढले. पण काही स्त्रियांनी जहालमतवादी गटात प्रवेश केला आणि एकेकट्या ब्रिटीश अधिकाऱ्यांची हत्या करण्यासाठी बंडखोरांना शस्त्रे पुरवणे वा तत्सम कामे करणे अशी मदत केली. सन १९३०च्या सुमाराला अटक होऊन तुरुंगात जाणाऱ्या स्त्रियांपैकी सरोजिनी नायडू, मुथुलक्ष्मी रेड्डी, मार्गरिट कझिन्स, कमलादेवी चटोपाध्याय ही काही महत्त्वाची नावे आहेत.

उदारमतवादी धोरण असलेल्या

कुटुंबांपासून कट्टर पुराणमतवादी कुटुंबांपर्यंत, शहरी तसेच ग्रामीण भागातल्या स्त्रिया- मग त्या एकट्या असोत वा लग्न झालेल्या, तरुण असोत वा वृद्ध - सर्व भागातून स्त्रिया पुढे आल्या आणि ब्रिटीश साम्राज्यशाहीला विरोध दर्शवत स्वातंत्र्यलढ्यात सामील झाल्या. (फोर्बस् २००५)

पुरुष कार्यकर्त्यांना अटक झाल्यानंतर स्त्रियांच्या संघटनांनी सविनय कायदेभंगाची चळवळ पुढे नेण्याचे कार्य हाती घेतले, त्यासंबंधी बैठका घेतल्या. ह्या बरोबरच त्यांनी गांधीजींचा सूतकताई आणि खादीचे कापड बनवण्याचा विधायक कार्यक्रम पुढे सुरु ठेवला. तसेच उपवासाद्वारे शांततापूर्ण विरोध दर्शवण्याचे कार्यही सुरु ठेवले. यात भाग घेतलेल्या स्त्रियांकडे १९३०च्या सुमाराच्या खूप घटना आणि आठवणींचा खजिना होता. त्यांच्यातल्या काही जणींना सेविका किंवा स्काऊट म्हटले जायचे सन १९३०मध्ये लखनौमधे भरलेली स्वातंत्र्य चळवळीतल्या कार्यकर्त्यांची महासभा ब्रिटीश सरकारने बेकायदेशीर ठरवली आणि कार्यकर्त्यांची धरपकड केली. प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार प्रेमचंद यांच्या पत्नी शिवराणी देवी यांनी त्यावेळची आठवण लिहून ठेवली आहे. त्या लिहीतात की पोलिसांच्या गाडीत बसल्यावर स्त्रियांनी 'महात्मा गांधी की जय' आणि 'भारत माता की जय' अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. त्या सात जणी, एक पोलिस अधिकारी आणि सात हवालदार असे सर्वजण त्या गाडीत होते. सर्व स्त्रिया देशभक्तीपर गाणी म्हणतच होत्या, पोलिस अधिकारी उतरुन गेल्यावर त्या हवालदारांच्या डोळ्यात अश्रु आलेले आम्ही पाहिले अशी आठवण त्यांनी लिहून ठेवली आहे.

शिवराणी देवींना अटक करायच्या अगोदर त्या पोलिस अधिकाऱ्याने सुमारे ५० स्त्रियांना अटक केली. मात्र, त्यांना तुरुंगात न टाकता शहरापासून दूर, अज्ञात ठिकाणी नेण्यात आले. आपल्याला अटक होईल याची खात्री असून सुद्धा शिवराणीदेवी यांनी 'महिला आश्रम' इथे सुमारे १२ हजार लोकांसमोर जळजळीत भाषण केले. नोव्हेंबर १९३१मधे सात महिलांसह परदेशी कापड पळवताना शिवराणी देवी यांना पुन्हा अटक झाली. (अटवाल २००७) त्यांनी असहकार चळवळीत देखिल लक्षणीय सहभाग घेतला होता. एकदा स्त्रियांच्या राष्ट्राविषयीच्या जाणीवा विविध प्रकारे जागृत झाल्यानंतर त्यांनी राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यासाठी वेगवेगळ्या कार्यपद्धतींचा पाठपुरावा करायला सुरुवात केली.

***सन १९३०च्या सुमारास कमलादेवी चट्टोपाध्याय (१९०३-१९८८) गांधीवादी चळवळीच्या विशेषत मिठाच्या सत्याग्रहात एक प्रमुख नेतृत्वाच्या रुपात समोर आल्या. नंतर स्वतंत्र भारतात त्यांनी भारतीय हस्तकला, हातमागापासून बनवलेल्या वस्तू आणि रंगभूमीवरच्या प्रदर्शनांमधे अधिकाधिक रस घेतला.***

हिंदुस्तान सोशियालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन (HSRA) या दुसऱ्या महत्त्वाच्या देशभक्तीपर कार्य करणाऱ्या संस्थेने दुर्गावती देवी किंवा दुर्गाभाभी (१९०७-१९९९) या स्त्रीच्या स्वातंत्र्य चळवळीतल्या महत्त्वाच्या सहभागाची नोंद घेतली आहे. ती आणि तिचे यजमान भगवती चरण व्होरा हे दोघेही (HSRA)चे सदस्य होते. ब्रिटीश अधिकारी सॉंडर्स याच्या हत्येनंतर वेषांतर करुन रेल्वे गाडीतून पळून जाताना भगतसिंग यांची दुर्गावती देवी यांनी प्रवासात सोबत केली होती.

क्रांतीकारकांच्या कार्यातल्या स्त्रियांच्या सहभागाचे दुसरे महत्त्वाचे उदाहरण १९३० सालच्या चितगाव शस्त्रागारावर घातलेल्या छाप्यांच्या वेळचे आहे. सूर्यासेन यांच्या नेतृत्वाखालच्या इंडियन रिपब्लिकन आर्मी या ब्रिटीशविरोधी सशस्त्र गटाच्या छताग्राम शाखेत १९३१ सालच्या मे महिन्यात कल्पना दत्त (१९१३-१९९५) हिने प्रवेश केला. चितगावच्या युरोपियन क्लबवर हल्ला करण्याच्या कटात १९३१ मधे ती प्रीतीलता वडेदार यांची सहकारी म्हणून सामील झाली. त्या नियोजित हल्ल्याच्या एक आठवडा आधी त्या भागाची टेहळणी करताना कल्पना दत्त हिला अटक झाली. जामीनावर सुटल्यावर ती भूमिगत झाली. त्यांच्या लपण्याच्या ठिकाणाला पोलिसांनी घेरले आणि १७ फेब्रुवारी १९३३ला त्यांनी सूर्यासेनला पकडले. कल्पना मात्र निसटण्यात यशस्वी झाली. चितगांव शस्त्रागारावरच्या छाप्याच्या दुसऱ्या पुरवणी खटल्यामधे तिला जन्मठेपेची शिक्षा झाली. तिला १९३९मधे सोडण्यात आले.

सन १९३०च्या सुमारास कमलादेवी चट्टोपाध्याय (१९०३-१९८८) गांधीवादी चळवळीच्या विशेषत मिठाच्या सत्याग्रहात एक प्रमुख नेतृत्वाच्या रुपात समोर आल्या. नंतर स्वतंत्र भारतात त्यांनी भारतीय हस्तकला, हातमागापासून बनवलेल्या वस्तू आणि रंगभूमीवरच्या प्रदर्शनांमधे अधिकाधिक रस घेतला. गांधीजी, नेहरु आणि समाजवाद्यांच्या भूमिकांमधे त्रिशंकू अवस्था झाल्याने कमलादेवी कधीच काँग्रेस पक्षाच्या महत्त्वाच्या निर्णयांमधे कळीची भूमिका घेऊ शकल्या नाहीत.

भारत सरकारने १९५५ साली पद्मभूषण पुरस्काराने, तर १९८७ साली सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले. सामाजिक नेतृत्वातल्या कौशल्यासाठी कमलादेवींना १९६६ साली रेमन मॅगसेसे पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांना संगीत नाटक अकादमीचा सर्वोच्च पुरस्कार, भारताचा राष्ट्रीय संगीत, नृत्य आणि नाटक अकादमीचा १९७४ साली दिलेला जीवनगौर पुरस्कार असे अनेक सन्मान मिळाले.

दुसरीकडे सरोजिनी नायडू यांना राजकीय क्षेत्रात जास्त काम करायची संधी मिळाली. कानपूर इथे १९२५ मधे झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक सत्राचे अध्यक्षपद नायडू यांनी भूषविले. तसेच १९२९ साली दक्षिण आफ्रिकेत भरलेल्या पूर्व आफ्रिकी भारतीय प्रतिनिधींच्या महासभेच्या अध्यक्षस्थानी नायडू होत्या. भारतातल्या प्लेगच्या साथीदरम्यान त्यांनी केलेल्या कार्याबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांना कैसर-ई-हिंद पदकाने सन्मानित केले.

धरासणा इथे मिठागरांमधे १९३० साली झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात तिथल्या स्त्री निदर्शकांमधे त्या होत्या. गांधीजी आणि मदनमोहन मालवीय यांच्यासोबत १९३१ साली त्यांनी गोलमेज परिषदेला हजेरी लावली. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी प्रमुख भूमिका बजावली आणि गांधीजी तसेच इतर नेत्यांसोबत तुरुंगवासही भोगला. त्यांना पुन्हा १९४२ साली 'भारत छोडो' आंदोलनादरम्यान अटक झाली. काही काळानंतर, १९४७ ते १९४९ या कालावधीत सरोजिनी नायडू आग्रा आणि औंध या एकत्रित प्रांताच्या पहिल्या स्त्री गवर्नर झाल्या.

आणखी एक नेत्या अरुणा असफ अली (१९०९-१९९६) यांनी त्यांच्या कार्यामुळे काँग्रेस पक्षात तसेच पक्षाबाहेरही अत्यंत आदरणीय स्थान मिळवले. भारत छोडो आंदोलनादरम्यान, १९४२ साली मुंबईत गोवालिया टँक मैदानात भारतीय राष्ट्रीय ध्वज फडकावण्याचे श्रेय अरुणा असफ अली यांना जाते. सन १९५८ मधे त्या दिल्लीच्या पहिल्या नगराध्यक्ष झाल्या. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान, 'भारत रत्न' देऊन १९९७ मधे त्यांचा गौरव करण्यात आला. असफ अली यांच्याशी लग्न झाल्यानंतर त्या काँग्रेस पक्षाच्या सक्रिय सदस्य झाल्या आणि मिठाच्या सत्याग्रहादरम्यान त्यांनी सार्वजनिक मोर्चामधे सहभागी होऊन निदर्शने केली. त्या समाजविघातक

***भारत छोडो आंदोलनादरम्यान, १९४२ साली मुंबईत गोवालिया टँक मैदानात भारतीय राष्ट्रीय ध्वज फडकावण्याचे श्रेय अरुणा असफ अली यांना जाते. सन १९५८ मध्ये त्या दिल्लीच्या पहिल्या नगराध्यक्ष झाल्या. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान, 'भारत रत्न' देऊन १९९७ मध्ये त्यांचा गौरव करण्यात आला.***

असल्याच्या आरोपावरुन पोलिसांनी त्यांना अटक केली आणि त्यामुळे सर्व राजकीय कैद्यांच्या सुटकेसंदर्भात झालेल्या गांधी-आयर्विन करारा अंतर्गत १९३१ साली त्यांची सुटका होऊ शकली नाही. त्यांची सुटका होईपर्यंत तुरुंग सोडून बाहेर जाणार नाही, अशी भूमिका त्यांच्या सहकारी स्त्री-कैद्यांनी घेतली. मात्र गांधीजींनी याप्रकरणी हस्तक्षेप केल्यानंतर या स्त्रियांनी त्यांची मागणी मागे घेतली. जनतेच्या आंदोलनानंतर अरुणा असफ अली यांची सुटका झाली. तिहार तुरुंगात १९३२ साली कैदेत असताना राजकीय कैद्यांना दिल्या जाणाऱ्या बेपर्वा वागणुकीचा विरोध करत त्यांनी उपोषण करुन निषेध नोंदवला. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आणि तिहार तुरुंगातल्या राजकीय कैद्यांच्या परिस्थितीत सुधारणा झाली. पण अरुणा असफ अली यांना मात्र अंबाला इथे पाठवण्यात आले आणि तिथे त्यांना सगळ्या कैद्यांसोबत न ठेवता एकटे, एकाकी ठेवण्यात आले. त्यांच्या सुटकेनंतर मात्र त्या राजकीयदृष्ट्या फारशा क्रियाशील नव्हत्या. अखिल भारतीय काँग्रेस समितीने ८ ऑगस्ट १९४२ला मुंबईत झालेल्या बैठकीमधे 'भारत छोडो' ठराव संमत केला.

थोडक्यात सांगायचे तर, राष्ट्रीय चळवळीमधल्या भारतीय स्त्रियांच्या सहभागाची प्रतिमा आणि सखोलता व्हिक्टोरियन काळातले सदाचरण आणि भारत मातेबद्दलच्या राष्ट्रीय अभिमानाच्या विविध पायऱ्यांवर आधारलेली आहे. स्वातंत्र्यासाठी राबवलेल्या विविध मोहिमांचे नेतृत्व बहुतांश वेळी उच्च, मध्यमवर्गीय घरातल्या स्त्रियांनी केलेले दिसत असले, तरीही गेल्या काही वर्षांमधे दलित आणि अनेक जमातीतल्या स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत घेतलेल्या सहभागाच्या कथा समोर येत आहेत. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातल्या अशा अनेक कथा अजून उजेडात आलेल्याच नाहीत.

■■■

*लेखिका जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली येथे सहाय्यक प्राध्यापक आहेत.*

email: jyoti_atwal@mail.jnu.ac.in

# स्त्रियांच्या अनेकविध भूमिका

देवकी जैन



**स्त्रियांच्या कुटुंबातील वा बिरादरीतील पुरुष व्यक्तींपेक्षाही स्वत: स्त्रियांनी आपल्या जीवनातील आणि इतरांच्या जीवनातील बदलांसाठी प्रतिनिधी असणे हे सामाजिक धोरणांना अपेक्षित आहे. सामाजिक धोरणांनुसार, कायमच असेच गृहीतक आहे की, स्त्रिया म्हणजे समाजातील दुर्बल आणि गरजवंत घटक. असा घटक जो स्वत:च्या पोटापाण्याची सोय करण्यासही अक्षम, तसेच पुरुष वर्ग व समस्त दुनियेच्या अंकुशाखाली काम करणारा घटक. पण प्रत्यक्षात मात्र निम्न आर्थिक स्तरावर निरीक्षण केल्यास नेमकी उलट परिस्थिती ध्यानात येते.**

या लेखामध्ये, आपण गरीब स्त्रियांना आवश्यक असलेल्या गोष्टी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण आणि इतर गोष्टी लक्षात घेऊन सामाजिक धोरणांबद्दल चर्चा करणार आहोत. ह्या चर्चेचा उद्देश्य हा की, आज विशेष अधिकार नसलेल्या, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या क्षेत्रातील वंचित समाजाबद्दल बोलताना, स्त्रीची ओळख अपत्य जननी शिवाय कुटुंब आणि पर्यावरणांतील आत्यंतिक महत्वाचा घटक अशी निर्माण झाली पाहिजे, ही त्यांच्या सामाजिक गरजांविषयी अधिक बोलण्याआधी पूर्वअट आहे.

स्त्रियांच्या कुटुंबातील वा बिरादरीतील पुरुष व्यक्तींपेक्षाही स्वत : स्त्रियांनी आपल्या जीवनातील आणि इतरांच्या जीवनातील बदलांसाठी प्रतिनिधी असणें हे सामाजिक धोरणांना अपेक्षित आहे. सामाजिक धोरणांनुसार, कायमच असेच गृहीतक आहे की, स्त्रिया म्हणजे समाजातील दुर्बल आणि गरजवंत घटक. असा घटक जो स्वत:च्या पोटापाण्याची सोय करण्यासही अक्षम, तसेच पुरुष वर्ग व समस्त दुनियेच्या अंकुशाखाली काम करणारा घटक. पण प्रत्यक्षात मात्र निम्न आर्थिक स्तरावर निरीक्षण केल्यास नेमकी उलट परिस्थिती ध्यानात येते.

जेथे कुटुंबांचा चरितार्थ चालण्यासाठी पाणी, लाकूडफाटा, धनधान्य स्त्री पुरवते इतकेच काय तर स्त्री कुटुंबांची निगा राखते, संगोपन करते. खरेतर बहुतांशी कुटुंबांची स्थिती सारखीच आहे. काही कुटुंबांमध्ये स्त्री कमवती आहे. तर काहींमध्ये तिचे सेवाकार्य आहे. मात्र तिचे कर्तव्य कधीच चुकत नाही. अगदी दुष्काळी वा पुरपरिस्थितीत, अन्नाचा तुटवडा झाल्यास स्त्री कंदमुळे खणून वा रानफळे वेचून म्हणजेच अगदी आपत्कालातही कुटुंबांचे भरणपोषण करतेच.

वरील मुद्यात वर्णिल्यानुसार, कुटुंब तथा समाजाला जिवंत ठेवण्यात स्त्रीची भूमिका फार महत्त्वाची आहे. त्यामुळेच ती सामाजिक धोरणांच्या दृष्टीने अत्यंत कळीची आहे. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की,-

'आपल्याला मानवतावादी दृष्टीकोनाची गरज आहे. धोरणांचे साध्य म्हणून नव्हे. त्यांच्या हिताचे रक्षण

आपल्याला धोरणांद्वारे करावे लागेल. मात्र एक प्रतिनिधी म्हणून वैयक्तिक रित्या अथवा सांघिकरित्या तेच साध्य परिणामकारकपणे करु शकू. आपल्याला मनुष्य म्हणून जगताना एक पाऊल पुढे टाकावे लागेल. ज्यामध्ये ग्राहक, उपभोक्ता वा गरजवंत म्हणून केवळ मानवाची संकुचित भूमिका नसून तो व्यापक दृष्टीकोन असेल. प्रतिनिधी म्हणून विचार करणे, मूल्यांकन करणे, निराकरण करणे, प्रेरित करणे वा हैराण करण्याची मुभा असल्याने जगाला आकार देण्याची नवीन संधी प्राप्त होईल.'

महिलांसाठी सामाजिक विकास धोरणे राबवताना किंवा सामाजिक पाठिंबा दर्शवताना अनेक अडथळ्यांचा आपल्याला सामना करावा लागतो. त्यातील एक अडथळा म्हणजे त्यांच्या समाजातील स्थानाबद्दल होय. १९७० च्या दशकापूर्वी, माहिती संकलन करणारी कुटुंब सर्वेक्षणे पश्चात धोरणे बनवण्यात कामी येत. ज्यामध्ये बहुधा स्त्रियाचा समावेश दुर्बल वर्गात असे. उदा. विधवा, दारिद्री स्त्रिया इ. ज्यामुळे स्त्रिया वा महिला वर्गाला समाज कल्याणाची गरज आहेच असे समजले जाई. स्त्रीवादी चळवळींना हे चित्र बदलण्यास बरीच वर्षे मेहनत करावी लागली, ज्यामुळे उपरोक्त चित्रात वर्णिल्याप्रमाणे स्त्रिया पिछाडीवर नसून त्या आज आर्थिक प्रगतीच्या चालक आहेत, हे सर्वांना समजले आहे. म्हणूनच स्त्रियांना कल्याणार्थ योजनांसाठी उपयुक्त साधने म्हणून न वागवता त्यांना अर्थव्यवस्थेचे योगदान देणारे घटक म्हणूनच वागवले गेले पाहिजे. ज्याचा पारिणाम म्हणून स्त्रियांना त्यांची ओळख, वेतन , काम सर्व निकषांवर महत्व मिळू शकेल.

सध्या जगभरात अशी जोरदार मागणी आहे की, स्त्रियांचं हे गृहिणीपण आता कमावतं व्हावं. म्हणजे, ज्या महिला वृध्द आणि बालकांची निगा राखतात, संगोपन करतात आणि घरकाम सांभाळतात, त्यासाठी वेळ घालवतात याकरिता त्यांना आर्थिक मोबदला दिला पाहिजे. या मागचं कारण हेच की, त्यांचा मौल्यवान वेळ या कामात खर्ची होत असल्याने त्यांना पुरुषांइतकी कमाई करण्याची संधी हुकते, म्हणूनच, ही ओळख महत्वाची ठरते.

---

***स्त्रिया पिछाडीवर नसून त्या आज आर्थिक प्रगतीच्या चालक आहेत, हे सर्वांना समजले आहे. म्हणूनच स्त्रियांना कल्याणार्थ योजनांसाठी उपयुक्त साधने म्हणून न वागवता त्यांना अर्थव्यवस्थेचे योगदान देणारे घटक म्हणूनच वागवले गेले पाहिजे. ज्याचा पारिणाम म्हणून स्त्रियांना त्यांची ओळख, वेतन , काम सर्व निकषांवर महत्व मिळू शकेल.***

---

म्हणूनच, स्त्रियांच्या कामाचा परिचय किंवा कामाच्या संकल्पनेची व्याप्ती ही, स्त्रिया जे काम करतात ते समजून घेण्यासाठी, पहिली पायरी होय. जेणेकरुन स्त्रिया आरोग्य आणि कल्याणार्थ बाबींसाठी पुढे येतील.

वैयक्तिक आणि कुटुंबांच्या सर्वेक्षणित माहितीमध्ये आमुलाग्र बदल येण्याची गरज आहे. माहिती प्रणालीचा कल कायमच पुरुषप्रधान आहे. ज्यामुळे पुरुषांना कायम कुटुंबांचे कर्ते म्हणून दर्शवले जाते आणि स्त्रिया ह्या केवळ अवलंबी असल्याचे अथवा कुटुंबांचे भरण पोषण करण्यास पूरक सहाय्य करताना दाखवले जातात.

म्हणूनच, सुधारित माहिती संकलन हे स्त्रीवादी दृष्टीकोनातून समजण्यास कठीण व धोरणविरोधात असल्याचे आढळते.

बहुतांश प्रमाणित रोजगार प्रश्नावली आणि ठराविक भारतीय प्रश्नावलीच्या अनुषंगाने घेताना, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाचा पडताळा घेतल्यावर, स्त्रिया घरकाम करताना आढळल्यास त्यांना वगळले तर जातेच शिवाय अंशकालिन काम वा अर्धवेळ नोकरी कितीही उत्पादक काम असली तरी ती दुर्लक्षित ठरवली जाते.

रेनाना जाबवाला, तिच्या अभ्यासलेखात म्हणतात की,

केवळ स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळे, स्त्रियांचे कर्तृत्व झाकोळलेले राहते. परिणामी त्यांचे कार्यकर्तृत्व एक कर्मचारी म्हणून दुर्लक्षित, उपेक्षित व अपरिचित म्हणून संबोधले जाते. स्त्रियांचे काम व अर्थव्यवस्थेतील तथा परिवार व समाजातील योगदान सदैव अवमूल्यित राहिले आहे. त्यातही जेव्हा स्त्री घरबसल्या काम करत असते, किंवा घरकाम , संगोपन वा परिचारिका म्हणून काम पहाते, शेतमजुरी करते तेव्हा हे उपेक्षेचे प्रमाण अधिक असते. त्यांचे गृहिणीपण वा आया महणून काम करणे याकडे कानाडोळा करुन त्यांचे कामगार असणे याकडे लक्ष दिल्यास, एक अर्थव्यवस्थेचा चलघटक म्हणून

तिच्याकडे पाहता येईल. आपल्या कुटुंबाप्रति तिचे योगदान व परिणामी अर्थव्यवस्थेतील योगदान अर्थव्यवस्थेची धोरणे यामध्ये स्त्रीचाही विचार करावा लागेल.

अकराव्या पंचवार्षिक (२००७-२०१२) योजनेची तयारी करते समयी, नियोजन मंडळाने महिला अर्थज्ञांचा एक गट स्थापन केला. स्त्री आणि विकास या एकमेव विषयाची जबाबदारी या गटावर नव्हती तर, इतर काही महत्वाच्या विषयांची जबाबदारी या गटावर सोपवण्यात आली होती. उदा. पायाभूत सुधारणा, उद्योग, कृषी इ. या विषयांचा खल करताना पायाभूत विकास या विषयावर या गटाने एक महत्वाची सुधारणा सूचवली. हा विषय अर्थ-संकल्पाच्या अनुषंगाने महत्वाचा असल्याने, समाजोन्मुख पायाभूत सुधारणा विषयही मुख्य विषयात समाविष्ट करण्याविषयी सूचना करण्यात आली.

सॉफ्ट इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजे गरीबातील गरीब महिलेला सबल करणे यासाठी पुरवलेली पूरक सेवा वा सहाय्य सेवा , जेणेकरुन त्या स्त्रीस समाजात व अर्थव्यवस्थेत सहभागी होणे सुकर होईल. उदाहरणार्थ, यासाठी एक कल्पना अशी की, एका वास्तुसंकलाची सुविधा असावी. म्हणजे एका इमारतीत पाणी सुविधा, सार्वजनिक बालसंगोपन केंद्र, बालवाडी, शौचालय, स्नानगृह, भोजनघर, आणि कपडे धुण्याची जागा असावी. उपलब्ध निधीतूनच हा प्रकल्प उभारला जाईल. याचा अंतर्भाव पायाभूत प्रकल्पात होईल कारण यासाठी इमारत, पाणी वीज आदी पायाभूत सोयी गरजेच्या आहेत. ज्या खरेतर मोठमोठी नगरामहानगरातील मोठमोठ्या कार्यालयाकरिता व संकुलांकरिता लागतात.

ज्यामुळे समाजातल्या दुर्बल भागातील स्त्रियांना, गरीबीत जीवन कंठणाऱ्या स्त्रियांना आपल्या थोरल्या लेकीवर जबाबदारी थोपवून लाकूड पाणी आणण्यासाठी मैलोन् मैल चालावे लागणार नाही. त्यांना हे संकूल सोयीचे होईल. ती स्त्री बाळाला पाळणाघरात ठेवेल, त्या स्वयंपाकघरात पोळी भाजी बनवून कपडे धुवून कामाला जाईल.

यानंतर एक धक्कादायक बाब १९७० च्या धोरणकर्त्यांना आढळून आली. ती म्हणजे स्त्रियांचा मृत्यूदर आणि काम करणा-या स्त्रियांचा दर. यातील विलक्षण साम्य. स्त्रियांचा (क्रियाशील) काम करणाऱ्या गट हा मुख्यत्वे २०-३५ वर्षे आहे. तरीही, स्त्रियांचा मृत्यूदर याच गटात जास्त आहे. ही स्थिती दारीद्र्य रेषेखाली आहे. बिमारु राज्यांमध्ये दारिद्र्यरेषा गडद असल्याने हे चित्र तिथे बऱ्याच अंशी दिसते. ही माहिती संकलन पाहता, स्त्रियांवर काम करण्यासाठी असलेला दबाव यावरुन दिसतो. त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. म्हणूनच, हा वाद- समाजकल्याण आणि सामाजिक धोरण यामधील वाद, गरीब कुटुंबांचा विचार करता, स्त्रियांचे आर्थिक योगदान मूल्य मापनाच्या अनुषंगाने व्हावयास हवा.

तरी ही सर्व धोरणे परिणामकारक होण्यासाठी स्त्रिया आणि दुर्लक्षित घटकांना सबल करण्यावर भर दिला तरच त्याचा उपयोग नियोजनकार्यात होईल. उदा. स्त्रियांविषयीचा दृष्टीकोन ठरवण्यासाठी विविध चर्चासत्रे झाली पाहिजेत. नियोजन प्रक्रियेसाठी आवश्यक सर्वेक्षणामध्ये ह्या चर्चासत्रातील मुद्यांचा अंतर्भाव असण्याविषयी आश्वस्त केले पाहिजे. स्त्रियांना नेतृत्वाची गरज आहे. हे नेतृत्व त्यांच्या प्रश्नापुरतं सिमीत नको, विविध क्षेत्रांच्या समित्यांमध्येही त्यांचे समावेशन असावे. त्यांचा विषय समाजविकासच नव्हे तर पायाभूत सुविधा, भूविषयक प्रश्न नैसर्गिक स्त्रोता, रोजगार आदी इतके महत्वाचे असावेत.

■■■

*लेखिका पद्मभूषण पुरस्कार प्राप्त गांधीवादी महिला कार्यकर्त्या आणि अर्थतज्ञ आहेत.*

email: devakijain@gmail.com




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# महिला सबलीकरण, विकास आणि उद्योजकता

शशी मिश्रा

**जागतिक उत्पन्नातील दहा टक्के वाटा महिलांचा आहे. मात्र जागतिक संपत्तीच्या अवघी एक टक्के संपत्ती महिलांच्या वाट्याला आली आहे. महिलांना विविध प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागते. ते जन्म प्रमाण, आवश्यक गरजा, संधी रोजगार याद्वारे प्रतिबिंबित होते. महिलांचा विकास हा सामाजिक - आर्थिक प्रगतीचा निर्देशांक आहे. त्यातून राष्ट्राची सामाजिक परिस्थिती लक्षात येते.**

जागतिक लोकसंख्येत महिलांचे प्रतिनिधीत्व अर्धे आहे, जागतिक अधिकृत मनुष्यबळात तीस टक्के वाटा आहे. एकूण कामकाजाच्या तासांमध्ये साठ टक्के योगदान आहे, जागतिक उत्पन्नातील दहा टक्के वाटा महिलांचा आहे. मात्र जागतिक संपत्तीच्या अवघी एक टक्के संपत्ती महिलांच्या वाट्याला आली आहे. महिलांना विविध प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागते. ते जन्म प्रमाण, आवश्यक गरजा, संधी रोजगार याद्वारे प्रतिबिंबित होते. महिलांचा विकास हा सामाजिक - आर्थिक प्रगतीचा निर्देशांक आहे. त्यातून राष्ट्राची सामाजिक परिस्थिती लक्षात येते. भारतातही लोकसंख्येत अर्धे प्रमाण महिलांचे आहे. महिला 'कार्य स्त्रोत' तर आहेतच शिवाय त्या राष्ट्राच्या तरूण मनुष्यबळाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतात.

या लेखाच्या माध्यमातून आपण एक प्रतिकात्मक अभ्यास पाहूया. मुंबईत फूल विक्रीचा व्यवसाय करणारी एक महिला आहे. तिच्या माध्यमातून आपल्याला महिला उद्योग संकल्पना अभ्यासता येईल.

महिला विकास आणि उद्योजकता बहूतांश विकसित देशांमध्ये महिला उद्योजक ही संकल्पना रूजली आहे. घराबाहेर पडून कमावणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे.

शूम्पटरच्या मतानूसार - उद्योजकता ही जमीन, श्रम, भांडवल आणि नैसर्गिक संसाधनांच्या एकत्रित वापर होय. बाजारपेठेची मागणी आणि उद्योजकता कौशल्य यांची सांगड घालून मानवी आर्थिक सुरक्षितता प्रदान होते.

दादर स्थानक (फूल गल्ली), प्रभादेवी, सिद्धीविनायक मंदीर परिसरात फूलविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांचे पती एकेकाळी वस्त्रोद्योगात कार्यरत होते. संपामुळे मुंबईतील गिरणी कामगार बेरोजगार झाला.

### महिला सबलीकरण आणि विकास

आज आपण पाहतो की, समाज व्यवस्थेत महिलांच्या दर्जा सुधारला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महिला विकासासाठी निधी (युनिफेम) नुसार महिला उद्योजक म्हणजे - स्वत:ची क्षमता ओळखून आवश्यक ते परिवर्तन घडवून आणून स्वत: चे आयुष्य जगणे होय.

फूल विक्रेत्या महिला या नैसर्गिकरित्याच उद्योजक आहेत. या अभ्यासाच्या माध्यमातून महिलांचे

उद्योजक कौशल्य आणि अर्धशिक्षित महिलांची आर्थिक सुरक्षितता पाहू.

फूल विक्रीचा व्यवसाय हा इतर व्यवसायांपेक्षा वेगळा आहे. कारण यामुळे अध्यात्मिक परंपरा जोपासली जाते. या महिला एकत्रिपणे फूलाची खरेदी करतात. त्यांच्या व्यवसायासाठीचा खर्चही फार कमी आहे. या असंघटीत क्षेत्रातून अधिक चांगली रोजगारनिर्मिती होऊ शकते.

**महिला सबलीकरण, उद्योजकता आणि मुंबईतील फूल बाजार :-**

मुंबईतील फूल बाजार हे अनौपचारिक बाजारपेठेचे उदाहरण आहे. त्याची निर्धारित वेळ नाही. आज हा व्यवसाय अनेकांसाठी रोजगार साधन ठरला आहे. या व्यवसायतील महिला गरीब कुटूंबातील आहेत. त्यांच्या प्रमुख उद्देश म्हणजे मिळणाऱ्या पैशातून घर चालवणे,

दादर स्थानक, सिद्धीविनायक मंदीर, रेल्वे, चर्च, मंदीर, याठिकाणी फूल विक्री करणाऱ्या महिलांच्या मते शिक्षणामुळे रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होऊ शकतात. त्यामुळे व्यवसाय देखील वाढू शकतो. शिक्षणाच्या आधारावर मुलांसाठी चांगले जीवन, व्यवसायवृद्धीसाठी बँकेकडून कर्ज मिळते. या व्यवसायातील बहूतांश महिलांची कुटूंबे याच व्यवसायावर चालतात. सकाळी लवकर त्या आपल्या कुटूंबातील सदस्यासमवेत बाजारात जातात.

**फूल बाजारातील विविध आव्हाने आणि महिला उद्योजक :-**

फूल विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. पितृसत्ताक समाज व्यवस्थेचा रोष पत्करावा लागतो. बँका महिलांना कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे अनेक महिला खासगी सावकाराकडून कर्ज घेतात. युनायटेड नेशन्स इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ऑर्गनायजेशनच्या अहवालानूसार वित्त संस्थांकडून महिलांना कर्ज देण्यास नकार दिला जातो. बँकांचा भेदभाव करणारा हा दृष्टिकोन आहे.

या व्यवसायातील महिलांना आणखी एक आव्हान आहे ते म्हणजे कामाची अगदी पहाटेची वेळ आणि याकामी कुटूंबाकडून होणारी अवहेलना. होलसेल बाजारातून फूल विकत घेण्यासाठी या महिला अगदी पहाटे घराबाहेर पडतात. त्यांचा दिवस रात्री उशीरा संपतो. या कामी त्यांना मदतीचा हात मिळत नाही. यालाही बरीच कारणे आहेत. पती, दुसऱ्या ठिकाणी कामाला असतो. तर काहीवेळा तो दारूडा किंवा आजारी असतो. बऱ्याचवेळा शिक्षण नसल्यामुळे बृहन्मुंबई महापालिकेने केलेले नियम समजत नाहीत. त्यामुळे बऱ्याच सरकारी कामकाजासाठी त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते.

या व्यवसायासाठी महिलांना अगदी ५,००० ते १०,००० रूपयाची गुंतवणूक हवी असते. इतर कोणत्याही उद्योगापेक्षा हे भांडवल निश्चितच कमी आहे.

सध्याच्या बदलत्या काळानूसार फूल व्यवसायाकडे पाहण्याची लोकांची दृष्टी बदलली आहे. घरगुती सजावटीसाठी, मंदीरामध्ये, फूल व्यवसायाची बाजारपेठ दिवसेंदिवस वाढत आहे.

**सूचना :**

महिलांनी आपल्या व्यवसायावर पूर्णत: लक्ष केंद्रीत करावे. शिक्षण हा महिला उद्योजकतेसाठी आवश्यक घटक आहेच शिवाय आरोग्य, आर्थिक स्वावलंबत, कार्यनिवड याकडे लक्ष दिले पाहिजे. महिलांना दुहेरी भूमिका पार पाडावयाची असल्यामुळे खासगी वा सार्वजनिक क्षेत्रात नोकरी करण्यापेक्षा उद्योजकता हा चांगला पर्याय आहे.

■■■



# स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी एमएए कार्यक्रम

एमएए (मदर्स ॲबसोल्युट अफेक्शन) हा महत्वाचा कार्यक्रम नुकताच सुरू करण्यात आला असून लोकांमध्ये विशेषत: महिलांमध्ये स्तनपानाच्या लाभांबद्दल पुरेशी जनजागृती झाल्याची खात्री करण्याचा हा कार्यक्रम आहे.

मा (एमएए -मदर्स ॲबसोल्युट अफेक्शन) हा राष्ट्रव्यापी कार्यक्रम असून स्तनपानावर संपूर्णपणे लक्ष केंद्रित करण्याचा व आरोग्य व्यवस्थांद्वारे स्तनपानाला समर्थन देणाऱ्या समुपदेशन सेवांची तरतूद असा हा प्रयत्न आहे. या कार्यक्रमाला मा असे नाव देण्यात आले असून त्याचा हेतू स्तनपान देणाऱ्या मातेला स्तनपान यशस्वी होण्यासाठी कुटुंबातील सदस्यांकडून आणि आरोग्य केंद्रातून कशा प्रकारे पाठिंब्याची आवश्यकता आहे, याचे महत्व बिंबवण्याचा आहे. मा कार्यक्रमाचे प्रमुख घटक समुदायांत जनजागृती करणे, आशाच्या माध्यमातून व्यक्तीव्यक्तींमध्ये आंतरिक संवाद मजबूत करणे, सार्वजनिक आरोग्य केंद्रांतील प्रसुतीगृहांत स्तनपानासाठी कुशल पाठिंबा व देखरेख तसेच पारितोषिक/दखल हे आहेत.

**२०१३-१६ दरम्यान उज्वला योजनेंतर्गत ४२ कोटी देण्यात आले आणि १८,२१५ जणांना लाभ**

महिला व बाल विकास मंत्रालयातर्फे राबवल्या जाणाऱ्या उज्वला योजनें अंतर्गत परदेशात देहविक्रीसाठी महिलांची तस्करी रोखणे आणि त्यांची सुटका करणे, देहविक्रीच्या रॅकेटच्या शिकार झालेल्या महिलांना पुन्हा मायदेशी आणून त्यांची कुटुंबातील सदस्यांशी भेट घडवून आणणे हे आहेत.या योजनेंतर्गत २०१३-१६ या दरम्यान मंत्रालयाने राज्ये / केंद्रशासित प्रदेशांना एकूण ४२ कोटी रुपयांची रक्कम दिली असून याच कालावधीत जवळपास १८,२१५ जणांना त्याचा लाभ मिळाला आहे. २०१६-१७ दरम्यान (३० जून २०१६ पर्यंत) १४३ लाख ७ हजार रुपयांची रक्कम राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना करण्यात आली आहे.

महिला व मुलांची तस्करी रोखण्याच्या दृष्टीने जागृती करण्यासाठी सरकारने योजनेंतर्गत योजलेल्या उपायांमध्ये सामुदायिक दक्षता गटांची स्थापना व कार्य, सामाजिक जागृती व स्थानिक समुदायांचा सहभाग, कार्यशाळा/परिसंवादांद्वारे सार्वजनिक जनमत तयार करणे, मास मीडियाद्वारे जनजागृती व पत्रके, पोस्टर्स असे जनजागृती करणारे साहित्य प्रसिद्ध करून त्याचे वितरण यांचा समावेश आहे.

**आयजीएमएसवाय योजना**

महिला व बाल विकास मंत्रालय आयजीएमएसवाय योजना राबवत असून केंद्राने पुरस्कृत केलेली सशर्त प्रसुतीलाभ योजना आहे. ज्यात १९ वर्षे किंवा त्यावरील गर्भवती अथवा स्तनपान देणाऱ्या मातांना प्रतिलाभार्थी ६,००० रुपये दोन समान हप्त्यांत पहिल्या दोन प्रसुतीसाठी प्रसुती व बाळाच्या जन्मासंबंधी काही विशिष्ट अटींची पूर्तता केल्यास देण्यात येतात.

## विकास आराखडा

गर्भवती व स्तनपान देणाऱ्या मातांच्या बँक खात्यात गर्भधारणेच्या दुसऱ्या तिमाहीपासून ते बाळ सहा महिन्यांचे होईपर्यंतच्या काळात रोख रक्कम जमा करून अशा मातांचे आरोग्य व पोषण आहाराच्या गरजा भागवणारे पर्यावरण तयार करण्यासाठी योगदान देण्याचा हेतू आयजीएमएसवाय योजनेचा आहे.

२०१३-१६ या दरम्यान मंत्रालयाने राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना ८०८ कोटी रुपयांची एकूण रक्कम दिली असून याच काळात १४,३२,४११ लोकांना त्याचा लाभ मिळाला आहे.देशभरातील ५३ निवडक जिह्यांत आयजीएसएमवाय योजना राबवण्यात येत आहे.

५ जुलै २०१३ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याच्या (२०१३) अनुसार, मंत्रालयाने प्रसुती लाभाची रक्कम प्रति लाभार्थी ४,००० रुपयावरून ६,००० रुपये केली आहे.२०१६-१७ या चालू आर्थिक वर्षासाठी यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद ४०० कोटी रुपये आहे.

**महिलांना समान संधी आणि चांगल्या कामाच्या वातावरणासाठी सरकारी योजना**

सरकारने समान वेतन कायदा १९७६ लागू केला असून नोकरीसंदर्भात एक अथवा एकाच प्रकारचे काम करणाऱ्या महिला व पुरुषांना समान मोबदला देण्याची तरतूद असून भरती अथवा कोणत्याही सेवाशर्तीबाबत महिलांविरुद्ध पक्षपात करण्यास प्रतिबंध करण्याची तरतूद आहे. कायद्याच्या तरतुदींचे पालन व्हावे, याची खात्री करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी त्या त्या वर्तुळांत अमलात आणला आहे. सरकारने निरीक्षक म्हणून अधिसूचित केलेले सक्षम अधिकारी तपासणी करतात आणि कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्याचे दिसताच खटला भरतात. हा कायदा संपूर्ण भारताला लागू आहे.

महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण रहावे, यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण विरोधी कायदा (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा २०१३ लागू करण्यात आला आहे. निवासाच्या ठिकाणापासून दूर राहून काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित निवारा रहावा म्हणून वर्किंग वुमेन हॉस्टेल योजनेवर महिला व बाल विकास मंत्रालय देखरेख करत असून कर्मचारी महिलांच्या मुलांसाठी पाळणाघराचे लाभ देण्यासाठी राजीव गांधी पाळणाघर योजना राबवली जात आहे.

याशिवाय रोजगाराची धोरणे महिला कर्मचाऱ्यांसाठी अधिक संवेदनशील करण्यासाठी प्रसुती लाभ कायदा १९६१ अंतर्गत प्रसुती रजा, बालसंगोपन रजा आणि पितृत्व रजा अशा तरतुदीही करण्यात आल्या आहेत.

■■■

# महिलांचे हक्क आणि सबलीकरणांच्या योजना-उपाय

सुरेखा तवंदकर



**साधारणतः विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्त्रियांच्या अवस्थेत व सामाजिक स्थानात बदल होऊ लागला. अर्थार्जनासाठी स्त्रिया बाहेर पडू लागल्या आणि त्यातून त्यांना थोडेफार आर्थिक स्वावलंबन लाभले. अर्थात, स्त्रिया घराच्या बाहेर पडू लागल्या तरी स्त्री-पुरुष समानतेचे तत्व समाजाच्या गळी लगेच उतरणे शक्य नव्हते. पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव अजूनही आहेच.**

अगदी प्राचीन काळापासून स्त्रिया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या. पारंपारिक भारतीय समाजात तर स्त्रियांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. स्त्री ही पुरुषांच्या मार्गातील अडसर आहे. या दृष्टिकोनातून स्त्रीकडे पाहिले जात होते. परिणामी, भारतीय समाजातील एक दुर्बल व अन्यायग्रस्त घटक अशी स्थिती त्यांना प्राप्त झाली होती. साधारणत: विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्त्रियांच्या अवस्थेत व सामाजिक स्थानात बदल होऊ लागला. अर्थार्जनासाठी स्त्रिया बाहेर पडू लागल्या आणि त्यातून त्यांना थोडेफार आर्थिक स्वावलंबन लाभले. अर्थात, स्त्रिया घराच्या बाहेर पडू लागल्या तरी स्त्री-पुरुष समानतेचे तत्व समाजाच्या गळी लगेच उतरणे शक्य नव्हते. पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव अजूनही आहेच. स्त्रियांच्या हक्कांच्या प्रश्नाला चालना देण्याच्या कामी संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेतला.

**संयुक्त राष्ट्रसंघाकडून केलेले प्रयत्न :-**

संयुक्त राष्ट्राच्या मानवी हक्कविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्यातही स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांच्या तत्वाचा समावेश करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, सर्व मानव प्रतिष्ठा व हक्क याबाबतीत जन्मत:च स्वतंत्र व समान आहेत. तसेच जाहिरनाम्याच्या दुसऱ्या कलमात असा उल्लेख आहे की, कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता या जाहिरनाम्यातील हक्क व स्वातंत्र्य प्राप्त करण्यास प्रत्येकजण पात्र आहे. लिंगभेद विचारात न घेता प्रत्येक मानवाला सर्व प्रकारच्या मानवी हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने १९४६ मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. तसेच संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १९५२ मध्ये महिलांच्या राजकीय हक्कांचा ठराव संमत केला. या ठरावात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क देण्यासंबंधी आग्रह धरण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १९५७ मध्ये

विवाहीत महिलांच्या राष्ट्रीयत्वासंबधीचा ठराव संमत केला. १९६२ मध्ये विवाह, विवाहाचे किमान वय व विवाहाची नोंदणी यासंबंधीचा ठराव संमत केला. संयुक्त राष्ट्रांनी सन १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले होते. त्यानिमित्ताने मेक्सिको शहरात आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. पुढे सन १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा महिला विकास निधी स्थापन करण्यात आला. सन १९७६ ते १९८५ हे दशक संयुक्त राष्ट्राचे महिला दशक म्हणून साजरे करण्यात आले. १९८० मध्ये 'कोपेनहेगन' या ठिकाणी, १९८५ मध्ये 'नैरोबी' या ठिकाणी, १९९५ मध्ये बिजिंग येथे जागतिक

***भारतातील शैक्षणिक नियोजनकर्त्यांनी स्त्री व पुरुष यांच्यामधील दरी कमी करण्याकरिता रणनिती ठरविली. १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टिकोन 'कल्याण' हा होता तर १९७० च्या सुमारास 'विकास' हा झाला व १९९० पासून 'सबलीकरण' हा दृष्टिकोन झाला.***

महिला परिषदांचे आयोजन करण्यात आले. महिलांची स्थिती सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयी विचार करण्यात आले. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने सन २००० मध्ये महिलाविषयक विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनात बीजिंगच्या जागतिक महिला परिषदेने तयार केलेल्या कृती आराखडयाचा आढावा घेण्यात आला. या विशेष अधिवेशनात जगातील १८० राष्ट्रांच्या महिला प्रतिनिधींनी भाग घेतला होता. महिलांशी संबंधित अनेक समस्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

**स्त्रियांचा कायदेशीर दर्जा :-**

राज्यघटनेनुसार भारतीय समाजातील प्रत्येक नागरिकांस मग तो पुरुष असो अथवा स्त्री सर्वाना समान अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याच प्रमाणे १० डिसेंबर १९४८ रोजी 'मानवी हक्कांची सनद' निर्माण झाली. स्त्रियांसाठी विविध कायदे तयार करण्यात आले. कायदा हा स्त्री सबलीकरणाच्या मार्गातील सर्वात महत्वाचा आधारस्तंभ ठरला आहे. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन यांना वेग आणता येतो. म्हणून कायद्याद्वारे स्त्री सबलीकरण साधण्यासाठी भारतात विविध कायदे केले गेले. त्यातील महत्वाचे कायदे खालीलप्रमाणे आहेत.

१-सतीबंदी कायदा - १९३९, १९८७
२-वारसा हक्क अधिनियम, १९८०
३-बालविवाह प्रतिबंधक कायदा, १९५४
४-मजूरी दर अधिनियम, १९४८
५-विशेष विवाह कायदा, १९५४
६-नोंदणी विवाह कायदा, १९५४
७-हिंदू विवाह कायदा, १९५५
८-वेश्याव्यवसाय विरोधी कायदा, १९५६
९-दत्तक घेण्याचा हक्क, १९५६
१०-द्विभार्या प्रतिबंधक कायदा, १९५५
११-घटस्फोटाचा कायदा, १९५५
१२-पोटगी कायदा, १९४६, १९५६
१३-मातृत्व लाभ कायदा, १९६१
१४-हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१, १९८४
१५-विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा कायदा, १९७२
१६-समान वेतन कायदा, १९७६
१७-बलात्कार विरोधी कायदा, १९८०
१८-अनैतिक व्यापार कायदा, १९८६
१९-गर्भजलचिकित्सा विरोध कायदा, १९८८
२०-राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९०
२१-कौटुबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५

अशा अनेक कायद्यांच्या माध्यमातून स्त्रियांना विशेष हक्क प्राप्त झाले आहेत.

**महिला सबलीकरण/महिला सक्षमीकरण** (Women Empowrment) :-

भारतातील शैक्षणिक नियोजनकर्त्यांनी स्त्री व पुरुष यांच्यामधील दरी कमी करण्याकरिता रणनिती ठरविली. १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टिकोन 'कल्याण' हा होता तर १९७० च्या सुमारास 'विकास' हा झाला व १९९० पासून 'सबलीकरण' हा दृष्टिकोन झाला.

सबलीकरण किंवा सक्षमीकरण म्हणजे एखाद्याला सामर्थ्यवान करणे किंवा असमतोलाच्या बाबतीत स्वत: निर्णय घेणे जसे की शिक्षण, सहभाग,

आर्थिक स्वातंत्र्य, गतिमानता, सार्वजनिक ठिकाणी भाष्य करणे, हक्कांबाबत जागरुकता व अंमलबजावणी व राजकीय सहभाग इत्यादी. महिला सबलीकरण ही केवळ सत्तेचे वाटप, पुनर्वाटप किंवा सहभागापुरतीच मर्यादीत नसून त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक व्यवस्थेतील बदल अपेक्षित आहेत.

सबलीकरण हे बहुविध, बहुआयामी व बहुपातळ्या (Multi-faceted, Multi Dimensional & Multi-layered) असलेली संकल्पना आहे. सबलीकरणाच्या संकल्पनेमध्ये सत्तेचे न्याय्य वाटप अपेक्षित आहे. परंतू त्यासाठी समाजात अस्तित्वात असलेल्या सत्ता व अधिकाराच्या वाटप व्यवस्थेचा अभ्यास करावा लागतो. तसेच समाजातील रुढी, परंपरा, जातीव्यवस्थेची स्थिती समजावून घ्यावी लागते. त्या दृष्टिने महिला सबलीकरणाचा विचार केल्यास भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा, त्यांचे सामाजिक, राजकिय, आर्थिक सत्तेमधील स्थान यांचा विचार करावा लागतो.

जागतिक स्तरावरील स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा लक्षात घेता १९७५ हे वर्ष 'बालिका वर्ष' म्हणून साजरे करण्याचे संयुक्त राष्ट्र संघाने जाहिर केले. १९७५ ते १९८५ हे 'महिला दशक' स्त्री प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी साजरे केले गेले. भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण २००१ मध्ये मंजूर करण्यात आले.

महिलांचे आर्थिक दृष्टीने स्वातंत्र्य ही आजची गरज आहे. महिला व बालविकास विभागाने महिलांच्या प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. ग्रामीण महिलांना प्रशिक्षण व रोजगार प्राप्त करुन देण्याकरिता कार्यक्रम १९८७ मध्ये सुरु करण्यात आला. यामध्ये दुग्धव्यवसाय, पशुपालन, रेशीम उद्योग, हातमाग व सामाजिक वनीकरण या क्षेत्रात प्रशिक्षण दिले जाते. या योजनेमुळे ५,५०,००० महिलांना लाभ झाला. १९९७ मध्ये 'बालिका समृध्दी योजना' मुलींच्या समृध्दीकरता सुरु करण्यात आली. १९९५ मध्ये 'इंदिरा महिला योजना' १९९८ मध्ये ग्रामीण महिला विकास व सबलीकरण प्रकल्प सुरुवातीस सहा राज्यांमधील स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून सुरु केला. तसेच गरीब व गरजू महिलांना कर्जाच्या सोयी उपलब्ध करुन देण्याकरिता 'राष्ट्रीय महिला कोष' स्थापन करण्यात आले.

अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा अंतर्भाव करुन घेण्याकरिता आणखी एक बाब महत्वपूर्ण ठरली, ती म्हणजे मायक्रो फायनान्स (Micro Finance). यामुळे स्वयंसहाय्यता गटांना (Self-helf group) दुहेरी फायदा झाला. त्यांची बँकामध्ये बचत झाली व त्यांना कर्ज मिळण्याची सोयदेखील झाली. यामुळे कमी उत्पन्न गटातील महिला मोठ्या प्रमाणात आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झाल्या. मार्च २०१० पर्यंत ६९.५३ लाख बचत गट हे नाबार्ड अंतर्गत नोंदणीकृत झाले आहेत. यापैकी ७६% बचत गट महिलांचे आहेत.

**महिला सबलीकरणासाठी विविध शासकीय योजना :-**

महिला विकासासाठी केंद्रसरकारने स्वतंत्र योजना जाहिर केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१- अल्पमुदत निवासगृहे - स्त्रियांच्या अल्प वास्तव्यासाठी अल्पमुदती निवासीगृहे चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाना रु. ५०,०००/- अनावर्ती व रु. ४,०२,३५०/- एवढे अनुदान ३० महिलांकरिता केंद्र शासनामार्फत मंजूर करण्यात येते.

२- नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृहे - वसतीगृह इमारत बांधकामाच्या खर्चाच्या ७५% खर्च व जमीन खरेदीच्या ५०% रक्कम अनुदान म्हणून मंजूर केले जाते.

३- स्टेप - महिलांची उद्योजकता वाढावी यासाठी अनुदान दिले जाते.

४- नोरॉड - नागरी भागातील गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या व ग्रामीण भागातील अल्प उत्पन्न गटातील महिलांना प्रशिक्षण, रोजगार व उत्पादन केंद्र चालू करण्यासाठी अनुदान दिले जाते.

५- राष्ट्रीय महिला कोष - ग्रामीण भागातील ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न रु. १०,०००/- व शहरी भागातील ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न रु. १८,०००/- पेक्षा जास्त नसेल अशा महिलांना बचत गटांमार्फत कर्ज दिले जाते.

६- स्वाधार - निराधार महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी ही योजना आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना -

१- ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन पुरविणे.

२- महिला मंडळातर्फे गावात वाचनालय व प्रौढशिक्षण

३- ग्रामपातळीवरील बालकांच्या/ महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहनासाठी स्पर्धा आयोजित करणे.

४- महिला प्रतिनिधींना पंचायत राज संस्थेबाबतचे प्रशिक्षण.

५- महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल.

६- अपंग स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे/त्यांचे पुनर्वसन करणे.

७- गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी गाय, म्हैस, बकरी खरेदीसाठी मदत.

८- गरीब मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय्य.

९- आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांना संसारोपयोगी साहित्य पुरविणे.

१०- निराश्रीत महिलांना घरकुलासाठी मदत.

११- स्वयंसिध्दा (बचत गट)

१२- शिधावाटप/रास्तभाव दुकानांचे वाटप.

१३- आरे सरिता केंद्र (दुग्ध व्यवसाय)

१४- बीज भांडवल योजना (उद्योग विभाग)

**महाराष्ट्र शासनाच्या योजना -**

१- निराश्रीत महिलांसाठी शासकीय राज्यगृहे.

२- महिला मंडळाच्या महिला प्रशिक्षण केंद्रास अनुदान.

३- व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन.

४- देवदासी पुनर्वसन योजना.

५- देवदासी निर्वाह अनुदान.

६- सावित्रीबाई फुले बहुउद्देशिय महिला केंद्रे.

७- कामधेनू योजना.

८- मनोधैर्य योजना

९- तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सशक्तीकरण कार्यक्रम

१०- मातृत्व अनुदान योजना.

११- राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना.

१२- इंदिरा आवास योजना.

१३- एकात्मिक बालविकास सेवा योजना.

१४- नवसंजीवन योजना.

**महिला सक्षमीकरणाच्या योजना**

१- वन स्टॉप सेंटर स्कीम.

२- वूमन हेल्पलाईन स्कीम.

३- वर्कींग वूमेन होस्टेल

४- राजीव गांधी नॅशनल क्रेच स्कीम फॉर द चिल्ड्रन ऍन्ड वर्कींग मदरस्.

५- स्वाधार गृह.

६- रिव्हिजन अंडर IGMSY in XIIth Plan.

७- नारी शक्ती पुरस्कार.

८- स्त्री शक्ती पुरस्कार,

९- इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना.

१०- महात्मा गांधी नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम.

११- नॅशनल रुरल हेल्थ मिशन.

१२- सर्व शिक्षा अभियान.

१३- नॅशनल लिटरसी मिशन.

१४- इंदिरा गांधी नॅशनल विडो पेन्शन स्कीम

१५- इंदिरा गांधी नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्कीम

१६- जननी सुरक्षा योजना.

१७- पंचायत महिला एवं महिला सशक्तीकरण अभियान

१८- सायन्स ऍन्ड टेक्नॉलॉजी फॉर वूमेन.

१९- आदिवासी महिला सशक्तीकरण योजना.

२०- मदर ऍन्ड चाईल्ड ट्रॅकींग सिस्टीम (२००९)

२१- प्रियदर्शिनी २०११

२२- उज्वला : (CSCT-

Comprehensive Scheme to Combat Trafficking)

२३- आशा स्वयंसेविका

२४- नवसंजिवनी योजना

२५- बेटी बचाओ बेटी पढाओ योजना

२६- प्रधानमंत्री उज्वला योजना

२७- इंद्रधनुष्य योजना

२८- बालिका समृध्दी योजना

२९- जेंडर बजेटींग स्कीम

वरील योजना देशभर चालू आहेत. विशेषत: ग्रामीण परिसरातील दारिद्र्य निर्मूलनात बचत गट हे विकासाचे साधन बनत आहेत. स्वयंसहाय्यता गटामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. तथापि आजच्या राजकारणावर, समाजकारणावर व अर्थकारणावर पूर्वीप्रमाणेच पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व आहे. अनेक स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव जागांच्या तरतूदीमुळे स्त्रिया जरी निवडून आल्या तरी अनेक ठिकाणी त्या महिलांचे पतीच खरे पडद्यामागचे सूत्रधार असतात. जेव्हा महिलांना उमेदवारी देण्याचा विषय राजकीय नेत्यांपुढे येतो तेव्हा उमेदवारी फक्त राजकीय पुढाऱ्यांच्या पत्नी, कन्या, सुन इत्यादींना दिली जाते. म्हणजे सामान्य स्त्रियांचा फारसा विचार केला जात नाही.

वास्तविक पाहता महिला योग्य पद्धतीने, प्रामाणिकपणे राजकारण करु शकतात, पण जेथे महिला स्वतंत्रपणे कारभार पाहण्याचा प्रयत्न करतात, स्वत: निर्णय घेतात तेथे त्यांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक होते. त्यामुळे विकासकार्ये योग्यरीतीने होऊ शकत नाहीत. काही ठिकाणी ग्रामीण भागातील महिला आपआपल्या पदावर प्रभावीपणे काम करताना इतकी लोकप्रियता वाढते की त्यांच्यावरच्या पदावर असलेले आमदार, खासदार यांना या महिला डोईजड झाल्यासारख्या वाटतात व मग या स्त्रीयांविरुध्द कटकारस्थाने केली जातात. तिचे खच्चीकरण केले जाते. कदाचित तिचे चारित्र्यहननही केले जाते. अशावेळेस ती सुशिक्षीत असेल तरच तोंड देऊ शकेल. याकरिता खालील बाबी होणे आवश्यक आहे.

१- महिलांना संसदेत व विधानसभेत ५०% आरक्षण दिले जावे.

२- महिलांना राजकीय आरक्षण देताना त्या त्या समाजघटकातही राखीव जागा दिल्या जाव्यात. त्यामुळे खुल्या गटाप्रमाणे मागासवर्गीय, आदिवासी वर्गातूनही नवे महिला नेतृत्व पुढे येऊ शकेल.

३- महिलांना महत्वाची मंत्रीपदे दिली जावीत किमान ३५% मंत्रीपदे महिलांसाठी राखीव ठेवली जावीत.

४- तरुण मुलींमधून महिला नेतृत्व घडवावे. यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जावे.

भारतीय स्त्रियांचा दर्जा जगाच्या, विकसित राष्ट्रांच्या व आशिया खंडातील स्त्रियांच्या तुलनेत आरोग्य, शिक्षण, रोजगार व सत्ता, प्रतिष्ठा या क्षेत्रात कमी आहे. हा दर्जा सुधारण्यासाठी काही ठोस उपाय व कालबध्द कृती कार्यक्रम आरोग्य साक्षरता, शिक्षण, रोजगार, राजकीय सत्तापदे या क्षेत्रात राबविले पाहिजेत.

■■■

*लेखिका श्रीमती सुशिलादेवी म. देसाई कन्या महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्य करीत आहेत.*

Email: surekhatwandkar@gmail.com

## आगामी अंक

**ऑक्टोबर २०१६**

**'वस्त्रोद्योग'**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.

# महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाचा मागोवा

डॉ.दीपक भुसारे



**महाराष्ट्र राज्याला महापुरूषांच्या विचाराचा वारसा लाभलेला आहे. म्हणून पुरोगामी महाराष्ट्र अशी ओळख आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून सर्व क्षेत्राचा विकास झाला पाहिजे. तसेच पुरूषासोबत महिलांचाही सर्वांगीण विकास झाला पाहिजे. महिलां आर्थिक, सामाजिक व राजकीय सबल झाल्याशिवाय त्यांचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. म्हणून महिला सबलीकरणावर शासन व समाजाने अधिक भर देणे आवश्यक आहे.**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९६० मध्ये महाराष्ट्र राज्यांची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याला महापुरूषांच्या विचाराचा वारसा लाभलेला आहे. म्हणून पुरोगामी महाराष्ट्र अशी ओळख आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून सर्व क्षेत्राचा विकास झाला पाहिजे. तसेच पुरूषा सोबत महिलांचाही सर्वांगीण विकास झाला पाहिजे. महिला आर्थिक, सामाजिक व राजकीय सबल झाल्याशिवाय त्यांचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. म्हणून महिला सबलीकरणावर शासन व समाजाने अधिक भर देणे आवश्यक आहे.

भारत हा विकसनशील देश आहे. जगात एक मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे बघितले जाते. कारण भारताची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०९ कोटी आहे. जागतिक लोकसंख्येच्या १७ टक्के लोकसंख्या भारतात आहे. यामध्ये १००० पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४३ आहे. हे प्रमाण राज्यनिहाय वेगळे आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या देखील २०११ च्या जनगणनेनुसार ११.२५ कोटी असून त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण ४८.२ टक्के आहे. १००० पुरूषाचे मागे स्त्रियांचे प्रमाण ९२९ ऐवढे आहे. त्याच प्रमाणे साक्षरतेमध्ये पुरूष ८८.४० टक्के व स्त्री ७५.९ टक्के ऐवढे आहे. आज अनेक क्षेत्रात महिला पुरूषाबरोबर काम करतांना दिसत आहे. भारताच्या सर्वोच्च पदी देखील महिला विराजमान झालेल्या आहे. भारतात पितृसत्ताक (पुरूषप्रधान) कुटूंब पध्दती असल्यामुळे महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढून देखील त्यांना कुटूंब, राजकारण व समाजात स्वतंत्र्यपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य फारसे नाही.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदिर्घ परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, महात्मा फुले, शाहू महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा महाराष्ट्र राज्याला लाभलेला आहे. परंतु ऐवढे असताना महिलांचे खऱ्या अर्थाने आर्थिक व सामाजिक, सबलीकरण (Woman Empowerment) झाले का? आजही बलात्कार, हुंडाबळी या स्वरूपाचे आत्याचार थांबले का? महाराष्ट्र महिलांवरील होणाऱ्या अत्याचारात भारतात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. याबाबत चिंतन सर्व स्तरावरून करणे आवश्यक आहे.

### महिला सबलीकरण अर्थ

आज महिला सक्षमीकरणासाठी सर्व स्तरावर मोठया प्रमाणात प्रयत्न केले जात आहे. त्यासाठी मोठया प्रमाणात

योजना राबवून महिलांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे. परंतु आजही समाजकारणात व राजकारणात स्त्रियांचे मोठया प्रमाणात मागसलेपणा दिसून येत आहे. स्त्रीवादी चळवळीच्या मते, जोपर्यंत स्त्रीया सर्वांगीण सबल होत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण थांबत नाही. महिला सक्षमीकरण याचा व्यापक अर्थ आहे. म्हणजेच महिला समाजकरण, राजकरण यामध्ये नेतृत्व करत नाही तो पर्यंत त्या आर्थिक दृष्टया समृध्द होत नाही.

महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय. याचाच अर्थ महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्योग इ. सर्व क्षेत्रात समान सहभाग अपेक्षित आहे.

**महिला धोरणाचा आढावा :**

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) १९७५ हे वर्ष सर्व प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले आणि त्याचे पुढे महिला दशकामध्ये रूपांतर झाले. भारत सरकारने महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठीत केली. संयुक्त राष्ट्र संघाने १९७९ मध्ये महिलांची प्रगती वेगाने होण्यासाठी आंतरराष्ट्रीय संकेत तयार केले. त्याला सीडो (Convention on the Elimination of all forms Discrimination Against women) म्हणतात. हा अत्यंत महत्वाचा दस्ताऐवज मानला जातो. सर्व सदस्य राष्ट्रांना हा दस्ताऐवज महिला धोरण ठरविण्यासाठी पायाभूत मानावे लागेल. महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये सर्व प्रथम महिला धोरण मांडले. त्यानंतर दुसरे महिला धोरण २००१ मध्ये तयार करण्यात आले आणि २०१३ मध्ये तिसरे महिला धोरण महाराष्ट्र शासनाने तयार केले आहे मात्र आता पर्यंत तीन महिला धोरण करून देखील राज्यातील महिला सबलीकरणाबाबतच्या परिस्थितीत अपेक्षित बदल झाला नाही म्हणून महिला धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे.

**महिला धोरण २०१३**

महाराष्ट्र शासनाने तिसरे महिला धोरण २०१३ मध्ये घोषित केले. या धोरणाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

***महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय. याचाच अर्थ महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्योग इ. सर्व क्षेत्रात समान सहभाग अपेक्षित आहे.***

**उद्दीष्टे** (Objective) :

१. महाराष्ट्रातील महिलांचा सर्वांगीण विकास व सबलीकरणासाठी प्रागतिक दृष्टीकोन रूजविणे व पुरूषप्रधान मानसिकता बदलणे व स्त्री आणि पुरूष यांचे परस्पर संबंध अधिक सौहार्दपूर्ण व निकोप व्हावे यासाठी प्रयत्न करणे.
२. महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व त्यांना आपली उद्दीष्टे साध्य करता येण्यासाठी आवश्यक ते पोषक वातावरण व साधने उपलब्ध करून देणे.
३. धर्म, वंश, जात, सत्ता, प्रदेश या कारणामुळे वाढत्या हिंसेचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी स्त्रीयांना पाठबळ देणे, किंबहुना या प्रकारच्या हिंसा होणारच नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे.
४. स्त्री-पुरूष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.
५. महिलांच्या पारंपारीक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे व गृहिणीच्या घरकामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.
६. शासनाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रियेत समाजातील सर्व महिलांच्या हिताचे व हक्कांचे संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
७. समाजातील मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या स्त्रीया, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोक कलावंत महिला आणि तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे. तसेच महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.
८. समाजाच्या विषमतामुलक रचनेमुळे, विशेषत: अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती व भटक्या जमाती जातीतील अल्पसंख्यांक समुदायातील महिलावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.
९. असंघटीत क्षेत्रातील कार्यरत महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे.
१०.स्त्रीयांना त्यांच्या क्षमतांचा पुरेपुर उपयोग करता यावा, यासाठी घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचार विरहित व सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

**महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र**

**शासनाच्या विविध योजना :**

१. शासकीय महिला वसतिगृहे : राज्यात १६ ते ६० वयोगटातील संकटग्रस्त महिलांसाठी २० वसतिगृहे आहे. त्यांची प्रवेशक्षमता २०० असून त्या महिलांना दर महा १०००/- रू. मदत दिली जाते.
२. स्वयंसेवी आधारगृहे : राज्यात सहा जिल्हयात नऊ स्वयंसेवी आधारगृहे आहे. यामध्ये ५९० प्रवेशक्षमता असून त्यांना प्रतिमहिना १००० रू. तर बालकांना ५०० रू दिले जातात.
३. संरक्षण गृहे : अनैतिक व्यवसायातून पोलीसांनी सोडवून आणलेल्या महिला व मुलींचे संरक्षण व पुनर्वसनासाठी राज्यात नागपूर व मुंबई येथे ही संरक्षणगृहे आहेत.
४. समुपदेशन : महिलांशी संबंधित कौटूंबिक हिंसा, अत्याचार इ. प्रतिबंध करण्यात आला. राज्यातील काही पोलीस ठाण्यामध्ये महिला समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात एकुण १३६ केंद्रे असून या केंद्राना प्रत्येकी वार्षिक रू. २.३५ लाख दिले जातात.
५. मनोधैर्य योजना : बलात्कार, लैंगिक अत्याचार पीडीत महिलांना न्याय देण्यासाठी शासनाने ऑक्टोबर २०१३ पासुन ही योजना सुरू केली आहे. पिडीतांना किमान दोन लाख रू. व विशेष प्रकरणामध्ये कमाल रू तीन लाख मदत दिली जाते. ॲसिड हल्यात गंभीर जखमी झालेल्यांना रू. तीन लाख आणि इतर जखमींसाठी रू. ५००००/- अर्थ सहाय देण्यात येते.
६. शुभमंगल सामुदायिक विवाह योजना : सामुदायिक विवाह आयोजित करण्यासाठी प्रतिजोडपे स्वयंसेवी संस्थेस रू. २०००/- आणि वधू पित्यास गृहपयोगी सामानासाठी रू. १००००/- अनुदान दिले जाते.

**केंद्र पुरस्कृत योजना :**

१. नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे : ही वसतिगृहे बांधकामासाठी ७५ टक्के अनुदान स्वयंसेवी संस्थांना दिले जाते. राज्यात १२७ वसतिगृहे असुन त्यामध्ये ९१७२ महिला राहतात.
२. प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम: महिलांच्या छोटया गटांना चालना देणे, स्वयंरोजगार व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे आणि स्वयंरोजगार तथा उत्पन्न निर्मितीचे प्रकल्प सुरू करण्यासाठी अर्थसहाय दिले जाते. असे १६ प्रकल्प कार्यरत आहेत. त्याची प्रवेश क्षमता १०५० आहे.
३. स्वाधार: संकटग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी ४६ प्रकल्प सध्या राज्यात सुरू आहेत. त्यामध्ये २५०० लाभार्थी आहेत.
४. उज्वला: महिलांचे लैंगिक शोषण

***महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्याच्या महिलांसाठीच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला आर्थिक महामंडळाची स्थापना केली आहे. हे महामंडळ महिलांना विविध व्यवसायासाठी वित्तपुरवठा करणारी राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. हे महामंडळ बचत गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या संबंधित विभाग यामधील समन्वय साधण्याचे कार्य करते.***

अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी आणि पिडीतांची सुटका, पुनर्वसन करण्यासाठी ४० संस्था कार्यरत असून त्यापैकी १४ निवासी संस्था आहेत.

**महिला आर्थिक विकास महामंडळ :**

महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्याच्या महिलांसाठीच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला आर्थिक महामंडळाची स्थापना केली आहे. हे महामंडळ महिलांना विविध व्यवसायासाठी वित्तपुरवठा करणारी राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. हे महामंडळ बचत गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या संबंधित विभाग यामधील समन्वय साधण्याचे कार्य करते. महिला सबलीकरणामध्ये या महामंडळाचे महत्वपूर्ण योगदान आहे. २०१४-१५ मध्ये या महामंडळाला १९.०८ कोटी रूपये निधी मिळाला होता. त्यापैकी डिसेंबर २०१४ पर्यंत ८.९३ कोटी रू वितरीत केला आहे. डिसेंबर २०१५ पर्यंत १०४१५ गावामध्ये ९.१८ लाख महिला ६८९३६ स्वयं सहायता गटामध्ये सहभागी होत्या या महिलांची बचत सुमारे २७१.१९ कोटी रू. होती आणि एकूण अंतर्गत वितरीत कर्ज ७६०.४७ कोटी इतके होते.

**लिंगाधारित अर्थसंकल्प** (Gender Budget)

जगात सर्व प्रथम १९८० मध्ये ऑस्ट्रेलिया या देशाने लिंगाधारित अर्थसंकल्पाची संकल्पना मांडली तर इंग्लंडमध्ये १९८९ मध्ये लिंगाधारित अर्थसंकल्प मांडला. भारतात २००२ मध्ये लहीरा चक्रवर्ती आणि भट्टाचार्य यांनी लिंगाधारित अर्थसंकल्पाची शिफारस केली होती. सध्या जगात जवळपास नव्वद पेक्षा जास्त देशात जेंडर बजेट तयार केले जाते. महिलांची सामाजिक, आर्थिक प्रगती आणि सबलीकरणासाठीच्या योजना राबविणे, महिलांना विशेष निधी देणे हे लिंगाधारित अर्थसंकल्पात अपेक्षित आहे. मात्र भारत सरकार किंवा इतर कोणत्याही राज्य सरकारकडून हा लिंगाधारित अर्थसंकल्प स्वतंत्रपणे मांडला जात नाही. त्यामुळे

महिला खऱ्या अर्थाने आर्थिक सक्षम होऊ शकत नाही.

**भारतीय महिला बँका**

भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात फेब्रुवारी २०१३ मध्ये भारतीय महिला बँकेची स्थापना करण्याची घोषणा केली. महिला बँकेच्या पहिल्या अध्यक्षा म्हणून उषा अनंत सुब्रमण्यम यांची नेमणूक करण्यात आली. या बँकेच्या आठही संचालक महिला आहेत. सध्या देशात २८ राष्ट्रीयकृत बँका असून त्यात या एका राष्ट्रीयकृत बँकेची भर पडली आहे. सध्या देशातील २६ टक्के महिलाच कर्ज घेतात. महिला बँकेने मार्च २०१५ पर्यंत ८० शाखा उघडण्याचा मानस होता. त्यापैकी २० शाखा ग्रामीण भागात असतील. २०२० पर्यंत बँकेच्या ७७० शाखा स्थापन केल्या जाणार आहेत. भारतातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी निश्चितपणे या बँकेचा फायदा होईल मात्र या बँकेने आपले जाळे ग्रामीण भारतात निर्माण करणे आवश्यक आहे. तरच तळागळातील महिला आर्थिक दृष्टया सदृढ होईल.

**महिलांचे आर्थिक सबलीकरण :**

महिला सबलीकरणांसाठी आर्थिक घटक अत्यंत महत्वाचा आहे. त्याशिवाय त्यांचा सर्वांगिण विकास होऊ शकत नाही. सामाजिक क्षेत्रावरील खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये महिलांचा देखील समावेश असतो. परंतु २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत सामाजिक क्षेत्रातील खर्च हा ३.४० टक्के वरून २.५७ टक्के इतका कमी झाला आहे. असे "Centre for Governance and Budget Accountability (CGBA) " या संस्थेच्या आकडेवारी वरून स्पष्ट होते. खालील तक्त्यात महिला व बाल कल्याण मंत्रालयाने विशिष्ट कार्यक्रमासाठी केलेली आर्थिक तरतूद दर्शविली आहे.

**तक्ता क्र.१ केंद्रीय महिला व बाल कल्याण विभागातील योजनासाठी खर्च (कोटी रू.)**

| अ. क्र | योजना | (BE) 2014&15 | (BE) 2015&16 | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | कामकरी महिलांसाठी वसतिगृहे | २० | ३० | ५ |
| २ | एस.टी.ई.पी. | २० | ३० | १० |
| ३ | सी.एस.डब्ल्यू. पी. | ८०-९१ | ७३-५७ | -७.३४ |
| ४ | राष्ट्रीय महिला कोष | २० | ० | -२० |
| ५ | एक थांबा आपत्ती मदत केंद्र | २० | ०२ | -१८ |
| ६ | स्वादर | ११५ | ५० | -६५ |
| ७ | बलात्कारीत महिलांना न्याय व पुनर्वसन | ३० | ० | -३० |
| ८ | राष्ट्रीय महिला आयोग | १९-०५ | २५-१५ | ५-३५ |
| ९ | लिंग समभाव अर्थसंकल्प | १-० | २-० | १-० |
| १० | धन लक्ष्मी योजना | ५-० | ० | -५.० |
| ११ | उज्वला योजना | १६-० | २० | ४-० |
| १२ | प्रियदर्शनी योजना | १५-० | ५-० | -१० |
| १३ | प्रौढ मुलींसाठी सबलीकरण योजना (सबला) | ७०-० | १० | -६९० |
| १४ | एकटया महिला व विधवांच्या घरांसाठी साहय | २०-० | ० | -२० |
| १५ | घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा अंमलबजावणी (राज्यांना अर्थसहाय्य) | ५०-० | ० | -५० |
| १६ | महिला हेल्पलाईन | १०-० | १-० | -९.० |
| १७ | इंदिरा गांधी मैत्रीत्व सहयोग योजना | ४०-० | ४३८ | ३८ |
| १८ | एन.एम.इ. डब्ल्यू | ९० | २५ | -६५ |

*Souree- Union Budget 2015-16 Exprenditure Budget Vol.I Part-1 Gender Gudset*

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते की, केंद्र सरकारच्या महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर २०१५-१६ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतुद (Budget Estimet) करताना हात आखडता घेत्याचे दिसुन येते. मंत्रालय निहाय निधी वाटप पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता २ केंद्रीय मंत्रालय निहाय महिलांसाठी निधी वाटप (कोटी रू.)**

| अ. क्र | मंत्रालय व विभाग | (BE) 2014&15 | (BE) 2015&16 | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी शिक्षण व संशोधन | १४-९५ | ४४-२३ | २९-२८ |
| २ | अर्थ मंत्रालय निर्भया निधी | १००० | १००० | ० |
| ३ | आरोग्य व कुटुंब कल्याण | ३७८८-४४ | ३८५२-११ | ६३-६७ |
| ४ | ग्रामीण विकास व इंदिरा आवास योजना | १६००० | १००२५- | -५९७५ |
| ५ | महिला व बाल कल्याण मंत्रालय व्यतिरिक्त इतर मंत्रालय | ५३३-०६ | ११२४-६२ | ५९१-५६ |
| ६ | महिला व बाल कल्याण मंत्रालय वगळता महिला विशिष्ट योजनांची तरतूद | २१३२१-५ | १६००१-७३ | -५३१९-७७ |
| एकूण | ४२६५७-९५ | ३२०४७-६९ | १०६१०-२६ | |

*Source-Union Budget 2015-16, Expenditure Budget No.1, Part A Gender Budget Statement*

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते की, केंद्र सरकारच्या विविध मंत्रालय निहाय महिलासाठी २०१४-१५ च्या अर्थसंकल्प अंदाज (BE) ४२६५७.९५ कोटी रू. तरतूद केली होती. तर २०१५-१६ या वर्षी सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूदीसाठी (BE) ३२०४७.६९ कोटी रू. तरतूद केली आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पीय सुधारीत अंदाज करताना आर्थिक तरतूद ही कमी केली आहे. यावरून सरकारचा महिलांविषयी दृष्टीकोन लक्षात येतो. ज्या विभागात किंवा योजनामध्ये ३० टक्के किंवा अधिक महिला लाभार्थी आहेत त्या विभागातील आर्थिक तरतुदी पढील तक्त्यात दर्शविल्या आहेत.

**तक्ता क्र.३ केंद्रीय विभागात किंवा योजना मध्ये ३० टक्के किंवा अधिक महिला लाभार्थ्यासाठी आर्थिक तरतूद. (कोटी रू.)**

| अ. क्र | मंत्रालय व विभाग | (BE) 2014&15 | (BE) 2015&16 | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी व सहकार | ७५० | ३५३९-०६ | २७७९-०६ |
| २ | आरोग्य व कुटूंब कल्याण | ११८२४-०१ | ९९७७-८२ | -१८४६-१९ |
| ३ | शालेय शिक्षण व साक्षरता | १६२०८-१६ | १२४७२-०७ | -३७३६-०९ |
| ४ | उच्च शिक्षण | ७६२१-५७ | ७४४६-३४ | -१७५-२३ |
| ५ | कामगार व रोजगार | १७५ | २५० | ७५ |
| ६ | सुक्ष्म लघू व मध्यम उद्योग | ५१५-०९ | ४१२-३७ | -१०२-७२ |
| ७ | अल्पसंख्यांक कामकाज | २१५१-०५ | २२६२-६८ | १११-१८ |
| ८ | पंचायत राज | ६९०६ | ० | -६९०६ |
| ९ | ग्रामीण विकास | १३३३२ | १२८१७-६८ | -५१४-३२ |
| १० | समाजिक न्याय सक्षमीकरण | १८२१-०२ | १९९७-०८ | १७६-०६ |
| ११ | आदिवासी कामकाज | १३६१-६ | १४८७-२ | १२५-६ |
| १२ | महिला व बालकल्याण | ११३००-५४ | ८०७२-३६ | -३२२८-१८ |
| १३ | युवक कामकाज व क्रिडा | ९९-४९ | ९९-३७ | -०.१२ |
| १४ | इतर मंत्रालय व विभाग | १८४६-५३ | १५१०-९४ | -३३७-६१ |
| एकूण | ७५९१४-५३ | ६२३४४-९७ | १३५६९-६ | |

*Souree- Union Budget २०१५-१६ Expenditure Budget Vol.I Part-B Gender Budget Statement*

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की ज्या केंद्रीय विभागात किंवा योजना मध्ये ३० टक्के किंवा अधिक महिला लाभार्थी आहेत. त्या विभागासाठी २०१४-१५ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद (BE) ७५९१४.९४ कोटी रू. केली आहे. याचा अर्थ ही तरतूद १३५६९.६ कोटी रू. ने कमी आहे असे दिसून येते. म्हणून महिला सबलीकरणासाठी मोठया प्रमाणात आर्थिक

तरतूद करणे आवश्यक आहे.

**महिलांचे राजकीय सबलीकरण** (Political Empowerment of women)

राजकीय क्षेत्रात महिलांचे सबलीकरण झाल्याशिवाय महिलांचा ख-या अर्थाने नेतृत्व विकास होत नाही. प्राचीन काळापासून स्त्रीयांच्या बाबतची सामाजिक स्थिती लक्षात घेतली तर महिला नेतृत्व विकसित होण्यात सतत अडचणी निर्माण झाल्या आहेत. पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांना सामाजिक दृष्टया दुय्यम लेखले जाते. त्यामुळे भारतात महिलांचे राजकीय सबलीकरण फारसे विकसित होऊ शकले नाही. महिलांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी भारतीय राज्यघटनेत ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के राखीव जागा देण्यात आल्या आहे. तसेच महाराष्ट्र राज्यासह इतर चार राज्यात हे आरक्षण ५० टक्के आहे. खालील तक्त्यात महाराष्ट्राच्या विधानसभेतील पुरूष व महिला सदस्य संख्या दर्शविली आहे.

**तक्ता क्र.४ महाराष्ट्रातील विधानसभेतील महिलांचा सहभाग**

| वर्ष | पुरूष सदस्य | महिला सदस्य | एकुण |
|---|---|---|---|
| १९६२ | २५१ | १३ | २६४ |
| १९६७ | २६१ | ०९ | २७० |
| १९७२ | २७० | ० | २७० |
| १९७८ | २८० | ०८ | २८८ |
| १९८५ | २७२ | १६ | २८८ |
| १९९० | २८२ | ०६ | २८८ |
| १९९५ | २७७ | ११ | २८८ |
| १९९९ | २७६ | १२ | २८८ |
| २००४ | २७६ | १२ | २८८ |
| २००९ | २७७ | ११ | २८८ |
| २०१४ | २६८ | २० | २८८ |

*संदर्भ : निवडणूक आयोगाचे संकेत स्थळ*

तक्ता क्र. ४ वरून असे दिसून येते की, महिलांना ३३ टक्के जागा राजकारणात राखीव असतांना १९६२ पासून २०१४ पर्यंत महिलांचे विधान सभेतील प्रमाण अत्यंत कमी असून २०१४ मध्ये ते प्रमाण सर्वाधिक म्हणजे ६.९ टक्के ऐवढे होते. तसेच १६ वी लोकसभा २०१४ च्या निवडणूकीत एकुण ५४६२ उमेदवारापैकी महिला उमेदवारांचे प्रमाण फक्त ७ टक्के (४०२) होते. संसदेत ५४३ सदस्यापैकी ६१ महिला सदस्य आहेत. हे प्रमाण फक्त ११ टक्के ऐवढे आहे. याचा अर्थ भारताच्या लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण ४८ टक्के असताना त्यांचे संसदेतील प्रमाण फक्त ११ टक्के आहे ही फार शोकांतिका आहे. राजकीय सबलीकरण अद्यापही पुरेसे झाले की नाही. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये जरी महिलांना ५० टक्के आरक्षण असले तरी त्यांना राजकारणात निर्णय घेण्याचे फारसे स्वातंत्र्य नाही आजही त्यांचे कार्य हे त्यांचे पतीच बघतात. हे चित्र राज्यभर दिसून येते ही पुरोगामी महाराष्ट्रासाठी शोभनीय बाब नाही.

**महाराष्ट्रातील महिला अत्याचाराचा आढावा-**

जोपर्यंत महिलांचा सर्वांगीण विकास होत नाही तोपर्यंत महिलांचे सबलीकरण होत नाही. ज्या देशात राज्यात महिलांचे सबलीकरण झालेले असेल तेथे महिलांवरील होणारे अत्याचाराचे प्रमाण नगण्य असते. पुढील तक्त्यात महाराष्ट्र राज्यातील महिलांवरील अत्याचाराचा आढावा घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र.५ महाराष्ट्रातील महिलांवरील अत्याचाराचा आढावा**

| अ.क्र. | | २०१२ | २०१३ | २०१४ |
|---|---|---|---|---|
| १ | बलात्कार | १८३९ | ३०६३ | २९५८ |
| २ | अपहरण आणि पळवून नेणे | ११४० | १८७४ | १९०९ |
| ३ | हुंडाबळी | ३२९ | ३२० | २४८ |
| ४ | पती आणि पतीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | ७४१५ | ८५४२ | ६९८३ |
| ५ | विनयभंग | ३९३५ | ८१३२ | ९१०२ |
| ६ | लैंगिक अत्याचार | १२९४ | २६३२ | १४९४ |
| ७ | अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा | ३६६ | २८९ | १६८ |
| ८ | इतर | १४८२ | १२७७ | १०५५३ |
| | एकुण | १७८०० | २६१२९ | ३३४१५ |

*संदर्भ : महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१४-१५*

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, महिलांवरील अत्याचाराचे नोंदवलेले गुन्ह्याचे प्रमाण हे मोठया प्रमाणात वाढलेले आहे. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी राज्यात २०१२ मध्ये महिलांवरील अत्याचारांची संख्या १७८०० होती तर २०१४ मध्ये अशा ३३४१५ घटना घडल्या. म्हणजे या दोन वर्षात महिलावरील अत्याचारांच्या संख्येत दुप्पटीने वाढ झालेली आहे. समाजात अजुनही महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे महिला विषयी कायदे व पोलीस यंत्रणा यामध्ये मोठया प्रमाणात सुधारणा करणे आवश्यक आहे. हे अत्याचार जोपर्यंत थांबत नाही तो पर्यंत महिलांचे सक्षमीकरण झाले असे म्हणताच येणार नाही. सामाजिक, आर्थिक व राजकीय सबलीकरणासोबत सामाजिक सुरक्षितता निर्माण झाल्याशिवाय महिलांचे सर्वांगिण सक्षमीकरण होऊ शकत नाही.

थोडक्यात, वरील सर्व बाबीचा विचार करता 'महिला सबलीकरण' ही संकल्पना अत्यंत व्यापक स्वरूपाची आहे. महाराष्ट्र हे महिला धोरण (१९९४) तयार करणारे देशातील पहिले राज्य असले तरीही महाराष्ट्रात महिलावर होणाऱ्या अत्याचारांची संख्या मोठी आहे. देशात महिला वरील अत्याचारांमध्ये महाराष्ट्र तिसऱ्या-चौथ्या क्रमांचे राज्य आहे. म्हणजे धोरण व अंमलबजावणीमध्ये विरोधाभास दिसून येतो. एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणतो, मग कुठे गेले त्यांचे विचार? सरकार फक्त धोरणे, कायदे करून मोकळे होते. म्हणून राजकीय व सामाजिक नेत्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. पोलीस यंत्रणेमध्ये सुधारणा तसेच न्यायालयाची संख्या वाढविणे आवश्यक आहे. समाजातील लोकांनी देखील स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.


महाराष्ट्रात सध्या तिसरे महिला धोरण २०१३ पासून राबविण्यात येत आहे. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी. सरकारने लिंगाधारित अर्थसंकल्प (Gender Budget) मध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद करावी. महिलांचे शिक्षण, रोजगार, व्यवसाय यामध्ये प्रमाण वाढले पाहिजे. मातृसत्ताक कुटूंबपध्दती समाजाने स्वीकारणे आवश्यक आहे. तरच महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढेल. महिलांसाठीच्या योजना, राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ हे सर्व ग्रामीण भागातील शेवटच्या महिले पर्यंत पोहचणे आवश्यक आहे. या सर्वांसाठी मोठया प्रमाणात आर्थिक तरतुद करावी. त्याचप्रमाणे राजकारणात महिलांचे सक्षमीकरण खुपच नगण्य आहे. 'चूल आणि मूल' यातुन अजुनही भारतीय स्त्री बाहेर आलेली नाही. आज संसदेतील महिला सदस्यांची संख्या ६१ व महाराष्ट्रातील विधानसभेतील महिला सदस्यांची संख्या २० आहे. ही संख्या एकूण महिला संख्येच्या अत्यंत नगण्य आहे. राजकारणात सहभागाशिवाय नेतृत्व गुणाचा विकास होऊ शकत नाही. ३० टक्के महिलांना आरक्षण असताना संसदेत ११ टक्के महिला व महाराष्ट्राच्या विधानसभेत ६.९ टक्के महिला सदस्य आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. मात्र महिला या नाममात्र सदस्य असतात. प्रत्यक्ष सर्व कारभार व निर्णय

हे त्यांचे पतीच घेतात. त्यामुळे आरक्षण दिले म्हणजे राजकीय सबलीकरण झाले असे अजिबात नाही. त्यासाठी त्यांना विचारांचे, निर्णयांचे स्वातंत्र्य असले पाहिजे. हा प्रश्न पुन्हा एकदा कुटूंब व्यवस्थेशी निगडीत येतो. थोडक्यात महिला सबलीकरणासाठी सर्व बाजुने प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय, सामाजिक मानसिकता बदलणे आवश्यक आहे. तसेच प्रबोधन जनजागृती निर्माण करून, कायद्याचे ज्ञान वाढविले पाहिजे त्याशिवाय खऱ्या अर्थाने महिला सबल होणार नाही. म्हणून महाराष्ट्रातील सरकारने व समाजाने उपरोक्त बाबीचे चिंतन करणे आवश्यक आहे.

■■■

*लेखक प्रतिष्ठाण महाविद्यालय पैठण येथे अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक तथा मार्गदर्शक आहेत.*

email ID : dr.deepak.bhusare@gmail.com





## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,
हे नम्र आवाहन.


# प्रकाशन विभागाची राष्ट्रपती भवन विषयक नुवी पुस्तके

**१) A Work of Bueaty : The Architecture and Landscape of the Rashtrapati Bhavan:**




राष्ट्रपती भवनाची वास्तु आणि सभोतालच्या परिसराची माहिती या पुस्तकात संग्रहित करण्यात आली असून अशा प्रकारचा हा एकमेव दस्तावेज आहे. १९११ साली ब्रिटिशकालीन भारताची राजधानी कलकत्त्याहुन दिल्ली येथे हलवन्यात आली. त्यावेळी सरकारी वास्तुच्या रुपात राष्ट्रपती भवनची उभारणी कशा प्रकारे झाली आणि त्यासंबधिच्या घटनांची माहिती या पुस्तकात वाचायला मिळेल.

**२) First Garden of the Republic: Nature in The President's Estate:**





या पुस्तकात राष्ट्रपती भवन परिसरात निर्माण कारण्यात आलेल्या भव्यबगीच्यामध्ये बहरलेल्या जैवविविधतेची माहिती शब्दबद्ध करण्यात आली आहे। या विस्तीर्ण हरित परिसराची आणि तेथील सजीवांची कशी निगा राखली जाते याचा उलगडा ह पुस्तक वाचल्यानंतर होतो. कित्येक झाडे, वनस्पती आणि पशु-पक्ष्यानी यापरिसराला आपले वसतीस्थान बनवले आहे, त्यासाठी स्वत:चे समायोजन केले आहे, हे करताना त्यांना कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला किंवा आता करावा लागत आहे, याची रंजक माहितीया पुस्तकातून आपल्याला मिळते.

**३) Around India's First Table: Dining and Entertaining at the Rashtrapati Bhavan:**




राष्ट्रपती भवनाती लखान-पान आणि आदरा तिथ्यया बाबतचा `ब्रिटिशकाली नते आजचा भारत या कालखंडाची इंत्यभूत माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. सुरुवातीला ब्रिटिश व्हॉइसरॉयराष्ट्रपती भवनामध्य`वास्तव्यास असताना फ्रेंच खाद्य पदार्थांची तिथे रेलचेल असे. कालांतराने तेथील व्यंजनाचा प्रवास पाश्यात्य ते भारतीय असा कशा पद्धती ने होत गेला याची रोचक माहिती या पुस्तकात दिलेली आहे. ही माहिती वाचत असताना आपल्याला भारताच्या यशस्वी खाद्य किंवा भोजन 'डिप्लोमेसी'ची अनुभूती घेता येते.

४) **Arts and Interiors of the Rashtrapati Bhavan:**



अतिशय विशाल वास्तू असलेल्या राष्ट्रपती भवनाच्या अंतर्गत सजावटीचा भाग असलेली कलाकुसर आणि मौल्यवान, दुर्मिळ वस्तुंची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. तिथ असलेल्या अनेक उच्च दर्जाच्या पेंटिंग्स, उंची फर्निचर आदींचा त्यात समावेश आहे. राष्ट्रपती भवनाच्या विविधदालनामध्ये असलेली वस्त्रे, गालिचे आणि नक्षीकाम- कोरीव काम केलेल्या वस्तू तसेच जतन केलेले अनेक दुर्मिळ दस्तावेज आणि कागदपत्रे यांचाही त्यात समावेश आहे. हे पुस्तक वाचल्यानं बतरराष्ट्रपती भवनाच्या अंतर्गतसजावटीची कल्पनातर वाचकांना येतेच शिवाय एका अदभुत जगात प्रवेश केल्याची ही अनुभूती येते.

५) **Discover the Magnificent World of the Rashtrapati Bhavan:**




हे छोटे खाणी पुस्तक ख़ास लहान मुलांसाठी प्रकाशित करण्यात आले आहे. राष्ट्रपती भवनाची कहानी यात रेखाटण्यात आली आहे. या भव्यवास्तुची उभारणी कशी झाली, या वास्तुने कोणकोणत्या ऐतिहासिक घटना अनुभवल्या, राष्ट्राच्या जडणघडणीत यावास्तुचा कसा हात भार लागला तसेच इथे कोणी कोणी आणि कसे वास्तव्य केले याबद्दलची सुरस माहिती कथा आणि वर्णणाच्या स्वरुपात या पुस्तकात रंजकपणे देण्यात आली आहे.



# ईशान्य : काही तथ्य आणि आकडे
# एनएलसीपीआर निधीचे ईशान्येतील राज्यांना

**वाटप**

ईशान्येतील राज्यांनी सादर केलेल्या प्राधान्ययादीनुसार पायाभूत सुविधांमधील दरी भरून काढण्यासाठी ईशान्येतील राज्यांना अखंड मध्यवर्ती साधनसंपत्ती संचातून निधीचे वाटप करण्यात येते. फेब्रुवारी २०१६ पर्यंत एनएलसीपीआर अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या १४,३०९ कोटी २३ लाख रुपयांच्या १५६९ प्रकल्पांपैकी ५,८४६ कोटी २० लाख रुपयांचे ८९० प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून ८,४६३ कोटी १ लाख रुपयांचे ६७९ प्रकल्प पूर्ण होण्याच्या विविध अवस्थांत आहेत. त्याशिवाय, ३,८६७ कोटी ९० लाख रुपयांचे २४७ प्रकल्प गेल्या तीन वर्षांत राखण्यात आले आहेत. चालू आर्थिक वर्षात (२६ फेब्रुवारी २०१६ पर्यंत) काम सुरु असलेल्या प्रकल्पांसाठी ३७६ कोटी ६१ लाख रुपये वितरित करण्यात आले असून मंजुरी देण्यात आलेल्या नवीन १७ प्रकल्पांसाठी १२० कोटी ९७ लाख रुपये देण्यात आले आहेत.

**ईशान्येतील सीमावर्ती राज्यांमधील आधुनिक सुविधा**

ईशान्येतील राज्यांचा सामाजिक-आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी विविध पावले उचलण्यात आली आहेत. संबंधित केंद्रीय मंत्रालये आणि विभागांना एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी १० टक्के निधी ईशान्य प्रदेशासाठी राखून ठेवण्याचे बंधन आहे. ईशान्य प्रदेशातील पायाभूत सुविधांची दरी भरून काढण्यासाठी ईशान्य प्रदेश विकास मंत्रालय आणि एनईसी निधी देत असतात.




एनएलसीपीआर योजनेचे प्रशासन ईशान्य प्रदेश विकास मंत्रालयाकडे असून त्या अंतर्गत आतापर्यंत आरोग्य क्षेत्रात ६३,३१३ लाख ३६ हजार रुपयांचे ५३ प्रकल्प तर शिक्षण क्षेत्रात १४५४१६ लाख ५५ हजार रुपयांचे १६८ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. ईशान्येतील राज्यांमधील विविध क्षेत्रांतील योजना ईशान्य प्रदेश मंडळ (एनईसी) चालवत आहेत. एनईसीकडे उद्योग क्षेत्रातील १७,३२२ लाख १२ हजार रुपये मंजूर खर्चाचे ४१ विद्यमान प्रकल्प, आरोग्य क्षेत्रातील ४०,८७० लाख ८५ हजार रुपये मंजूर खर्चाचे प्रकल्प तर २४,२९४ लाख ९८ हजार रुपये मंजूर खर्चाचे शिक्षण क्षेत्रातील विद्यमान प्रकल्प आहेत.

सीमा क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सीमेवरील प्रदेशांच्या विकासासाठी गृह व्यवहार मंत्रालय निधी जारी करत असते. आंतरराष्ट्रीय सीमाप्रांतात राहणाऱ्या लोकांच्या विकासाच्या विशेष गरजा भागवण्यासाठी चालू आर्थिक वर्षात २७,७५७ लाख ८६ हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ६३० नव्या शाळांना मंजुरी दिली असून राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण मोहीमेंतर्गत शाळा मजबूत करुन शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ३३३४ शाळांची निवड केली आहे. मोहीम सुरू झाल्यापासून १२२८८४.२६ लाख रुपयांचा निधी खुला करण्यात आला आहे.



**ईशान्येतील पायाभूत सुविधा मर्यादांचा आढावा**

ईशान्य मंडळ वेळोवेळी ईशान्य प्रदेशाला सामोरे जावे लागणाऱ्या सामाजिक-आर्थिक आव्हाने आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांचा आढावा घेत आहे. यातील प्रमुख आव्हाने म्हणजे ईशान्य प्रदेशाच्या विकासासाठी परिवहन योजना परिप्रेक्ष्य जी ईशान्येसाठी विशेष गतिमान रस्ते विकास योजनेचा (एसएआरडीपी-एनई)पाया बनली, ईशान्येतील सर्वसमावेशक उर्जा पारेषण आणि वितरण व्यवहार्य अभ्यास अहवाल जो ईशान्येतील राज्यांमध्ये पारेषण आणि वितरण योजनेचा आधार बनला, ईशान्य प्रदेश व्हिजन २०२० दस्तऐवज, ईशान्य प्रदेशातील दारिद्र्य निर्मूलनावरील व्यवहार्य अभ्यास अहवाल, ईशान्य प्रदेशासाठी सर्वसमावेशक पर्यटन प्रमुख आराखडा, ईशान्य प्रदेशासाठी आरोग्य सेवक विकास आराखडा आणि ईशान्य प्रदेश हवाई मार्गाने जोडण्यावर अभ्यास अहवाल यांचा समावेश आहे.



ईशान्य मंडळाची स्थापना झाल्यापासून मंडळाने रस्ते व पुलांसाठी परिवहन आणि दळणवळण, बस व ट्रक टर्मिनस, विमानतळ आणि हवाई मार्गाने जोडणे, वीज निर्मिती आणि पारेषण, पाटबंधारे व जल व्यवस्थापन, शिक्षण, समुदाय पायाभूत सुविधा व क्रीडा, वैद्यकीय व आरोग्य, कृषी व संबंधित उपक्रम, उद्योग, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, उपजीविका आदी क्षेत्रांत १२,७५६ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.


ईशान्य मंडळाची भौतिक कामगिरी म्हणजे आंतरराज्य स्वरुपाचे तसेच आर्थिक महत्त्वाचे १०,९४९ किमी. अंतराच्या रस्त्यांची उभारणी, ईशान्येतील राज्यांत ११ आंतरराज्य बस टर्मिनस आणि ३ ट्रक टर्मिनस उभारणी ही सांगता येईल.

गुवाहाटी, सिल्चर, जोरहाट, दिब्रुगढ, लीलाबारी, तेजपूर, उमरोई, लेंगपुई, दिमापूर, इम्फाळ, आगरतळा व तेजू विमानतळांचा दर्जा उंचावण्याच्या भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा ६० टक्के निधी ईशान्य मंडळाने दिला आहे.


भारतीय राजकीय विचारवंत
महाराष्ट्राचा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास
PSI STI ASSTT पूर्व परीक्षा
Success thy name is K'Sagar
मी लिहिलेलं पुस्तक वाच, कारण मी एमपीएस्सीत पहिला आलोय!
ठिकाय! पण पहिला येण्यासाठी तू कोणतं पुस्तक अभ्यासलं होतंस?
सन १९८६ पासून प्रत्येक वर्षी पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांने अन् आज अधिकारी असलेल्या प्रत्येकानं अभ्यासलंय के'सागर!
अधिकाऱ्यांच्या पिढ्यानुपिढ्या घडविणारे संदर्भ!
K'Sagar ज्याला पर्याय नाही!
स्पर्धा परीक्षा भारताचा भूगोल
संपूर्ण सामान्य विज्ञान
पाश्चात्य व भारतीय राजकीय विचार
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स
'दुर्गा चेंबर्स', ३९/१ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, जोगेश्वरी मंदिराशेजारी, पुणे-४११ ००२.
९९२३९०६५००/८०८७७२२२७७
(०२०) २४४८३१६६
३५ वर्षे सातत्याने अग्रेसर के'सागर!
K'Sagar बुक सेंटर
'नुतन क्लासिक', नारायण पेठ, नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर, अप्पा बळवंत चौक, पुणे-४११ ००२.
९८२३१२१३९५/९५४५५६७८६२/६३
(०२०) २४४५३०६५
ही सगळी तर के'सागरचीच पुस्तके आम्ही तर तीच अभ्यासतो! पण, आम्ही ती विद्यार्थ्यांना सुचवीत नाही, असे का ? का ?
कारण आम्ही क्लासेसमध्ये त्यातूनच शिकवतो ना!
MPSC पूर्व परीक्षा पेपर पहिला संपूर्ण तयारी
MPSC राज्यसेवा पूर्व परीक्षा
स्पर्धा परीक्षा जनरल नॉलेज
सुबोध भारतीय राज्यघटना
महाराष्ट्रातील समाजसुधारक
एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास
K'Sagar आयोगाच्या वाढत्या काठिण्यपातळीनुसार अन् प्रश्नांच्या नव्या धर्तीनुसार रचना केलेले संदर्भ

**Yojana Marathi** (Monthly) **September 2016** **RNI No. MAHMAR/2009/32156** Reg No.G/NMD/137/2016-18 Published Date: 12th **September,** 2016 Date of Posting : 16th **September ,** 2016


# Opinion of some Successful Student UPSC 2015-16



**Dr. Siddheshwar Bondar**
(Rank - 124)

"सर, माझ्या अभ्यासाची सुरुवात झाली तुमच्यापासून व शेवटही झाला तुम्ही घेतलेल्या Mock Interview ने. सर आज निर्विवादपणे सांगू इच्छितो की, तुम्ही आमच्या अभ्यासादरम्यान सदैव आमच्याबरोबर होता. तुम्हाला एवढ्या सगळ्या गोष्टी एकटयाने उत्साहाने करीत असतांना पाहून आमचाही उत्साह द्विगुणीत होत होताच, तुम्ही खरच या क्षेत्रातील One Man Army आहात. Thank You Sir !
आपल्या संस्थेतून भविष्यात असंख्य 'भगीरथ' निर्माण होवोत, ही सदिच्छा !"



**Omkareshwar Kanchangire**
(Rank - 820)

"रंजन सर म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानमूर्ती, मार्गदर्शनाबरोबर जिद्द, चिकाटी...!
रंजन सरांनी घेतलेल्या Mock Interview मध्ये सरांकडुन मला फार मोलाचे मार्गदर्शन लाभले. सरांनी दिलेल्या Tips आणि Clues मुळे माझ्या Interview च्या मार्कांमध्ये निर्णायक वाढ झाली. सरांच्या सर्व पुस्तकांमुळे अभ्यासाला योग्य दिशा मिळाली हे निश्चित.
Bhagirath IAS Academy हा UPSC ची तयारी करणाऱ्यांसाठी एक मैलाचा दगडच आहे असे मला वाटते. पुढच्या वाटचालीसाठी Bhagirath IAS Academy ला माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा...!"



**Yogesh Patil**
(Rank - 836)

"मुख्य परीक्षा पास झाल्यानंतर शेवटच्या आणि महत्वाच्या 'मुलाखती' च्या लढाईत पहिल्यांदा रंजन सरांना भेटून मुलाखतीची दिशा स्पष्ट करुन घेतली, आणि त्याच प्रमाणे मुलाखतीची तयारी केली.
माझा सर्वात पहिला Mock Interview सुध्दा सरांनीच घेतला. सरांनी विचारलेल्या प्रश्नापैकी बरेच प्रश्न मला **UPSC** च्या मुलाखतीत जसेच्या तसेच विचारण्यात आले उदा: Goods and Service Tax, छंदाबद्दलचे प्रश्न इत्यादी. विशेष व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता तळमळीने, मनापासून विद्यार्थ्यांना यश मिळावे म्हणून रंजन कोळंबे सरांचे प्रयत्न खरच मनाला भावतात, मग तो विद्यार्थी Academy चा असो किंवा नसो.
UPSC चा मराठीतून अभ्यास करणारा प्रत्येक विद्यार्थी हा सरांची सर्व पुस्तके अभ्यासतोच. मी माझ्या UPSC च्या या प्रवासात तर रंजन सरांच्या अर्थशास्त्र, विज्ञान तंत्रज्ञान, भारताचा इतिहास, भारताची राज्यघटना आणि Environmental studies या सर्व पुस्तकांची अक्षरश: पारायणे केली आहेत. रंजन सरांच्या मार्गदर्शनामुळे असेच अनेक विद्यार्थी यशस्वी होवोत हीच इच्छा !!!"



**Sanghmitra Khobragade**
(Rank - 832)

"Final list मध्ये माझे नाव असल्यामुळे मला अत्यानंद झाला. मला मिळालेल्या यशाचे संपूर्ण श्रेय माझ्या कुटूंबियांना आणि सरांनी केलेल्या मार्गदर्शनास जाते. कोळंबे सरांच्या सर्व पुस्तकांचा मला माझ्या अभ्यास प्रवासात खूप फायदा झाला. Specially Economics साठी MPSC च्या Interview साठी केलेल्या मार्गदर्शनाचा मला UPSC साठी सुद्धा प्रचंड फायदा झाला.
त्याबद्दल मी Bhagirath IAS Academy चे मनापासून आभार मानते."

# Opinion of some Successful Student MPSC 2015-16

**अभिजीत नाईक**
(एस.टी. प्रवर्गात प्रथम)
**Dy. Collector**



"माझ्या यशामध्ये माझ्या कुटूंबियांचा आणि सरांच्या सर्व पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांनी घेतलेल्या मॉक इंटरव्हूव मुळे मला खुप फायदा झाला. सरांनी विचारलेले प्रश्न तसेच प्रश्न मला आयोगात विचारण्यात आले."

**उमाकांत पारधी**
**(राज्यात पाचवा) Dy. Collector**



"माझ्यासारख्या कुठलाही क्लास करण्याची परिस्थिती नसलेल्या ग्रामीण भागातील मुलांसाठी कोळंबे सरांचे Economics, Indian Constitution ही पुस्तके म्हणजे One Stop Solution. महाराष्ट्रातला प्रत्येक विद्यार्थी हा सरांशी पुस्तक रुपाने जोडलेला असतो मग तो सरांचा विद्यार्थी असो वा नसो."

**स्नेहा उबाळे**
**Dy. Collector**



When you want something all the universe conspires in helping you to achieve it.... and Ranjan Sir and his Bhagirath Academy provided the requisite universe for me.

**संदिप मिटके Dy. SP.**



"माझ्या यशाचे संपूर्ण श्रेय श्री. रंजन सर आणि माझ्या कुटुंबाला जाते. रंजन सरांच्या मार्गदर्शनाचा मला परीक्षेच्या Prelim, Main आणि Interview या तिन्ही टप्प्यावर खूप फायदा झाला. संवाद कसा साधायचा आणि कोणत्याही बाउंसवर शांत कसे रहायचे हे सरांकडून शिकलो. त्यामुळेच मी Jack of everything, though master of none बनू शकलो. Thank you so much Sir...."



**अनुराधा गुरव Dy. SP.**
**(ओबीसी मुलींमध्ये प्रथम)**

"मी फक्त कोळंबे सरांचीच विद्यार्थीनी आहे. Pre पासुन Interview पर्यंत रंजन सर हे असे एकमेव व्यक्तीमत्त्व आहे की, जे स्वत: UPSC, MPSC चे लेक्चर स्वतः घेतात. सोबत सेमीनार घेतात, दर्जेदार पुस्तके लिहितात इतके असुनही UPSC, MPSC चे मॉक इंटरव्हूव सुद्धा घेतात. रंजन सर हेच खरे आमचे प्रेरणास्त्रोत! त्यांनी रचलेल्या पायावरच आम्ही आमची यशाची इमारत उभी करु शकलो."



**धनंजय पाटील**
**Dy. SP.**

"सरांच्या Teaching चा आणि सर्व पुस्तकांचा माझ्या यशामध्ये प्रचंड मोलाचा आहे. जवळ-जवळ सर्वच विषयांसाठी मी श्री. रंजन कोळंबे सरांचीच पुस्तके वाचली आहेत. सरांच्या Interview चा मला खुप फायदा झाला. One Man Army आहेत सर मी सरांचे आभार मानतो आणि भगीरथच्या पुढील वाटचालीस खुप शुभेच्छा..."

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : **020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy


Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.